

ए-मे-जून २०१४ | मूल्य ३० रुपये
सगुणा

कॉम्रेड शरद पाटील
विनम्र श्रद्धांजली



(१९२५ - २०१४)

# सगुणा

एप्रिल-मे-जून २०१४ । वर्ष-२ । अंक-२

**संपादकीय**

कॉम्रेड शरद् पाटील : विनम्र श्रद्धांजली । २

**मुलाखत एक**

स्त्रीपुरुखा एकुचि धर्मु होआवा की । *आत्याबाइसा* ।
संवादक : विलास सोनवणे आणि शोभा करांडे । ४

**मुलाखत दोन**

लढा अजून संपलेला नाही । *नजूबाई गावित* ।
संवादक : शोभा करांडे, झेबा शेख आणि अरुण करांडे । १८

**वृत्तान्त**

तांदूळवाडी संमेलन । अरुण करांडे । ४०

**संपादक** : शोभा करांडे (९४२२०१३५८८) । मुखपृष्ठ : मल्हार करांडे
**मूल्य** : ३० रुपये । **वार्षिक वर्गणी** : १०० रुपये

MAHMAR/2013/52241
website:www.sagunatrust.org / Email:shobhakarande62@gmail.com
संपादकीय पत्रव्यवहार : सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, एस० पी० कॉलेजमागे, पुणे ४११ ०३० । दूरध्वनी : (०२०) २४३३७१२५ । ०९८२०२३५०३०

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक शोभा करांडे यांनी श्रीबालाजी एटंरप्रायझेस, धायरीफाटा, सिंहगड रोड, पुणे येथे छापून सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, पुणे. ४११०३० येथे प्रसिद्ध केला.

(या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.)

# संपादकीय

सगुणा

कॉम्रेड शरद् पाटील
विनम्र श्रद्धांजली

हा अंक छपाईला जाण्यापूर्वी एखाद्या क्रिकेटच्या मॅचफिक्सिंगप्रमाणे लोकसभा निवडणुकीचा निकाल लागून सत्तांतर घडून आलेलं आहे. उघड उघडपणे स्त्री-पुरुष विषमतेच्या विचारांचा पुरस्कार करणाऱ्यांचे सरकार (अच्छे दिन आनेवाले है) असे म्हणत विराजमान झालेले आहे. या देशातील स्त्रियांनी व स्त्रीवादी पुरुषांनी प्राचीन काळामध्ये समतेसाठी असंख्य लढे दिले.

मध्ययुगात प्रथमच श्रीचक्रधरांनी व त्यांनी स्थापन केलेल्या महानुभाव पंथाने स्त्रीपुरुष समतेचा जोरदार पुरस्कार केला. त्यापाठोपाठ वारकरी पंथाचे नामदेव व ज्ञानेश्वरांच्या खांद्याला खांदा लावून जनाई व मुक्ताईने पुरुषसत्तेला आव्हान देत स्त्री-पुरुष समतेचा आदर्श उभा केला. महाराष्ट्रात हे घडत असतानाच महाराष्ट्राच्या सीमेवर बसवकल्याण येथे अनुभवमंडप उभा करत श्रीबसवेश्वरांनी स्त्री-पुरुष समतेसोबतच सर्वच स्तरावरील सामाजिक विषमतेसमोर कडवे आव्हान उभे केले. या तिन्ही पंथांनी व त्यांच्या सोबत सुफी पंथियांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी संस्कृत व फारसी या अभिजनांच्या भाषांची ज्ञानभाषा म्हणूनची मक्तेदारी मोडीत काढली व मराठी व कन्नड या लोकभाषांना 'ज्ञानभाषा' म्हणून प्रस्थापित केले.

महाराष्ट्रामध्ये पेशव्यांनी मराठी सत्ता बळकावल्यानंतर वरील प्रक्रियेत खंड पडला. इंग्रजी सत्तेने, पेशवाईने प्रस्थापित केलेली ब्राह्मणी पुरुषसत्ता आधुनिकतेच्या नावाने युरोपीय चौकटीत सन्मानीत केली व दलित, आदिवासी, भटके, मागासवर्गीय इत्यादी अस्मितादर्शी आधुनिक बिरुदावलीने सुशोभित झालेल्या समाजातील स्त्रीपुरुषांचे विशेषत: स्त्रियांची माणूस म्हणूनचे अस्तित्वच हिरावून घेतले.

म. जोतीराव फुले, महर्षी वि. रा. शिंदे प्रभृतींनी या आधुनिक गुलामगिरीला पहिल्यांदा आव्हान दिले. फुल्यांनंतर फुल्यांची जातिअंतवादी चळवळ हुषारीने ब्राह्मणेतर चळवळीत रूपांतरित करण्यात आली. या प्रक्रियेत फुल्यांच्या स्त्रीमुक्तिवादी आशयाचा लोप झाला व ब्राह्मणेतर चळवळ तिच्या कळत नकळत ब्राह्मणी पुरुषसत्तेचे प्रतिबिंब होऊन बसली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात उदयाला आलेल्या उदारमतवादी, विवेकवादी, साम्यवादी, समाजवादी इ. विचारप्रवाहांवर आधारलेल्या चळवळींवर इंग्रजी शिक्षित उच्च जात-वर्गाचाच प्रभाव असल्यामुळे स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा ही दयाकरुणेच्या चौकटीत होत राहिली. कधी कधी ही स्त्रियांबद्दलची कणव व करुणा मडमीकरणाच्या दिशेनेही वाहत राहिली. टिळकांसारख्यांनी या मडमीकरणाच्या विरोधाखाली जुन्याच ब्राह्मणी पुरुषसत्ताक मूल्यांचा उदोउदो केला.

मोहनदास करमचंद गांधींनी पहिल्यांदा बहुजन स्त्रियांच्या अस्तित्वाची दखल घेतली. त्यामुळे तोपर्यंतच्या चळवळीत फुल्यांनंतर स्त्रियांचे अस्तित्व मोठ्याप्रमाणात जाणवू लागले. गांधींनंतर गांधीवादी संस्थांचे रूपांतर पुराणवस्तू संग्रहालयात झाले. त्यासोबतच गांधींच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचेही तेच झाले.

या संपूर्ण काळात वारकरी, महानुभाव, लिंगायत इ. पंथांनी स्त्रीप्रश्नांविषयी घेतलेल्या भूमिकांचा मुक्तिदायी आशय गळून पडून तो उपचारापुरता उरला. या उपचारात देखील दडलेली सुप्त शक्ती ही मोठ्याप्रमाणात आहे. अनेक महानुभाव मठाच्या महंतपदी असलेल्या स्त्रिया, लिंगायतांच्या सगळ्यात मोठ्या मठांच्या महंतपदी असलेली स्त्री व पंढरीच्या वारीतील पुरुषांच्या बरोबरीने असलेल्या स्त्रियांचा सहभाग हे या उपचारातील राखेखाली दडलेल्या मुक्तिदायी निखाऱ्याची उदाहरणे आहेत.

१९७५ नंतर संयुक्त महाराष्ट्राच्या पुढाकाराने स्त्रीविषयक प्रश्नांची व त्यात अडकलेल्या स्त्रीप्रश्नांची उच्चजातवर्गीय चौकटीत चर्चा सुरू झाली. या चर्चेने तोपर्यंत पक्षातील स्त्रियांची आघाडी बांधणे म्हणजे स्त्रियांच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी लढणे या समजाला आव्हान दिले गेले.

याच काळात कॉ० शरद पाटील यांनी प्राच्यविद्येच्या व पाणिनीच्या व्याकरणाच्या आधाराने वेद, उपनिषदे, अरण्यके, ब्राह्मण्यके, रामायण, महाभारतासारखी महाकाव्ये इत्यादींसोबतच प्राचीन जैन व बौद्ध वाङ्मयाच्या प्रस्थापित ब्राह्मणी आशयाला आव्हान द्यायला सुरुवात केली होती. त्यांच्या 'दासशूद्रांची गुलामगिरी' या ग्रंथामध्ये त्यांनी ब्राह्मणी पंडितांनी खलनायिका ठरवलेल्या निऋतीला भारतीय गण समाजाची आदिमाता म्हणून सप्रमाण प्रस्थापित करत भारतातील स्त्रीवादी चळवळीच्या ऐतिहासिक भौतिकवादाचा प्रश्न सोडवला. भारतीय स्त्रीवादी चळवळीसमोरील मोठी कोंडी फोडली.

या अंकाच्या निमित्ताने कै० शरद पाटील यांच्या एकंदर सर्व कार्याला अभिवादन करून आपण त्यांच्या स्मृतीला आदरांजली व श्रद्धांजली वाहतोय.

'सगुणा'च्या या अंकाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कष्टकरी-आदिवासी चळवळीतील कॉम्रेड शरद् पाटील यांच्या सहकारी व पत्नी कॉम्रेड नजूबाई गावित यांची रोखठोक मुलाखत 'सगुणा'च्या या अंकात घेतलेली आहे. त्याचबरोबर बाराव्या शतकात स्त्रीपुरुष समतेचे तत्त्व अमलात आणणारे महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर यांच्या औरंगाबाद येथील मठाच्या मठाधिपती आत्याबाईसा यांची आठ मार्चच्या महिला दिनाचे निमित्त साधून घेतलेली विशेष मुलाखतही या अंकात घेतलेली आहे. या दोन्ही मुलाखतींवरील आपले विचार व प्रतिक्रिया जरूर कळवा.

■

## चर्चा

सगुणा

# : स्त्रीपुरुखा एकुचि धर्मु होआवा की :

महात्मा श्रीचक्रधर यांनी अकराव्या शतकामध्ये महानुभाव पंथाची स्थापना करून स्त्री-पुरुष समानतेची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली. मराठी भाषेला अग्रक्रम देऊन पंथाची संपूर्ण वाङ्मयनिर्मिती प्रत्यक्षात मराठीतूनच केली. जातधर्म-लिंगभेद यांना पंथात थारा दिला नाही. तत्कालिन अनिष्ठ रूढी-परंपरा-समस्यांवर कठोर प्रहार करत त्यांनी यशस्वी सामाजिक हस्तक्षेप केले.
आपल्या तत्त्वज्ञानाला त्यांनी प्रत्यक्ष कृतीची जोड दिली.
महानुभाव पंथाचा हा वैचारिक वारसा अनेक महानुभावी मठ आणि तेथील शिष्य आजही तितक्याच निष्ठेनं सांभाळत आहेत.
महाराष्ट्रातील विविध महानुभाव मठांच्या महंत (प्रमुख) म्हणून अनेक स्त्रिया यशस्वीपणे कारभार पाहत आपल्यापरीनं पंथाच्या विचारकार्याचा प्रसार करत असल्याचे आशादायक चित्र आज दिसते. अशारीतीनं महानुभाव वगळता इतर कुठल्या संप्रदायाच्या मठाच्या प्रमुखपदी बहुसंख्येनं स्त्रिया असल्याचे दिसत नाही. स्त्रीपुरुष समतेचा क्रांतिकारी विचार देणाऱ्या महानुभाव पंथाचा स्थापना दिवस हाच वास्तविक **महिला दिन** म्हणून साजरा करायला हवा. याविषयी अधिक जाणून घेण्यासाठी औरंगाबाद येथील महानुभाव मठाच्या महंत आत्याबाइसा आणि त्यांच्या सहकारी रोहिणीताई यांच्याबरोबर **विलास सोनवणे** आणि **शोभा करांडे** यांनी वेगवेगळ्या मुद्द्यांवर मनमोकळी चर्चा केली. आजच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा उद्‌बोधक व निराळी असल्याने त्याचे शब्दरूप 'सगुणा'च्या वाचकांसाठी येथे आवर्जून देत आहोत.

: **संपादक** :

विलास : सर्व पंथांकडे पाहिल्यास एक स्त्री प्रमुख म्हणून संबंधित मठ चालवते, असं दिसत नाही. हल्ली काही स्त्रिया वेगवेगळ्या प्रकारचे मठ चालवतात, नाही असं नाही. उदा० राधेमाँ नावाच्या कुणीतरी एक बाई आहेत, केरळच्या एक कुणीतरी आम्मा आहेत, निर्मलादेवी म्हणून कुणीतरी एक बाई आहेत. अशा अनेक स्त्रिया सांगता येतील. परंतु त्यांचा पंथ हा परंपरेतून आलेला नाही. तर त्यांनी स्वत: उभा केलेला आहे. म्हणजे उदा जसं- वारकरी पंथ, महानुभाव पंथ, नाथ पंथ आदी जे पारंपरिक पंथ आहेत त्यांना आपल्या समाजानं काही एक अधिकृत मान्यता दिलेली आहे. हे पंथ वर्षांनुवर्षं चालत आलेले आहेत. त्यामुळं त्यांच्याबद्दलची काही विश्वासार्हता समाजात आहे. तसं अलीकडे जे पंथ स्थापन झालेले आहेत त्यांच्याबद्दल म्हणता येत नाही.

आत्याबाइसा : महानुभव पंथाचा हाच एक विशेष आहे की पंथाच्या स्थापनेपासूनच स्त्री-पुरुष समानतेचं धोरण पंथानं स्वीकारलेलं आहे. आमच्या चक्रधर स्वामींनी सुरुवातीपासून समानता घालून दिली आणि त्याप्रमाणे पुढे त्या त्या वेळी त्या त्या स्त्रियांनी आपली जबाबदारी नीट पार पाडत पंथ उत्तमपणे चालवला आहे.

विलास : माझ्या माहितीप्रमाणे सगळ्या पंथांमध्ये महानुभाव पंथच एक असा आहे की तुम्ही एका मोठ्या मठाच्या प्रमुख आहात.

आत्याबाइसा : होय, मी तर आहेच, परंतु अशा अनेक स्त्रिया महानुभाव मठांच्या प्रमुख आहेत. पण यात असं आहे की अनेकांनी मिळून या मठाला आणि मला प्रतिष्ठित केलेलं आहे. मठप्रमुखाला आम्ही महंत म्हणतो. त्यांना आधिष्ठान दिलेले असते. वास्तविक अनेक स्त्रिया मठ सांभाळतात. उदा० नगरजवळ एक मठ आहे, कराडला एक मठ आहे, जिथे स्त्री महंत आहे. असे छोटे-छोटे १०-१५ तरी मठ असतील जे स्त्रिया चालवतात. काही मठ दहावीस लोकांचे आहेत काही पन्नाशंभर लोकांचेही आहेत. आमचा हा मठ परिषदेचे पूर्वीपासूनच मोठे प्रचार केंद्र राहिलेला आहे. नागराज बाबा ३३ वर्षे महानुभाव परिषदेचे बिनविरोध अध्यक्ष होते. अध्यक्ष असल्यामुळे ज्या काही हालचाली व्हायच्या त्या इथूनच व्हायच्या. त्या अनुषंगाने लोकांचा या मठाकडे पाहण्याचा दृष्टिकोन नेहमीच सकारात्मक आणि आशादायी असा राहिलेला आहे.

विलास : पण मग अशाप्रकारे प्रतिष्ठित केलेल्या दुसऱ्या स्त्रीप्रमुख- महंत नाहीत का?

आत्याबाइसा : नाही नाही.

रोहिणीताई : कराडला सदाशिवगड येथील मठाच्या महंत लीलाताई लासुरकर आहेत. त्या स्वत:च तो मठ चालवतात. तो मठ तसा छोटा आहे. त्या मठात २५-३० मंडळी आहेत. यांच्यानंतर एक महिला आल्या. त्यांना आता आठ वर्षे झालीत. मग त्यांच्यानंतर आणखी एका स्त्रीला महंत केलेले आहे. पुरुष महंतांना जे म्हणून काही अधिकार असतात तेच अधिकार स्त्री महंतांनाही दिलेले आहेत. त्यात भेद नाहीय. म्हणजे पुरुषाच्या बरोबरीने पंक्तीत जेवायला बसणे वगैरे. आणि हे अधिकार खुशीने दिलेले आहेत.

शोभाताई : तुमच्या या मठात किती लोक आहेत?

रोहिणीताई : आमचा हा मुख्य मठ आहे. आमच्याकडे स्त्रीपुरुष मिळून २५० एवढे लोक आहेत. त्यात स्त्रियांची संख्या १०० आहेत. यात काही जण जाते-येते आहेत तर स्थिर पावणेदोनशे-दोनशे आहेत. आता काहीजण पंथाच्या कुठल्या ना कुठल्या कार्यक्रमाला गेलेले आहेतच. आता आम्हीसुद्धा नाशिकला जाणार आहोत. तिथं परिषदेचं अधिवेशन होणार आहे.

विलास : न्यायंबसबाबा यांच्यामुळे मी विदर्भातल्या अनेक मठांमध्ये गेलो आहे. परंतु तिथे कोणी स्त्री महंत मला आढळल्या नाहीत. शास्त्री असतील, आचार्य असतील, पण महंत नाही.

रोहिणीताई : स्त्री महंत नाहीये कोठे. आमच्या महानुभाव पंथाला आज जे एक रूप मिळालेलं आहे ते एका स्त्रीनेच दिलेलं आहे. त्या स्त्री म्हणजे - महादंबा किंवा महदाइसा. यांच्यामुळे पंथाला नवे रूप आले. आमच्या पंथामध्ये महिलांना खूप आदराचं स्थान असतं. महिलांच्या विषयी एक आदर आणि एक आदर्श भावना असते. सर्वसामान्यपणे आपल्याकडे पितृसत्ताकपद्धती आहे. परंतु आमच्या पंथात स्त्रीचं नाव लावायला कमीपणा

मानला जात नाही. उदा० हा मुलगा आहे. उद्या हा मोठा झाल्यावर गुरु सुभद्राबाई कपाटे असंच नाव लावणार. म्हणजे अशी समानता दिलेली आहे. ही समानता एखाद्या गोष्टीपुरती नसून सगळ्या गोष्टीत दिलेली आहे. आणि एक महत्त्वाचा विशेष म्हणजे आजवर स्त्रियांचं वर्चस्व या पंथावर राहिलेलं आहे.

विलास : पुरुषसत्ताक समाजामध्ये स्त्रीला बरोबरीचं स्थान द्यावं, असं स्वामींच्या मनामध्ये आलं कसं?

आत्याबाई : आलं कसं म्हणजे त्यावेळी स्वामी डोमेग्रामला होते. एकदा स्वामी निरूपण वगैरे करत बसले होते. आजूबाजूला सर्व स्त्रिया बसलेल्या होत्या. त्या वेळी पैठणचे सारंग पंडित म्हणून नावाजलेले विद्वान ब्राह्मण स्वामींच्या दर्शनाकरता म्हणून येत होते. स्वामींच्या भोवती सर्व स्त्रिया बसलेल्या आहेत हे त्यांनी दुरूनच पाहिलं. 'या स्त्रियांना काय समजतं बरं? या स्वामींना असं काय मोठं विचारत असतील?' अशापद्धतीनं सारंग पंडित हे मनातल्या मनात बोलत असतील. कारण ते स्वामींना प्रत्यक्ष तर हे बोलू शकत नव्हते. म्हणूनच ते मनातल्या मनात म्हणत होते : 'कैश्या बसल्या असतील बुलबुल्या । नेवून धाडा तेलंग देशा । साळून कोंडी कांडावया ।' म्हणजे या स्त्रियांना काय समजतं बरं? या कशाकरिता स्वामींजवळ बसल्या असतील? यांना पाठवलं पाहिजे...त्यांनी सारंग पंडितांच्या मनातलं ते सगळं जाणलं. सारंग पंडित जवळ आल्यावर स्वामी बोलले - 'पाडेया आलेचिया ते अपराधा।' म्हणजे तुम्ही अपराधाला आलात, यांना शिक्षा द्यायला पाहिजे. मग पंडित जी उंची वस्त्रे लेवून आले होते त्याच वस्त्रानिशी ते पाण्यात जाऊन बसले. बाइसा म्हणाल्या ''जी जी, हे विद्वान ब्राह्मण आहेत, ते बराच वेळ पाण्यात बसले आहेत. ते शिक्षेचा मान ते जाणत असतील. विद्वानांना माहिती असतं की कोणत्या चुकीचं काय प्रायश्चित्त असतं.'' शिक्षेचा मान झाला आणि पंडित उठून स्वामींजवळ येऊन बसले. नमस्कार, दंडवत वगैरे घातला. नंतर स्वामी त्यांना बोलले, ''का गा, तुम्ही म्हणत असाल कैश्या बैसल्या असतील बुलबुल्या, नेऊन धाडा तेलंग देशा आणि तुमचा काय जीव आणि यांच्या काय जीवण्या? तुमचे रक्षण करणारा काय वेगळा परमेश्वर आहे की याचं रक्षण करणारा काय वेगळा परमेश्वर



: आत्याबाइसा :
(महंत, महानुभाव मठ, औरंगाबाद)

आमच्या महानुभाव पंथाला आज जे एक रूप मिळालेलं आहे ते एका स्त्रीनेच दिलेलं आहे. त्या स्त्री म्हणजे - महादंबा किंवा महदाइसा. यांच्यामुळे पंथाला नवे रूप आले. आमच्या पंथामध्ये महिलांना खूप आदराचं स्थान असतं. महिलांच्या विषयी एक आदर आणि एक आदर्श भावना असते. सर्वसामान्यपणे आपल्याकडे पितृसत्ताकपद्धती आहे. परंतु आमच्या पंथात स्त्रीचं नाव लावायला कमीपणा मानला जात नाही.
: आत्याबाइसा :

आहे? तुमच्या देहामध्ये काय वेगळा जीव आहे, का यांच्या देहामध्ये वेगळा जीव आहे? जीव दोन्ही देहांमध्ये सारखाच आहे. परमेश्वर सांभाळणारा तोही एकच आहे. मग तुमची परमेश्वराची कल्पना काय? धर्माच्या ७०० परवडिया (पिढ्या) स्त्रियांच्या का नसाव्यात. तुमच्या मनात अशी कल्पना का आली? धर्माच्या चाडीने जे येतं त्यात स्त्रिया असल्या म्हणून काय फरक पडला. (७०० परवडिया म्हणजे ७०० पिढ्या) पूर्वी लोपामुद्रा वगैरेंसारख्या स्त्रिया होऊन गेल्या नाहीत का? आता तुम्हीच सांगताय स्त्रिया का बसल्यात.'' मग पंडितांनी ही गोष्ट मानून घेतली. तेव्हापासून स्वामींनी स्त्रियांना अधिकार दिला.

धर्म, पुराण, रामायण-महाभारत आदी कुठल्याही संदर्भात असो महादाईसा स्वत:ला पडलेले प्रश्न, शंका स्वार्तींना विचारत असत. त्यांची बुद्धी तीक्ष्ण होती. भटोबासाला स्वामी म्हणतात ''म्हातारी जिज्ञासक चर्चक'' ही वेळोवेळी आम्हाला प्रश्न विचारते, तसे तुम्ही विचारता का? आम्ही जे बोललो तेच तुम्ही विचारता. स्वत:च्या मनाने तुम्ही कधी प्रश्न केलेत का आम्हाला?

काही नवीन पुराणातील विचार ऐकले की महदाइसा स्वामींना 'स्वामी हे बरोबर आहे का चूक?' असे प्रश्न विचारत. स्वामींना त्या पुराणात ऐकलेल्या प्रत्येक गोष्टींबद्दल विचारित असत. मग स्वामी त्यांना निरूपण करून सांगत असत हे बरोबर आहे, हे चूक आहे. त्यांचं चर्चेनं खंडनमंडन चालायचं. स्वामींनी प्रत्येक गोष्टीचे अधिकार दिले स्त्रियांना. स्वामींच्या निर्वाणानंतर महादाईसांनी पंथ पुढे चालवला. मग पुढे हिराइसा, कमळाइसा, नागाइसा आदी अनेक स्त्रियांनी आपापल्या परीनं चालवला. हिराइसांना तर संपूर्ण 'लीळाचरित्र' मुखोद्गत होते. त्यांनी लिहिलेली 'लीळाचरित्रा'ची एक प्रत आहे जिच्या वरून पुढच्या प्रती आल्या. हिराइसांना एकसंधी प्रज्ञा प्राप्त होती. त्यांच्यासारख्या विद्वान आणि अभ्यासू स्त्रिया त्या वेळी पंथात होत्या. महानुभावांनी जी ग्रंथनिर्मिती केली, जी भाषानिर्मिती केली, जी स्थळनिर्मिती केली, ज्या पोथ्या लिहिल्या, त्यातील २४ पक्षकारांत १० स्त्रिया आहेत.

शोभाताई : म्हणजे एकूण २४ पक्षकार आहेत आणि त्यात १० स्त्रिया म्हणजे ग्रंथकर्त्या. कोण कोण आहेत त्या?

रोहिणीताई : कमळाइसा, कुमरे रेमाइसा, नाती नागाइसा, धाडी नागाइसा, हिराइसा, आबाइसा खामणेकर, महदाइसा उपाख्य महदंबा, गौराइसा, वाल्हेकर कमळाइसा, अंकुशाचा पक्ष ह्या त्या दहा पक्षकार स्त्रिया होत.

यातील नाती नागाइसा ह्या नागदेवाचार्यांच्या नात होत्या. महादंबांना वाचासुंदर ही पदवी दिलेली होती. म्हणजे या दहा स्त्रियांचं इतकं प्रभुत्व होतं की चर्चेमध्ये त्यांचं म्हणणं पंथातील इतरांना मान्य करावं लागत असे. त्यांनी शास्त्रपण तेवढं अवचंक दिलं, म्हणजे स्त्रियांपासून काही वंचून ठेवलं नाही. धर्म, शास्त्र, संगीत, कला अशा सगळ्या गोष्टींमध्ये पंथाने स्त्रियांना बरोबरीचं स्थान दिलं. त्यांना मत मांडण्याचा अधिकार दिला. स्त्रिया पण आपलं मतप्रतिपादन करायच्या. तितका सन्मानही दिला. उर्वरित जे १४ पक्षकार आहेत- म्हाइमभट, नागदेवाचार्य, केशवबास आदींच्या बरोबरच्या या सर्व स्त्रिया आहेत.

शोभाताई : म्हणजे त्यांच्या पायरीमध्ये फरक नाही?

रोहिणीताई : नाही, पायरीमध्ये फरक नाही.

आत्याबाई : आमच्या पंथात असं आहे की ज्याच्या जवळ विद्वत्ता, ज्ञान आहे त्याला पहिला मान आहे. यात वयाचा भाग नाही. आता असं आहे की तुमचं वय सत्तर आहे, पण तुमचा मुलगा विद्वान असेल तर आम्ही त्याला पहिला मान देऊ आणि तुम्हाला तुमच्या वयाप्रमाणे मान देऊच. यात तिरस्कार वगैरे असं काही नसतं. परंतु 'विद्वान' या दृष्टीनं मुलाला मान देऊ, भलेही त्याचं वय कमी असेल. आमच्या नागराज बाबांचं उदाहरण घ्या. आमचे आई-वडील त्या वेळी होते. पण बाबा खूप विद्वान होते. त्यांनी परमेश्वराला जन्म दिलेला आहे. तर आमचे आई-वडील पण आमच्या बाबाच्या पाया पडत असत.

रोहिणीताई : मुंबईचे डॉ० ग० म० पाटील म्हणून

प्राध्यापक होते औरंगाबादला. ते पण आईवडील बाबांच्या पाया पडतात हे पाहून आश्चर्यचकीत व्हायचे. एकदा त्यांनी बाबांना विचारलं की 'आई वडील तुमच्या पाया पडतात म्हणजे तुमचं कर्तृत्व काय?' हे मी तुमच्यातच पाहतोय. तर इथं ज्ञानाला पहिला दंडवत आहे. त्या व्यक्तीला नाही, तर त्याच्या ज्ञानशक्तीला.

शोभाताई : आम्हीपण जे तुम्हाला दंडवत म्हणतो ते पण ज्ञानाला...

आत्याबाई : होय. इथे जे ज्ञान आहे ते परमेश्वरी ज्ञान आहे त्याला आपण दंडवत करतो.

विलास : आता तुम्ही जे सांगताय माझी एक भावजय महानुभावपंथी आहे. आपल्याकडे अनेक कुटुंबं अशी आहेत की जेथे कोणी एक महानुभावी असतं, कोणी एक वारकरी असतं. अशी मिश्रपरंपरा असलेली अनेक कुटुंब आहेत. पण त्यांना मी अनेक वेळा विचारलं की दोन्हींत नेमका फरक काय? पण श्रीकृष्णाची पूजा करणं यापलीकडे त्यांना काहीच सांगता येत नाही. आता तुम्ही मला जे सांगताय 'ते' तिथपर्यंत- सर्वसामान्य माणसांपर्यंत का पोहोचलेलं नाही.

आत्याबाई : हा पंथ सर्वसामान्यांना धरून चालणारा आहे. आमच्या स्वामींनी सांगितलं आहे की 'आपल्या पंथाचा हा हा विचार आहे आणि तो सर्वसामान्यांपासून सर्व थरापर्यंत पोहोचला पाहिजे.' स्वामींच्या उत्तरापंथेगमनानंतर केशवबासांनी म्हटलं होतं की 'पंथाच्या तत्त्वज्ञानाची आपण संस्कृत भाषेतून मांडणी करू या. मराठीत नको.' भटोबासांनी सांगितलं की 'नको गा केशवदेया, येणें माझी म्हातारीया नागावतील.' म्हणजे नको केशवा, याची मांडणी मराठीतच झाली पाहिजे. कारण स्वामींचा शुद्ध हेतू हाच होता की बाया-बापड्या, म्हातारे, मुलेमुली या सर्वांना हे शास्त्र समजलं पाहिजे. हे जर तुम्ही संस्कृतमध्ये केले तर सर्वसामान्यांना ते कळणार नाही. सर्वसामान्यांची भाषा मराठी आहे, म्हणून मराठीतच ग्रंथनिर्मिती केली पाहिजे.' कोणालाही समजेल अशी भाषा आहे पंथाची. मध्यंतरी आमच्याकडे एक गृहस्थ आले होते त्यांनी त्यांनी आमच्या शास्त्राचा खूप अभ्यास केला. कारण पंथाची सर्व ग्रंथनिर्मिती सरळ-सोपी, सूत्रबद्ध व बोलीभाषेत मराठीत आहे. क्लिष्टता नाही. अर्थसघन आहे. 'मनुष्यमात्र होणें' या सूत्रात अवघड असं काय आहे? काहीच नाही. मनुष्यमात्र व्हा म्हणजे कोणाचा राग, लोभ, कामक्रोध, मत्सर ठेवू नका. हेवा करू नका. मिळालेल्या मनुष्यजीवनाचं सार्थक करा. हे सूत्र खूप सोपे असले, तरी ते अर्थानं खूप ओथंबलेले आहे. तो अर्थ कोणालाही सांगता येईल असा आहे. एखाद्या म्हाताऱ्या माणसाने जरी त्याचं वाचन केलं, मनन केलं तरी त्याला ते कळेल, करता येईल अशा साध्या साध्या शब्दांत स्वामींनी हे सूत्र मांडलंय. त्या वेळी सर्वसामान्य लोक जास्त संख्येनं वैदिकतेशी बांधले गेले होते. वैदिक उपासनावाल्यांनी एकप्रकारे सर्वसामान्यांना बांधून ठेवले होते. त्यामुळे समाजात एकप्रकारची कुंठितावस्था आली होती. ही कुंठित अवस्था महानुभाव पंथाने नाकारली. आणि शास्त्र, धर्म या गोष्टी कोणा एकाची मक्तेदारी नसून त्या सर्वांच्या मालकीच्या व सर्वसामान्यांकरिताच आहेत, हे धोरण स्वीकारले. पंथाची दारे स्त्रीपुरुषांपासून सर्व जातिधर्मांतल्या लोकांसाठी खुली ठेवली. त्यामुळेच या पंथात सर्वसामान्य बहुजन लोक जास्त आहेत. मोठे जमीनदार वा श्रीमंत अपवादात्मक आहेत.

रोहिणीताई : महत्त्वाची गोष्ट म्हणजे आज मराठीला अभिजात भाषेचा दर्जा द्या म्हणून जे काही चाललंय त्यानुषंगाने मी असं म्हणेन की महानुभव पंथाने मराठीला अभिजाततेचा दर्जा बाराव्या शतकातच दिला होता. अफगाणिस्तान, काबूल, पाकिस्तान, कंदहार, लाहोर इथपर्यंत आमचा सगळा नित्यव्यवहार मराठीतच चालला होता. अजूनही चालतो. आजही आमच्याकडे जे अभ्यासक येतात, त्यांना मराठीतूनच अभ्यास करावा लागतो.

आत्याबाई : आमच्या बाबांचे आजोबा गुरू हे पाकिस्तानचे आहेत. म्हणजे काबूल-कंदहारपर्यंत महानुभाव धर्माचा प्रसार मराठीतूनच झाला आहे. आता कोणीच जात नाही तिकडे. एकट्या पाकिस्तानमध्ये ४८ मंदिरं आहेत. पंथाचे जे पूजापाठ, वाचन, नित्यक्रम जे काही आहे ते सगळं मराठीतूनच करावं लागतं. एकदा लोकमान्य टिळक लाहोर गेले होते. तर लाहोरला एक महानुभाव पंथीय श्रीकृष्ण मंदिर होतं- म्हणजे आजही

आहे म्हणतात, कारण त्याविषयी खात्रीपूर्वक माहिती आता माझ्याकडे नाही. त्यांनी तिथं भजन, आरत्या-पूजापाठ, पारायण वगैरे ऐकलं. त्यांना याचं आश्चर्य वाटलं की 'या भागात मराठी भाषा कुठून कशी आली!'

विलास : अभिनेते दिलीपकुमार हे पेशावर येथील आहेत. ते पंधराएक वर्षांपूर्वी पाकिस्तानला गेले होते. तिथून आल्यानंतर त्यांनी मला सांगितलं की 'पेशावरमें एक श्रीकृष्ण मंदिर है और वहाँ के लोग मराठीमें बोल रहे थे। विलास, ये देखके मै तो शॉक हो गया की यहाँ पेशावर में ये लोग मराठी कैसे बोल रहे है। वहाँ जो श्रीकृष्ण मंदिर है वो कौनसा पंथ है?' मी म्हटलं 'ये महानुभाव पंथ है।'

आत्याबाई : पण बाबांची आणि त्याची ओळख होती चांगली. जोपर्यंत महानुभाव आहे तोपर्यंत मराठीला मरण नाही.

शोभाताई : मघाशी जो तुम्ही महानुभाव पंथाच्या संदर्भात पाकिस्तान, अफगाणिस्तान, पेशावर वगैरे उल्लेख केला आहे या सगळ्या भागाचं चित्रण भालचंद्र नेमाडे यांनी त्यांच्या 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीमध्ये विस्तारानं केलेलं आहे. या कादंबरीमध्ये तिथल्या महानुभाव पंथाच्या चलनवलनाच्या खाणाखुणा आलेल्या आहेत. तिथल्या मठाचे वर्णन आलेले आहे. या अर्थानं महानुभव पंथाचं आपल्या देशाबाहेर जाऊन चित्रण करणारी वा त्याला न्याय देणारी मला वाटतं ही पहिलीच कादंबरी आहे. कादंबरीतल्या नायकाच्या आत्याने- तिरोनी आत्याने महानुभाव पंथ स्वीकारलेला असतो आणि त्या आत्याचा शोध तो तिथे घेत असतो.

विलास : मी तुम्हाला जो प्रश्न विचारत होतो, माझ्या भावजयांबद्दल...त्या महानुभव पंथीय आहेत. पण मी चळवळीतील कार्यकर्ता आहे. वाचतोही खूप. पण वि० भि० कोलते यांच्या ग्रंथावर जेव्हा परस्परविरोधी सगळा हलकल्लोळ सुरू झाला तोपर्यंत महानुभव पंथ ही गंभीरपणे घ्यायची गोष्ट आहे, हे आम्हाला कोणालाच म्हणजे मराठीचा अभ्यास करणाऱ्या कोणालाच नीट समजलं नव्हतं. कारण मराठी शिकवणारे जे लोक होते त्यांना आकलनाच्या एकूणच खूप मर्यादा होत्या. या लोकांनी ज्ञानेश्वरी ज्या पद्धतीनं उचलल, त्या पद्धतीनं 'लीळाचरित्र' उचललं गेलं नाही. मध्यंतरी एका कार्यक्रमात तनपुरे महाराज पहिल्यांदा जाहीरपणे म्हणाले की 'ज्ञानेश्वरीतील मराठी आणि लीळाचरित्रातील मराठी यामध्ये 'लीळाचरित्रा'तील मराठी जास्त सोपी आहे.' आतापर्यंत असं जाहीरपणे कोणी बोललेलं नाही. मुद्दा असा आहे, की आताची मराठी भाषाच आताच्या तंत्रज्ञानशिक्षित पिढीला कळत नाही, तर मग १२ व्या-१३ व्या शतकातील मराठी कळणं ही तर दूरचीच गोष्ट. मराठीचे विद्यार्थी जे मुद्दाम अभ्यास करायला गेलेले असतात, ते सोडले तर जुन्या वाङ्मयाशी हल्ली कोणाचा फारसा संबंध येत नाही. तर एकंदर सबंध महानुभाव वाङ्मय जर सोपं करून दिलं तर निदानपक्षी आताच्या पिढीला आणि सर्वसामान्य खेड्यापाड्यांतील लोकांना ते कळेल, असं मला वाटतं.

आत्याबाई : हो हो...तसं काम चालू आहेच. 'लीळाचरित्र' आताच्या साध्यासोप्या मराठीत उपलब्ध केलं आहे. 'लीळाचरित्रा'वर मराठीमध्ये कादंबऱ्याही आल्या आहेत.

आत्याबाई : महानुभाव हा पंथ खूप साधा, सोपा आणि सरळ आहे. पूर्वीचे लोक असे होते, की आपला धर्म कोणाला कळू नये, याबद्दल ते गुप्तता बाळगत. आमच्या पंथाबद्दल उगाचच विनाकारण बाऊ केला गेलेला आहे. तर मुळात तसं काही नाहीय. महानुभाव पंथाचा वेगळेपणा असा की हा ईश्वराला मानणारा धर्म आहे. देवता आणि परमेश्वर यांना एकच न मानता ते दोन्ही भिन्न भिन्न मानणारा आहे. आम्ही देवता ही परमेश्वराचीच एक शक्ती आहे, असं मानतो. इतर लोक देवतेलाच ईश्वर/परमेश्वर मानतात. हा एक खूप मूलभूत फरक इतर पंथ/धर्म आणि महानुभाव यांच्यामध्ये आपल्याला दिसतो. आम्ही देवतेच्या पलीकडे जाऊन परमेश्वर मानतो. जो सर्व शक्तिमान आहे, जो दिव्य आणि चिरंतन शक्ती आहे, जो सृष्टीचा नियंता आहे, त्यालाच आम्ही परमेश्वर मानतो. याचा अर्थ असा नाही की आम्ही देवतेला तुच्छ वगैरे मानतो. परंतु काही लोकांनी आमच्याबद्दल असा एक गैरसमज पसरवलेला आहे. त्यात

काही तथ्य नाही. कारण आम्ही देवतेला मानतो, पण फक्त तिच्या पाया पडत नाही. कारण सर्वशक्तिमान अशा परमेश्वराच्या पाया पडल्यावर पुन्ही वेगळं देवतेच्या पाया पडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही ना. इतर देवता कशा व्यापाराला लावलेल्या आहेत. म्हणजे पुढं एक प्रमुख असतो आणि बाकीचे सगळे त्याच्या हाताखाली सेवक असतात असं. पण देवता ही ईश्वराची केवळ एक शक्ती आहे नि तिच्याकडून परमेश्वर व्यापार करून घेतात एवढंच. आम्ही देवतेला देवताच मानतो आणि त्याच्या पलीकडे परमेश्वर आहे असं मानतो. पुन्हा एकदा सांगते की आम्ही देवतेला तुच्छ मानत नाही. पण लोकांनी याचा बाऊ केला इतकंच.

विलास : म्हणजे महानुभाव पंथ एकच ईश्वर मानतो?

आत्याबाई : होय. कारण परमेश्वर एकच आहे.

विलास : मग मला प्रश्न असा पडतो की महानुभाव पंथ एकेश्वरवादी आहे, वारकरी पंथही एकेश्वरवादी आहे...

आत्याबाई : ...तेही कृष्णालाच मानतात ना. कृष्णाची अनेक रूपं आहेत. ते सगुण रूप मानतात...

रोहिणीताई : वारकरी पंथात विठ्ठलाची पूजा करतात. त्याचबरोबर संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम आदी संतांची पूजाही ते करतात. तसं आम्ही संतांची पूजा नाही करत. संत कितीही मोठा असू दे, पण त्याची पूजा करत नाही. कारण तो एक जीव आहे व जीवाची पूजा आम्हाला मान्य नाही.

आत्याबाई : आम्ही पूजा करतो ती थोरांची. परंतु ती एक व्यक्ती म्हणून करतो. परमेश्वर म्हणून नाही करत. आमच्या पंथाचे पहिले आचार्य नागदेवाचार्य असो किंवा महदाइसा असो किंवा त्या परंपरेतून आलेले जे विद्वान होऊन गेले त्यांना आम्ही भज्य वा पूज्य समजतो. ते आमच्या वडीलस्थानी आहेत, हे आमच्या पंथाचे आधारस्तंभ झालेले आहेत म्हणून आम्ही त्यांना मानतो. परंतु त्यांना आम्ही परमेश्वर म्हणून नाही मानत. परमेश्वर हा एकच आहे- चक्रधर स्वामी. स्वामीनंतर नागदेवाचार्य झाले. त्यांच्यापासून ८०० वर्षे झाली ही परंपरा चालू आहे. ते सगळे संतच होऊन गेले, पण परमेश्वर नाही झाले. हा एक फरक आहे आमच्यात. आमचा कोणताही साधक जो या पंथाला अनुसरला आहे तो फक्त एकच परमेश्वर मानतो. परमेश्वर एकच आहे, फक्त त्याची रूपं वेगवेगळी आहेत. म्हणजे ज्या ज्या वेळी धर्माला ग्लानी आली त्या त्या वेळी परमेश्वरानं अवतार घेतला, तेच आमचे पंचकृष्ण होय. हे पंचकृष्ण म्हणत असलो तरी परमेश्वराचंच रूप आहे. कृष्ण एकच आहे. त्याने वेगवेगळी रूपं घेतली म्हणून पंचकृष्ण.

शोभाताई : कृष्णच का?

आत्याबाई : 'यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत।' हे कृष्णानेच सांगितलंय. म्हणजे ज्या ज्या वेळी धर्माला ग्लानी आली त्या वेळी कृष्णाने अवतार धारण केला. कृष्णानंतर दत्तात्रयप्रभूंनी अवतार घेतला. आणि कृष्ण हा जगन्मान्य आहे.

विलास : म्हणजे एकेश्वराचं श्रीकृष्ण म्हणूनचं जे रूप आहे ते तुम्हाला मान्य आहे. बाकी रूपं...म्हणजे राम नाही का?

रोहिणीताई : राम आहे ना. स्वामींनी सांगितलंय की राम हा शुद्ध सत्त्वाचा अवतार आहे. म्हणजे राम हा विष्णूचा अवतार आहे.

विलास : पण यांच्यात एक अडचण आहे की स्त्रियांना बरोबरीचा अधिकार देणारा पंथ तो श्रीकृष्णाला मानतो, हे तत्त्व सम्यक् आहे. रामानं काही स्त्रियांना बरोबरीचा अधिकार दिलेला नाही. श्रीकृष्णानं तो दिला म्हणून ते सुसंगत आहे...

रोहिणीताई : आमची ज्ञानपरंपरा ही श्रीकृष्ण चक्रवर्तीपासूनची आहे. म्हणून आम्ही श्रीकृष्णाला मानतो...

विलास : आणि बाकीची जी रूपं आहेत म्हणजे शिव...यांना तुम्ही देवता मानता, ईश्वर नाही मानत.

आत्याबाई : नाही मानत. ब्रह्मा-विष्णू-राम-इंद्र आदी या देवता आहेत. देवता म्हणजे तुम्ही मागाल ते देणाऱ्या, तुमच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या असतात. परंतु त्या स्वत:जवळचं काही देऊ शकत नाही. तुम्ही कर्मानं काही जोडलेलं असेल तर ते फळ त्या देतात. त्यांच्याकडे

देण्याची ताकद आहे. म्हणजे जे तुमच्या कर्मात आहे तेच त्या देऊ शकतात. या अर्थानं त्या स्वत:जवळचं काही देऊ शकत नाही. परंतु परमेश्वर असा नाही. तो अनादि दाता आहे. अनाधित म्हणजे तुमच्या कर्मात जरी एखादी गोष्ट जोडलेली नसेल, परंतु त्याचे पाय धरले वा त्याला शरण गेलात तर तो तुम्हाला देऊ शकतो. परमेश्वर जे देईल ते शाश्वत देईल. दिलेलं परत हिसकावून घेणार नाही. तसं देवतेचं नाही.

शोभाताई : वैदिक धर्मापासून बाजूला होऊन चक्रधर स्वामींनी महानुभाव हा संप्रदाय काढला, त्याला नेमकं काय कारण होतं?

रोहिणीताई : श्रीकृष्णांनी जे संयुक्त आहे तेच मान्य केलं आणि जे समाजाला विघातक आहे किंवा जे समाजावर विनाकारण लादलं गेलंय, ते त्यांना मान्य नव्हतं. त्यांना अराजक अमान्य होतं. त्यांनी असं सांगितलं वेद हे त्रैगुण्य आहेत, निर्गुण नाहीत. म्हणजे जे वेदोक्तपद्धतीनं भक्ती करतील ती त्रिगुणच होते. पण श्रीकृष्णाला निर्गुण भक्ती हवी होती.

विलास : ज्ञानेश्वर-एकनाथांपासून ते तुकारामांपर्यंत सगुण आणि निर्गुण यामध्ये निर्गुणाला महत्त्व देणारे अनेक अभंग, अनेक ओव्या, अनेक भारूडं आहेत...

रोहिणीताई : आहेत ना. पण शेवटी त्यांनी ते सगळं एक केलं. म्हणजे शिव-राम-कृष्ण असे त्यांनी दहा अवतार एक मानले आहेत. श्रीकृष्णालाही त्यांनी त्यात टाकलं. त्यामुळे ते आम्हाला मान्य नाही. श्रीकृष्ण हा परमेश्वरच आहे. परमेश्वर म्हणजे ज्याच्याकडे परम ऐश्वर्य आहे, त्याच्याकडे सर्वकाही आहे, जो सृष्टीचा कर्ताधर्ता आहे, जो सबंध सृष्टीला व्यापून राहिला आहे, जो देवतेच्या पलीकडचा आहे. त्याच्या पलीकडे कोणी नाही. तो सर्व जगाला व्यापणारा आहे. तोच सृष्टीचा रचनाकार आहे.

विलास : यात स्त्रियांच्या दृष्टीनं सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा असा की श्रीकृष्ण आणि त्याच्या साऱ्या परंपरा ह्या स्त्रीपुरुष समानतेवर विश्वास ठेवणाऱ्या परंपरा आहेत. आणि ही महानुभव पंथाची सर्वांत मोठी ताकद आहे. पण अशी समानता बाकीच्यांनी तत्त्वत: जरी मान्य केलेली असली तरी त्यांचा व्यवहार तसा नाहीय.

आपण जरा आता दुसऱ्या भागाकडे येऊ या. तो असा आहे. स्वामींनी अकराव्या शतकात पंथाची सुरुवात केली. आजची परिस्थिती अकराव्या शतकापेक्षा जास्त भयानक आहे. अकराव्या शतकात स्त्रियांचं वस्तुकरण झालेलं नव्हतं. दुजाभाव होता, पण बाजारीकरण झालेलं नव्हतं. स्त्री ही बाजारातली एक वस्तू झालेली नव्हती. आज तिचं खूप मोठ्याप्रमाणात वस्तुकरण झालेलं आहे. पंथ म्हणून महानुभाव पंथ याची दखल घेण्यासाठी काय करू शकेल, असा आपण काही विचार केलाय का? ही तुमची जबाबदारी नव्हे काय?

शोभाताई : सगळे संप्रदाय, सगळे पंथ बरोबरीची, समानतेची वागणूक सांगतात, चांगलंच सांगण्याचा प्रयत्न करतात, असं असूनसुद्धा, आता बाहेर हे नेमकं काय चालू आहे?

रोहिणीताई : असं आहे की नैतिक अधिष्ठान जिथं प्रबळ असतं, तिथं बाजारीकरणाचा प्रश्न उपस्थित होत नाही. बाजारीकरण केव्हा होतं, तर जिथं बेस पक्का नाही आणि जिथं नैतिकतेचा अभाव आहे तिथं.

विलास : ताई आज सगळीकडे मोठ्याप्रमाणात जमीन विकायला काढली जात आहे. जमीन गेली की पुरुष श्रीमंत होतो, कारण पैसे त्याच्याच हातात असतात आणि बाई मात्र अकुशल ठरते. कारण तिला शेती माहीत आहे. ती शेतीच्या कामात ती कुशल आहे. पण शेती सोडल्यानंतर तिला बाकीचं काम माहीत नाही. शेतिव्यतिरीक्त तिला फक्त स्वयंपाक करणं, धुणी-भांडी करणं माहिती आहे. एकट्या पुणे शहरामध्ये दोनेक लाख स्त्रिया अशा आहेत, की ज्यांच्याकडे जमीन असताना त्या अत्यंत स्वाभिमानाने जगत होत्या आणि जमीन गेल्यानंतर त्यांना धुणी-भांडी करण्याशिवाय काही काम आलं नाही. स्वयंपाकासाठीची आधुनिक यंत्रे- मायक्रोओहन, मिक्सर, डिशवॉशर्स, वॉशिंग मशिन, इस्त्री इ०- त्यांना हाताळता येत नाहीत. मग त्यांचं काय होतं? शहरातल्या श्रीमंत वर्गातल्या लोकांना मधूनमधून झुणकाभाकरी खावीशी वाटते, ती त्यांची खान्यापिण्याची

गरज भागवणे म्हणजे स्वयंपाक करणं आला. कारण स्वयंपाक या स्त्रीला खूप चांगल्या पद्धतीनं बनवता येते. याशिवाय धुणी-भांडी, झाडझूड करणं, फरशी पुसणं हीच कामं उरतात. एवढ्या संख्येनं जर स्त्रिया अकुशल झाल्या तर त्या सगळ्यांना काम नाही ना मिळणार. मग ज्यांना काम मिळत नाही त्यांनी काय करायचं? यातून मोठं बाजारीकरण होतं आहे. इथे नैतिकतेचा मुद्दा नाही. त्यातल्या एकाही स्त्रीला अनैतिक व्हायचं नाहीय.

विलास : यात अंतर्विरोध असा आहे की सगळ्यांच्या घरात टीव्ही आलेला आहे. टीव्ही हा चक्क बाजार आहे. म्हणजे दात कसे घासायचे इथपासून ते संडासला जाताना डब्बा कोणता न्यायचा हे सगळं टीव्ही सांगतं. जोपर्यंत टीव्ही नव्हता तोपर्यंत खेड्यात स्त्रियांनी कसं दिसावं याच्या काही कल्पना नव्हत्या. तर खेड्यातल्या स्त्रीच्या आपल्या म्हणूनच्या काही एक कल्पना होत्या. आता ती टीव्ही वरल्या मालिका बघते आणि त्यातल्या पात्राची कॉपी करायचा ती प्रयत्न करते. कारण तिने तसा प्रयत्न केल्याशिवाय ह्यांचं मार्केट वाढत नाही. आता इथे नैतिकतेचा प्रश्नच दुय्यम झाला आहे. त्या बाईने कितीही नैतिक व्हायचं ठरवलं तरी.

चार दिवसांपूर्वी मी माझ्याच गावात डॉ० सुहास फडतरे महाराज यांच कीर्तन ठेवलं होत. ९ वाजता कीर्तन सुरू झालं आणि रात्री १ वाजता संपलं. कडाक्याची थंडी होती. आदल्या दिवशी गारपीट झालेली होती. जवळजवळ पाच-सातशे स्त्रिया तेवढ्या त्या थंडीत कुडकुडत एकपर्यंत बसलेल्या होत्या. आता नैतिकता जर नसेल ना तर त्या उघड्या माळावर इतक्या संख्येनं कीर्तनाला येणार नाहीत. पुरुष कमी होते. म्हणजे स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येच्या दुप्पट होती आणि त्या सगळ्या वयांमधल्या स्त्रिया होत्या. म्हणजे १५-१६ वर्षांपासून ते ८०-८१ वर्षांपर्यंतच्या. पण परिस्थिती अशी आहे की ती त्यांना रेटतीय, ढकलतीय. यामध्ये महानुभाव पंथाला घेऊन आपण काय काम आणि हस्तक्षेप करू शकतो?

रोहिणीताई : आमचं जे तत्त्वज्ञान आहे ते विरक्तीचं आहे. त्यामुळं हे सहजासहजी स्वीकारणं अवघड आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून विचार केला तर तत्त्वज्ञान वेगळं आणि जगणं वेगळ आलं. जगण्यालासुद्धा एक आकृतिबंध लागतो. हा आकृतिबंध हे सहजासहजी स्वीकारू शकणार नाही. कारण आमच्या धर्मात प्रवेश करता तेव्हा पहिला नियम काय असतो - तर अभक्ष भक्षण वर्ज्य असतं. कुठलंही व्यसन करायचं नाही. परंतु जे खातात ते मान्य करायला तयार नसतात आणि खात नाहीत त्यांचा काही प्रश्न नाही. या सगळ्यांमुळे लोकांच्या मनात असा एक गृह तयार झाला आहे की महानुभाव पंथाचे नियम खूप कडक असतात म्हणून.

विलास : पण हे नियम आश्रमवासीयांसाठी कडक आहेत. गृहस्थांसाठी...माझ्या अनुभवानुसार महाराष्ट्रातील पन्नास टक्के मराठी लोक शाकाहारी आहेत. त्यातील काही महानुभाव पंथ मानणारे आहेत, काही वारकरी पंथ मानणारे आहेत किंवा काही लिंगायत मानणारे आहेत. अगदी सुफी पंथाला मानणारे मुस्लीम लोकही आपल्याकडे शाकाहारी आहेत. मुस्लीम मराठी साहित्य नावाची संघटना आम्ही चालवतो. जे मुस्लिम लोक मराठीमध्ये लिहितात त्यांच्या त्या लेखकांची, साहित्यिकांची, कवींची एक संघटना आहे. त्यातले पश्चिम महाराष्ट्रातले अनेक मुस्लीम कवी-लेखक मांसाहार करत नाहीत. मराठवाड्यातील करतात. कारण तिथे निजामाचा आणि मोगलांचा प्रभाव असल्यामुळे. पण मराठवाड्याच्या पलीकडे मराठी भाषिक मुस्लिम हे पूर्णत: शाकाहारी आहेत. डॉ० सुहास फडतरे महाराज यांचे गुरू अकबर बाबा होते आणि सातारा परिसरामध्ये जवळ जवळ ५०० गावं अशी आहेत की तिथं पारायणाची परंपरा या अकबर बाबांनी सुरू केली. ते वारकरी होते. त्यामुळे तुम्ही जे म्हणताय ना आश्रमवासीयांसाठी विरक्ती मी समजू शकतो.

आत्याबाई : आता काही लोक असे आहेत की ज्यांना ईश्वरभक्ती आवडते ना, ते लोक स्वखुशीनं या धर्मात येतात आणि अनुयायी होतात या धर्माचे.

विलास : नाही आत्याबाई, माझा प्रश्न असा आहे की...

शोभाताई : आत्याबाई, चक्रधर स्वामींनी रूढ विचारांपासून फारकत घेऊन जो हा संप्रदाय स्थापन

केला, तेव्हा ते आपण होऊन लोकांच्यात गेले. हे पाहता असं वाटतं की आज तुम्ही कुठल्या तरी एका बेटावर आहात की काय. कारण या मठात जाणीवपूर्वक कुणी आत डोकावून पाहिलं तरच मग त्याला हे दिसतं.

आत्याबाई : नाही, तुमचं म्हणणंही बरोबर आहे. परंतु आम्ही पण आमच्या पंथाचा प्रचार करतोच ना. कुठे प्रवचन ठेवतो, कुठे कार्यक्रम ठेवतो. उदा० गोविंदप्रभू जयंती करतो. म्हणजे गोविंदप्रभू जयंती असली तरी तिथं अनेकांची प्रवचनं असतात. आम्ही धर्मप्रचारासाठी वेगवेगळे कार्यक्रम ठेवतो. आणि त्या कार्यक्रमाला आम्ही केवळ पंथाचेच अनुयायी बोलावतो असं नाही तर समाजातल्या सगळ्या थरातल्या लोकांना आमंत्रणं देतो. जे येतात ते पंथाचे प्रवचनं, भजनं ऐकतात. मान्यवर लोकांचे विचार ऐकतात. त्यापैकी काही माणसांना त्याची आवड लागते. मग ते पंथाची पुस्तकं मागवून घेतात आणि पंथाचा, पंथाच्या आचारधर्माचा-तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतात. ते त्यांच्या शंका विचारतात आणि नंतर विचारपूर्वक अनुयायीही होतात, पंथात प्रवेश करतात. आता प्रवेश करणं म्हणजे काही जटील गोष्ट नाही तर सप्त-व्यसनांपासून दूर राहणं, इतकंच. या धर्माचा/पंथाचा मुख्य उद्देश आहे तो म्हणजे असत्य वचनापासून दूर राहा. अहिंसक राहा. सत्य आचरण करा. हाच या पंथाचा उपदेश आहे.

शोभाताई : हे नियम पहिल्यापासून आहेत का?

आत्याबाई : हो, हे सगळे नियम पहिल्यापासूनच आहेत. बाकीचे जे नियम इतर पंथात/धर्मात असतात तेच इथंही आहेत.

शोभाताई : आत्याबाई, माझ्या म्हणण्याचा उद्देश असा होता की चक्रधर स्वामी पंथाला-पंथ विचाराला लोकांमध्ये घेऊन गेले. त्यांनी असं नाही केलं की जो माझ्याकडे स्वत: होऊन चालून येईल त्यालाच मी हे सांगेन वा त्यालाच बरोबर घेईन. तसं आता या घडीला या परिस्थितीत हा पंथ/धर्म आपल्याला लोकांच्यात कसा घेऊन जाता येईल, त्यासाठी आपण काय करू शकतो?

आत्याबाई : तसे आमचे प्रयत्न सतत चालू असतातच. आता उद्या नाशिकला अधिवेशन आहे. तिथं आम्ही सर्व समाजाला आमंत्रित केलंय आणि अनेक ठिकाणचे लोक येणार आहेत. पुणे, मुंबई, दिल्ली वगैरे अनेक ठिकाणचे लोक येणार आहेत.

विलास : आत्याबाई, जाईच्या देवापासून गेल्या पाच वर्षांत मी अनेक ठिकाणी अनेक कार्यक्रमांना हजेरी लावलेली आहे. त्या त्या ठिकाणी स्वत: गेलेलो आहे. पण तिथं महानुभाव पंथाला मानणारेच लोक येतात, असं दिसतं.

रोहिणीताई : नाही, असं काही नाही. महानुभाव पंथाला मानणारे पन्नास टक्के असतात आणि बाकीचे पन्नास टक्के असतात. मग त्यांच्यात पंथाबद्दल आपोआपच उत्सुकता निर्माण झाल्यामुळे काही लोक हा पंथ स्वीकारतात. मात्र आम्ही त्यांच्यावर कुठल्याही प्रकारची सक्ती करत नाही. महत्त्वाचं म्हणजे हा धर्म सक्तीचा धर्म नाही. सक्तीनं कुठलाच विचार पुढं जात नाही. त्यामुळं ज्यांना आवडेल, मनापासून पटेल त्यांनीच या धर्माचा स्वीकार करावा, अशीच आमची सुरुवातीपासूनची भूमिका राहिलेली आहे.

विलास : नाही नाही, आत्याबाई, मी सक्ती वगैरे म्हणत नाही. हा प्रश्न वेगवेगळ्या अंगांनी आम्ही तुम्हाला यासाठी विचारतो आहोत, की आम्हाला असं वाटतंय की आधुनिक म्हणून जे जे विचार आलेले आहेत, या आधुनिक विचारांनी मोठ्याप्रमाणात माणसाच्या मनाचं, शरीराचं बाजारीकरण करून टाकलेलं आहे. आता 'बाजारीकरण' आणि 'विषमता' हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. आज या बाजारीकरणाला कसलाही धरबंध राहिलेला नाही. कालपर्यंत फक्त बाईच टार्गेट होती, आता पुरुषही टार्गेट होत आहेत. म्हणजे आता व्यक्ती म्हणून पुरुष की स्त्री असं काही राहिलेलं नाही. कारण आता जमिनी विकून चिक्कार पैसे हातात येताहेत. मध्यंतरी आम्ही हिशोब केला या सर्वांचा की, एक कोट रुपये चार वर्षांत संपून जातात. या लोकांनी त्यापूर्वी कधी एक कोट पाहिलेले नसतात. पैसे आलेत म्हटल्यावर तो फारसा विचार न करता वेगानं ते खर्च करतो. पैशांच्या बळावर सर्व गोष्टी घ्यायला सुरुवात करतो. त्यामुळे

चार वर्षांमध्ये तो कंगाल होतो. त्याने जी जमीन विकलेली असते त्याच जमिनीवर उभ्या राहिलेल्या बिल्डिंगमध्ये तो वॉचमन म्हणून काम करतो, तर त्याची बायको धुणीभांडी घासू लागते. मुंबई, रायगड, पुणे, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर वगैरे शहरांच्या किंवा बहुतेक जिल्ह्यांच्या आसपासची ही वस्तुस्थिती आहे. म्हणजे जसजसे हायवे आणि त्याचे स्वरूप बदलत जाताहेत तसतसं प्रचंड प्रमाणात बाजारीकरण आणि त्याचं स्वरूप बदलत आहे. बरं एकदा का हे पैसे संपले की मग पुढच्या पिढीला काहीच उरत नाही. म्हणजे जमीन नाही की उदरनिर्वाहाचं दुसरं साधन नाही. मुलंसुद्धा अर्धीमुर्धी व्यसनीच झालेली असतात. मग ते कुठल्यातरी गँगमध्ये सामील होतात. आणि ज्यांना काहीच मिळत नाही ते वाटमारी, सोनसाखळी पळवणं, दारू पिणं, कुठल्या तरी पक्षात जाऊन मजा मारणं, गुंडगिरी वगैरे गोष्टी करतात. हल्ली पुण्यात दररोज असंख्य चेन खेचण्याच्या घटना घडताहेत. एकटी बाई रस्त्याने चालू शकत नाही. म्हातारी माणसं तर अजिबात नाही. कारण कोण मोटारसायकलवरून येईल आणि चेन खेचून घेऊन जाईल काही नेम नाही. तर या सगळ्या गोष्टी रोखायच्या असतील तर हे सगळे पंथ आहेत. त्यात महानुभाव पंथ अग्रणी आहे. त्याचबरोबर सूफी, वारकरी, लिंगायत आहेत. या सगळ्या पंथांचं जे नैतिक अधिष्ठान आहे, त्या नैतिक अधिष्ठानाचा वापर करूनच हे सगळं बदलता येईल, असं दिसतंय. ते कसं करता येईल, त्याचं स्वरूप काय असलं पाहिजे हा प्रश्न आम्हाला सतत भेडसावत आहे. तो कसा सोडवायचा?

रोहिणीताई : हा प्रश्न तुम्ही कसा सोडवू शकाल? तुम्ही याबद्दल काही विचार केलाय का?

विलास : आम्ही काही प्रयोग केलेले आहेत. एक प्रयोग आम्ही असा केला की पुण्याजवळ डाऊ केमिकल्स कंपनी होती. त्या डाऊ विरोधातील पहिली लढाई आम्ही सुरू केली. सहा महिन्यांमध्ये सगळे लोक थकले. देहूजवळ तुकोबांच्या भामचंद्र डोंगराच्या खालीच ते गाव आहे. हे दीडेक हजार लोकवस्तीचं गाव दोन वेळा तुरुंगात गेलं. तुरुंगात गेलं म्हणजे सगळंच संपलं. मग मी वारकऱ्यांकडे गेलो आणि त्यांना सांगितलं की हा काही आमचा एकट्याचा प्रश्न नाही. हे कंपनीवाले इंद्रायणीमध्ये जी काही रसायनं सोडतील ते पुढे पंढरपूर चंद्रभागा आणि कृष्णेपर्यंत जाऊन मिळणार आहे. दरवर्षी किमान वीस लाख वारकरी पंढरपूरला वारीला येतात. वर्षभरातल्या सगळ्या वाऱ्या मोजल्या तर ५०-६० लाख लोक येथे जमतात. दहाएक लाख लोक आळंदीला येतात, देहूला तुकारामबीजेलाही असेच लोक जमतात. हे लोक परत जाताना इंद्रायणीतून आपसूक विविध रोग घेऊन जातील. इंद्रायणीच्या आसपास एकंदर ९०० कंपन्या आहेत. यातील एकही कंपनी सांडपाण्यावर प्रक्रिया करीत नाही. पाणी तसंच सोडून देतात. जर आजारी पडायचं असेल तर तिथलं ग्लासभर पाणी प्यायचं. घरी जाऊन हमखास आजारी पडणार. नुसती अंघोळ जरी केली तरी अंगाला खाज जरूर सुटते. त्यात ही डाऊ कंपनी आली तर ही आणखी किती रोग आणेल. वारकऱ्यांनी ते ऐकलं आणि बंडातात्या कराडकर महाराज यांच्या पुढाकारानं ती कंपनी आम्ही जाळून टाकली. सरकारच्या दृष्टीनं हा प्रश्न पडला की वारकऱ्यांना कसं पकडायचं? जोपर्यंत ते शेतकरी, गावकरी म्हणून लढत होते, त्यांना ते पकडून तुरुंगात टाकायचे आणि जेव्हा ते वारकरी म्हणून लढायला उतरले तर त्यांना हातही लावता येईना. दोन महिने त्यांना कोणी पकडू शकलं नाही. कंपनी जाळल्यानंतर गावातल्या लोकांना ते उचलून आत टाकत होते. दोन महिन्यानंतर बंडातात्यांना त्यांनी अटक केली. त्यांना अटक झाल्यावर त्यांना अडवायला वीस लाख लोक रस्त्यावर उतरले. पाच दिवस सगळे हायवे बंद होते. सरकार हादरलं. सगळ्या वारकऱ्यांना त्यांनी सोडलं, सगळे खटले काढून घेतले आणि कंपनी बंद केली.

मुंबईजवळ भाईंदरला त्यांना करमणुकीसाठी सेझ प्रकल्प आणायचा होता. तिथले लोक जमिनी सोडायला तयार होईनात. लोकांनी जमिनी सोडाव्यात म्हणून त्यांनी समुद्राजवळच्या डोंगरावर कचऱ्याचं डंपिंग ग्राऊंड तयार केलं. त्या कचऱ्यातून जे पाणी येईल ते विहिरींमध्ये झिरपणार आणि खालचे जलसाठे, जमीन दूषित होणार म्हणजे भातशेती करणारे गेले, समुद्रातील मासेही मरणार

हे उघडच आहे. म्हणजे कोळी, आगरी, भांडारी असे सगळेच गेले. या लोकांच्या उदरनिर्वाहाचं साधनच जाणार. याला कंटाळून लोक जमिनी सोडतील, असं त्यांना वाटलं. तो सगळा ख्रिश्चन एरिया होता. बिशपपासूनचे जे सगळे वरचे पाद्री होते ते सगळे सरकारबरोबर होते. डंपिंग ग्राऊंडच्या खालच्या बाजूचे जे पाद्री लोक होते ते सगळे गावातून आलेले ते लोकांबरोबर उभे राहिले आणि चर्चमध्ये फूट पडली. महाराष्ट्रात पहिल्यांदा असं घडलं की चर्चच्या संपूर्ण यंत्रणेमध्ये अशी आडवी फूट पडली. खालचे लोक लोकांबरोबर आणि वरचे लोक सरकारबरोबर. सात महिने पस्तीस हजार स्त्रिया रस्त्यावर बसलेल्या होत्या. त्यांनी एकसुद्धा ट्रक येऊ दिला नाही. आणि जेव्हा पोलिस आले हल्ला करायला तेव्हा त्यांनी मतमावली म्हणून त्यांची देवी आहे, त्या देवीची मूर्तीच रस्त्यावर आणून ठेवली. पोलिसांची हिंमत झाली नाही पुढे सरकायची आणि त्यांनी सरकारला सांगितलं की हे इथून हलवा त्याशिवाय आम्ही काही करू शकत नाही. यानिमित्ताने जर हे सगळे ख्रिश्चन मुंबईच्या रस्त्यावर उतरले तर तुम्ही काय करणार? म्हणजे धर्म नावाच्या गोष्टीचा उपयोग करून आम्ही लोकांचं जीवन वाचवण्यासाठी दोन यशस्वी प्रयोग केले.

मग बंडातात्या मला म्हणाले की समतेची चर्चा फक्त वारकरी एकटेच नाही करत. तुम्ही जा ना महानुभावांकडे आणि त्यांनाही विचारा ना. मग मी न्यायंबस बाबांना जाऊन भेटलो. त्यावर न्यायंबस बाबा म्हणाले की तुमचा विचार चांगला आहे. मी आमच्या सगळ्या महंतांशी बोलतो. आणि मग तीन वर्षांपूर्वी होळीच्या दिवशी १९ फेब्रुवारीला बंडातात्यांच्या मठामध्ये आम्ही बैठक घेतली. त्या बैठकीला दहा महानुभाव महंत होते. त्यात संतोषमुनीही होते. शिवाय वारकरी, लिंगायत अशा तीन-चार पंथांचेही प्रमुख लोक आले होते. लिंगायतांचे दोनतीन स्वामी होते. लिंगायतांच्या एक प्रमुखही एक बाईच आहेत. त्यांनी पत्र पाठवलं की 'माझ्या आजारपणामुळे मला येता येत नाही, परंतु तुमची ही कल्पना चांगली आहे आणि माझा तुम्हाला संपूर्ण पाठिंबा आहे. ही कल्पना तुम्ही अशीच पुढे न्या.' यातूनच मग पुढे आम्ही सर्व धर्म, सर्व पंथीय सामाजिक परिषद घेण्याचं ठरवलं. याची पहिली सभा ही तुमच्या याच मंदिरात झाली. हा एक मार्ग आहे. पण तुम्ही मंडळी स्वत: त्यामध्ये उतरल्याशिवाय काही होणार नाही. तुमच्या प्रवचनांमध्ये, तुमच्या कीर्तनांमध्ये चक्रधर स्वामीजींनी त्या काळात सामाजिकदृष्ट्या केलेला उपदेश आणि आजच्या काळातील हे सर्व सामाजिक प्रश्नं यांची सांगड घालून स्वामीजींचा उपदेश आजही कसा प्रभावीपणे लागू होतो, असं जर निरूपण आपल्यासारख्या अधिकारी व्यक्तींकडून व्हायला लागलं तरच परिस्थिती बदलेल. आता काय होतंय की लोक तुमच्याकडे येताहेत ते केवळ देव, भक्ती म्हणून येतात. वास्तवात त्यांचं आयुष्य, त्यांचे प्रश्न आणि ही भक्ती यांच्यात काही संबंध नसतो. बारकाईनं पाहिलं तर त्याचं आयुष्य आणि भक्ती हे वेगळं नाही, त्यात अंतर नाही, हे आपल्याला सांगावं लागेल आणि मला वाटतं असाच चक्रधर स्वामींचा उद्देश होता. असं नम्रपणे मला सुचवावसं वाटतं. सगळ्यात पहिल्यांदा आपण हे करू शकतो. दुसरं असं आहे की सगळ्याच पंथांच्या बाबतीत, की लोक तुमच्याकडे येतायत. पण आता हे उलटं झालं पाहिजे. तुम्ही लोकांकडे गेलं पाहिजे.

रोहिणीताई : आम्हाला बोलावलं तर आम्ही जरूर येऊ.

विलास : नाही, नुसतं बोलावून प्रश्न संपणार नाहीत. पहिली गोष्ट अशी की आजच्या प्रश्नांवर आपल्या पंथाचं तत्त्वज्ञान हेच कसं उत्तर आहे, सामाजिक बांधिलकी आणि महानुभाव पंथ, याबद्दल पंथामध्ये चर्चा सुरू झाली पाहिजे. मी अनेक महानुभाव शास्त्रींना भेटलो आहे आणि नेहमीच भेटत असतो. महाराष्ट्रातले जवळपास बहुतेक आश्रमांमध्ये मी जाऊन आलेलो आहे. आमचा एखादा स्थानिक कार्यकर्ता तरी जरूरच त्यांना भेट देत असतो.

शोभाताई : हो आणि समाजाचे प्रश्न कसे सोडवता येतील, या पाठीमागे आपला पंथ उभा असेल तर लोकांनाही जास्त बळ येईल. कारण पंथाचं तत्त्वज्ञान क्रांतिकारी आहे. तुमचा आंबेगावला एक आश्रम आहे. माझी एक मैत्रीण म्हणाली की तिथे सगळ्यांना संन्यास घ्यावा लागतो. तर संन्यास हे काय उत्तर आहे का?

त्यामुळे स्त्रियांचे प्रश्न कसे काय सुटतात?

आत्याबाई : नाही, आम्ही सगळ्यांनाच संन्यास घ्यायला सांगत नाही. ज्याची इच्छा आहे त्यालाच घ्यायला लावतो. आणि संन्यास घेणं हा काही विनोद नाही.

रोहिणीताई : मुळात आमच्या पंथाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन जो आहे तो चांगलाच आहे. आजही हा दृष्टिकोन कमी झालाय वगैरे असं नाहीय. आजही पुष्कळ विद्वान, अभ्यासक लोक या पंथाचा अभ्यास करतात. सामान्य लोक आपलं दु:ख बाजूला ठेवण्यासाठी, त्यातून बाहेर पडण्यासाठी, मानसिक स्वास्थ्यासाठी पंथाकडे येतात. यामधला जो वर्ग आहे तो यापासून पूर्णपणे बाजूला आहे. त्यामुळे त्यांची अशी मानसिकता झाली आहे की पंथामध्ये गेलं की प्रवेशच करावा लागतो, संन्यासच घ्यावा लागतो इ०इ०. मात्र ही साफ चुकीची धारणा आहे. एका दृष्टीनं हे लोकांचं अज्ञानच आहे. याचा अर्थ असा होतो की पंथाविषयीचं त्यांचं आकलन तोकडं आहे. त्यामुळे एखाद्या गोष्टीचं नीट मुळातून परीक्षण न करता नुसतंच वरवर मत मांडणं हे चुकीचं आहे. आता पंथामध्ये आम्ही सगळ्यांना जर संन्यास घ्यायला लावला असता तर आज कैक हजारोंच्या संख्येनं संन्यासी झालेले दिसले असते. पण तसं आम्ही करत नाही.

आत्याबाई : लहानपणापासून काही लोक अनाथ मुलांना इकडे आणून सोडतात. त्यांचा सांभाळ आम्ही करतो, त्यांचं शिक्षण आम्ही करतो. मोठं झाल्यावर त्यांनी पंथात राहायचंय की नाही हा त्यांचा प्रश्न असतो. हा निर्णय घ्यायचं त्यांचं स्वातंत्र्य आम्ही कधीही आजवर हिरावून घेतलेलं नाहीय. त्यामुळे असं काही नाही की आम्ही त्यांना इथे डांबून वगैरे ठेवतो. हे सगळे गैरसमज आहेत.

जी व्यक्ती हा पंथ लहानपणापासून अभ्यासते, तिला हे समजून येतं की या धर्मात आपल्या जीवनाचं सार आहे, आपण चांगल्या मार्गाला लागलो आहोत, अशी जाणीव त्या व्यक्तीला झालेली असेल तर ती हा पंथ सोडून जात नाही. त्यामुळं जाणीव होणं हे फार महत्त्वाचं आहे. आम्ही तिच्यावर कुठल्याही प्रकारची बळजबरी करत नाही. तिला ह्या गोष्टीची जाणीव झाली की ती हा चांगला मार्ग सोडून वाईट मार्गाला जात नाही. ज्या लोकांना याची होत जाणीव नाही, या तत्त्वज्ञानापर्यंत ते पोहोचलेले नाहीत, त्यांना असं वाटतं की 'आपलं मन इथं लागत नाही. आपण सोडून जाऊ'. असे लोक मग निघूनही जातात की.

शोभाताई : मला असं म्हणायचंय की ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. आता हे कधीपासून झालंय? साधारणत: १९१० पासून. मात्र महात्मा चक्रधरांनी स्त्री-पुरुष समतेची शिकवण बाराव्या शतकापासून दिली. याचा अर्थ आपल्याच देशात आपल्याच परंपरेमध्ये स्त्रीपुरुष समतेचा आरंभ होतो, परंतु याची आपल्याच देशातल्या लोकांना कानोकानी खबर नसते. वास्तविक हा विचार आता तरी गावोगाव पोहचायला हवा ना. कितीक काळ आपण सारखं सारखं बाहेरच्यांच्या मान्यतेवर आपलं पोषण करणार? आपल्याच लोकांची आपल्याला कदर नाही हेच यातून दिसतं.

आत्याबाई : बाबा असताना डोमेग्रामला आम्ही दोनतीन वेळा साजरा केलेला आहे. परंतु फार मोठ्याप्रमाणात साजरा नाही करत इतकंच.

विलास : आमची अशी सूचना अशी आहे की चक्रधर स्वामींनी या पंथाची सुरुवात ज्या दिवशी केली, तोच दिवस जर आपण भारतीय स्त्रियांच्या समतेचा दिवस म्हणून साजरा केला तर...आपण सुरुवात करायला काय हरकत आहे? आम्ही असा कार्यक्रम आयोजित केला तर तुम्ही याल का?

आत्याबाई : आम्ही आनंदानं येऊ की.

विलास : पण तुम्हीच बोलायचं. आम्ही कोणीही फार काही बोलणार नाही. तिथं तुम्ही सगळ्यांनी येऊन महानुभाव पंथानं समता कशी आणली, महादाइसांपासून तुम्ही मघाशी ज्या दहा स्त्री पक्षकारांची नावं घेतली त्या सगळ्यांचा इतिहास सांगा. कारण सर्वसामान्यांना हे माहीतच नाही ना. ८ मार्च या जागतिक महिला दिनावर सगळ्या सौंदर्यप्रसाधनं करणाऱ्या कंपन्यांनी कब्जा केलेला आहे. स्त्रीनं मुक्त होणं म्हणजे काय तर नटणं आणि

विशेष म्हणजे त्यांची सौंदर्यप्रसाधनं घेऊन नटणं म्हणजे मुक्त होणं, हे असंच चाललंय. याला आपण कुठंतरी छेद द्यायला हवा ना. शह देणं गरजेचं आहे. आणि सांगितलं पाह्यजे की बाराव्या शतकातच आमच्या भारतीय परंपरेत महात्मा चक्रधरांनी स्त्रीपुरुष समतेचं बंड केलेलं होतं. सार्वजनिकपणे आपण त्याचं पुनरुज्जीवन करू या ना.

रोहिणीताई : खरंतर तुमच्या या निर्णयाचं खूप खूप स्वागत आहे. कारण आजवर तरी अशाप्रकारचा प्रस्ताव घेऊन आमच्याकडे कोणी आलेलं नव्हतं आणि आम्ही कोणाकडं आमचा प्रस्ताव घेऊन जाणं ही आमची गरज आहे, समजलं जाईल म्हणूनही आम्ही कोणाकडे गेलो नव्हतो.

विलास : म्हणून ही कोंडी फोडण्यासाठीच आम्ही आलोय आज. ती फोडायची का नाही ते तुमच्यावर अवलंबून आहे. तुमचं हे जे समतेचं बेट आहे ना ते आता बेट न राहता ते सार्वत्रिक झालं पाहिजे, त्याला विश्वरूप मिळालं पाहिजे. त्यानंच समाजाचे प्रश्न सुटतील. आम्ही काय तुम्हाला मदत करायला आलो नाही काही.

रोहिणीताई : हे असं आहे ना की 'सहनाववतु...'

विलास : अगदी बरोब्बर.

विलास : मला तिसऱ्या भागाकडे यायचं आहे. परंतु हे थोडंसं वैयक्तिक आहे. संन्यासी म्हणून जे जीवन तुम्ही जगता ते आणि बाहेर एवढं सगळं चकाचक आहे, एवढी प्रलोभनं आहेत आणि तुम्ही तर विरक्तीमध्ये जगता, ही सांगड घालता कशी?

रोहिणीताई : विरक्तीमध्ये या चकचकाटानं काही फरक पडत नाही. आम्ही परमेश्वराला जे अनुसरतोय ते परमेश्वर भेटेपर्यंत मनाची ती स्थिती असते. परमेश्वर भेट हीच आमची साधना आहे. त्यासाठी साधेपणानं जगणंच महत्त्वाचं असतं. मन खंबीर असेल तर कुठलंही प्रलोभन काही करू शकत नाही. ही व्यक्तिगत बाब आहे. त्यामुळे हे आम्हाला कठीण वगैरे वाटत नाही. आम्ही जो मार्ग अनुसरलेला आहे त्या मार्गानं जाण्यासाठीच ही साधना आहे. आपल्या इच्छेनं हा धारण केलेला विचार आहे. आणि या विचारासाठीच तुम्ही इथं आलेला असता.

शोभाताई : पण निसर्ग नावाचीही एक गोष्ट आहे ना?

रोहिणीताई : हो आहे ना, पण निसर्गावरही माणसानं मात केलेली आहेच की. आणि याच्यापेक्षाही आपल्या मनाचंच बंधन, आचारसंहिता हीपण गोष्ट असतेच ना.

पंथामध्ये जे शिक्षण सुरू होतं - ज्याला बाळकडू म्हणा हवं तर - ते शिक्षणच असं मूलभूत दिलं जातं की तुम्ही भरकटू शकत नाही. आधी आम्हाला भगवद्गीता शिकवली जाते. त्याचे अध्याय मुखोद्गत करावे लागतात. मग यानंतर 'सूत्रपाठ' शिकावा लागतो. अशा एकेक पायऱ्या वाढत जातात तसतसे त्या विद्यार्थ्याला त्यात गोडी-रुची निर्माण होते. हळूहळू तो अभ्यासाकडे-तत्त्वज्ञानाकडे आकर्षित होतो. त्यातून त्याच्या मनाची काही एक वैचारिक घडणही नीट घडत जाते. त्यामुळे त्याला 'निसर्ग' वगैरे अशा गोष्टींची इच्छा राहत नाही. एखाद्या संशोधकाला जसं त्याचं फक्त संशोधनच दिसतं तसंच संन्यासाचं आहे. आम्हाला तर समाजात सगळ्यांबरोबर मिसळावं लागतं. त्यामुळे आम्ही स्वत:ला अशाप्रकारे तयार केलेलं आहे की समोरच्या मनुष्याचा आमच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन 'तसा' राहत नाही. त्यामुळे त्या प्रकारचा विचारही आमच्या मनात येत नाही. आमच्या मनावर आमचं एवढं नियमन आहे की जे बाहेरचं भुलभुलैया जग आहे त्याचा आमच्यावर काही प्रभाव पडत नाही. कारण ज्ञानाच्या आगीत सगळी कर्मं जाळली जातात. ज्ञान असा एक अग्नी आहे की कोणतेही कर्म त्याला स्पर्श करू शकत नाही.

शोभाताई : असंही बोललं जातं की अशाप्रकारचा संन्यास म्हणजे वास्तव प्रश्नांपासून दूर पळणं असतं.

रोहिणीताई : नाही, हे पळणं नाहीये. पळणं म्हणजे पळवाट. आता जे बालसंन्यासी असतात, म्हणजे जगद्गुरू शंकराचार्य हे बालसंन्यासी होते. मध्वाचार्यही संन्यासीच होते. आपल्या भारतीय संस्कृतीत चार आश्रम आहेत त्यात पहिला ब्रह्मचर्याश्रमच आहे. तो आम्ही शेवटपर्यंत ठेवतो. (शब्दांकन : विद्या ताकवले)

■

# : लढा अजून संपलेला नाही :

कॉम्रेड शरद् पाटील यांनी उभ्या केलेल्या आदिवासी चळवळीत दिलेलं लढाऊ योगदान आणि आदिवासींसंबंधी 'भिवा फरारी', 'तृष्णा' हे केलेलं मोजकंच परंतु कसदार लेखन, आदींमुळे **नजूबाई गावित** हे व्यक्तिमत्त्व महाराष्ट्राला परिचित झालं. नजूबाई यांनी गेली तीस-चाळीस वर्षे श्रमिक-कष्टकरी-आदिवासी यांच्या न्याय्य हक्कांसाठी अनेक आंदोलनं केली, लढे दिले. चळवळ करता करता दुसरीकडे त्यांनी मानदंड ठरेल असं लेखनही केलं. नजूबाई यांच्या या एकंदर झंझावती प्रवासाविषयी यांच्याशी **शोभा करांडे, झेबा शेख** आणि **अरुण करांडे** यांनी केलेल्या ह्या मनमोकळ्या गप्पा.

**: संपादक :**



नजूबाई : या जमिनीवर तुमचा हक्क असला तरी आता ताबा सरकारचा आहे. तुम्हाला माणुसकीचं खरं जीवन जगायचं असेल तर तुम्ही या जमिनीमध्ये पाय टाकायला हवा. कारण पोट भरण्यासाठी उत्पन्नाचं दुसरं साधन तुमच्याजवळ नाही. त्यामुळं कायमस्वरूपी उत्पन्नाचं साधन जर तुम्हाला मिळालं तर तुमची परिस्थिती बदलेल, जीवनमान उंचावेल. आणि ती बदलण्यासाठी तुम्हाला आता घरातून बाहेर पडावं लागेल.

एसआरपी, पोलीस खातं, गृहखातं ही सरकारी यंत्रणा तुमच्यावर तुटून पडेल, त्याचा सामना तुम्हाला धैर्यानं करावा लागेल, असा इशारा कॉ० शरद पाटील यांनी दिला होता. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत मग आम्हीही लढ्यासाठी तयार झालो.

पहिल्यांदा जमिनीमध्ये पाय रोवला. शेती करण्यास सुरुवात केली. पीक चांगलं आलं. मग शेती बाजूला ठेवून आम्ही सत्याग्रहात उतरलो. त्यात आम्हाला सात दिवसांची शिक्षा झाली. शिक्षा संपल्यावर परत जाऊन शेती कामाला सुरुवात केली. पेरण्या केल्या. राबलो. पिकलं खूप चांगलं. धान्य घरात आल्याबरोबर आम्हाला खूप आत्मविश्वास आला. मग आम्ही ठामपणे उभे राहिलो. परंतु १९७४ साली एसआरपी येऊन गेली. त्या वेळेस सगळी शेती उद्ध्वस्त झाली. कॉ० शरद पाटील यांना तुरुंगात टाकलं. आम्हीही सत्याग्रह करून जेलमध्ये गेलो. ते वर्षं असंच गेलं. मग १९७५ मध्ये आणीबाणी लागली. तेव्हाही आम्हाला तुरुंगात टाकलं. १९७६ मध्येही परत असंच झालं. हे पाहता आम्ही उठाव केला. त्यामध्ये केवळ पुरुषच नव्हे तर बायाही उत्साहानं सामील झाल्या. उठावासाठी आम्ही सगळे कार्यकर्ते रात्ररात्र फिरत होतो. एकेक गाव पिंजून काढत होतो. जिकडेतिकडे काळाकुट्ट अंधार. ना विजेची सोय ना कशाचीच सोय. अशा परिस्थितीमध्ये रात्री-अपरात्री कोणतं तरी गाव गाठायचं आणि तेथील लोकांना निरोप द्यायचा. याचा फायदा असा झाला की संघटना आणि चळवळ जोमानं रुजायला सुरुवात झाली. लोक ठामपणे आमच्या पाठी उभे राहिले.

असं असलं तरी काही ना काही रूपानं दडपशाही चालूच होती. खोट्यानाट्या फिर्यादी करणं चालूच होतं. परंतु त्याविरुद्ध आम्ही हजारोंच्या संख्येनं उतरून सत्याग्रह, मार्चे असे काही ना काही कार्यक्रम घेत राहिलो. शेवटी कॉ. पाटील यांनी विचार केला की नुसती आंदोलने केल्याने आपला प्रश्न सुटणार नाही. तर आपण एका बाजूला आंदोलन आणि दुसरीकडे कायद्याची लढाई लढली पाहिजे. म्हणून मग आम्ही सुप्रिम कोर्टापर्यंत या लोकांचं दु:ख मांडलं. कागदोपत्री जे काय करावं लागतं ते सगळं केलं. सुप्रिम कोर्टामध्ये ही केस इंदिरा जयसिंग यांनी दहा वर्षे चालवली. आमच्या बाजूने निकाल लावून दिला. सुरुपसिंह नाईक-गावित यांनी कायद्याचं संरक्षण मिळवून दिलं. मनाई हुकूम मिळवला. परंतु राजकीय लोकांनी आमच्याविरुद्ध गावगुंडांना, गावातल्या शेतकऱ्यांना उठवलं. भडकवलं. दंगेधोपे घडवून आणणे, पिके उद्ध्वस्त करणं, धान्य चोरणं, मारझोड करणं, स्त्रियांवर बलात्कार करणं, कुठे लुटमार करणं असं सत्र चालू केलं. अशा कठीण स्थितीमधूनही आम्ही बाहेर पडलो.

नंतरची घटना आहे १९७४ सालातली. माझं माहेर साक्री तालुक्यातलं पिंपळनेर. खरंतर शाळा शिकायची माझी इच्छा नव्हती. कारण शिकून काय करणार, असं वाटायचं. पण घरच्यांनी बळंबळं चौथीपर्यंत शिकवलं. पिंपळनेरच्या पश्चिम पठारावर एक खूप मोठी ऐतिहासिक घटना घडली. एसआरपीची दडपशाही चालू होती. त्या काळात आसपासच्या बहुतेक गावात बरीच पहिलवान मंडळी होती. आम्ही त्यावेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात होतो. एसआरपीच्या दडपशाहीत पिके उद्ध्वस्त झाली. तेव्हा आम्ही जमवलेला सगळा जमाव डोंगराखालून वर चढला आणि खूप मोठा दंगा झाला. खूप मारझोड झाली. बायका-माणसे असं सगळ्यांना झोडपलं. आम्हीसुद्धा एसआरपीला झोडपलं. पैलवान लोकांनी त्यांच्या बंदुका हिसकावून घेतल्या.

या सत्याग्रहामुळे आम्हाला वीस दिवसांची शिक्षा झाली. ती भोगली. लेडीज पोलिसांनी बायकांना तपासलं, पुरुष पोलिसांनी पुरुषांना तपासलं. मार बसलेले, पाठीवर काळे वळ पडलेल्या लोकांनाही सहा सहा महिने जेलमध्ये टाकलं. कॉ० पाटील यांनी सर्वांना निर्दोष सोडवलं. असे एकेका प्रसंगामधून पाटलांनी आम्हाला सहिसलामत बाहेर

काढलं. कॉ. शरद पाटील यांची बुद्धिमत्ता प्रगाढ असल्याने ते कायद्याची बाजूही तेवढ्याच ताकदीने लढत होते. पहिल्यांदा सुरुवात झाली तेव्हा फक्त दिडशे लोक होते. रेश्मा भोये तेव्हा खासदार होता. 'शरद पाटील आले की त्यांचा मुडदा पाडायचा' अशापद्धतीनं त्याने आमच्या विरुद्ध शेतकरी उठवले होते. त्या गावाला ६-७ लोक अति कर्मठ धारक होते.

कुऱ्हाडी, तलवारी अशी हत्यारं घेऊन गावातील जवळपास १५० लोकांचा जमाव तिथे गेला. शरद पाटील ठाम उभे राहिले. त्यांनी जमावाला विचारले, ''तुमचा पुढारी कुठे गेला? माझा मुडदा पाडायचा असेल तर आधी त्याला इकडे आणा.'' मग लोकांना इशारा केला. सगळ्यांनी दंडुके घेतले. सगळ्यांना पळवून लावलं. अशा अनेक संकटातून कॉ. शरद पाटलांनी आदिवासींना बाहेर काढलं. असं असूनही त्यातले काही लोक कॉ. पाटील यांना बेइमान झाले. परिस्थितीत एवढा बदल झाला.

शपांनी लोकांना माणुसकीचं जीवन दिलं. लोक पोटभर खायला लागले. व्यवस्था, सगळं जीवन बदलून गेलं. मग बाहेरून आलेल्या काही नतद्रष्ट लोकांनी पक्षामध्ये फूट पाडली. अशी फूट पाडली की जी परत कधीच सांधली गेली नाही. अजूनही ती तशीच आहे.

त्या वेळी ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते म्हणून काम करत होते. कॉ. शरद पाटील यांनी संपूर्ण मार्क्सवादी साहित्य वाचलं होतं. मार्क्सवादी विचारांचा अभ्यास केला होता. त्यातून त्यांना असं दिसलं की मार्क्स अपुरा वाटतोय. आणि दुसरी गोष्ट म्हणजे जातीच्या प्रश्नाचा अभ्यास करताना त्यांना असं आढळून आलं की, या मार्क्सवादी साहित्यामध्ये जातीचा प्रश्न कुठेच येत नाही आणि भारतासारखा देश तर आधीचाच जातिग्रस्त आहे. ब्रिटिशांनी वर्ग आणले. त्यामुळे जात आणि वर्ग या दोन्ही गोष्टी एकत्र करून लढले पाहिजे, असा मुद्दा त्यांनी मांडला. पक्षात याची दखल घेतली जात नव्हती या मुद्द्यावरून ते पक्षातून बाहेर पडले. यानंतर त्यांनी 'सत्यशोधक मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष' स्थापन केला. मार्क्स, फुले आणि आंबेडकर यांचं तत्तवज्ञान एकत्र करून हा पक्ष त्यांनी स्थापन केला होता. पक्ष स्थापनेच्या वेळी मी, डोंगर बागूल वगैरे आम्ही सर्व आदिवासी कार्यकर्ते कॉ. पाटील यांच्यासोबत होतो. किशोर ढमाले, रणजित परदेशी, प्रतिमा परदेशी ही मंडळी तेव्हा पक्ष स्थापनेत नव्हती. ते नंतर आले.

आता पक्षाचे तीन तुकडे करून टाकलेत. एक तुकडा डोंगर-बागूल सांभाळतोय, एक तुकडा ढमाले सांभाळतोय आणि एक तुकडा माझ्याकडे आहे.

एकदा कॉ. पाटील पक्ष कामानिमित्तानं आठ दिवसांसाठी केरळमध्ये गेले होते. मी पिंपळनेरच्या ऑफिसमध्ये होते. मला काहीच माहिती नव्हती. सुगावाही लागू दिला नव्हता. लोक हळूहळू ऑफिसमध्ये येऊ लागले. मी म्हटलं ''कुणी मीटिंग बोलावली?'' तर कुणीच काही बोललं नाही. हे लोक का येऊन राहिले? कुणीच सांगेना. रात्र झाली. मी विचारून विचारून थकले.

दुसऱ्या दिवशी पक्ष वाढदिवस. मला आश्चर्य वाटलं की पक्ष वाढदिवसाची तारीख तर अजून दूर आहे, मग आज कसा काय पक्षाचा वाढदिवस साजरा करताहेत? मग मी ऑफिसमधून बाहेर निघून गेले. त्यांनी तो कार्यक्रम पार पाडला. मी काही परत तिथे गेले नाही. कॉ. पाटील दुसऱ्या का तिसऱ्या दिवशी आले. त्यांनी ती सगळी परिस्थिती पाहिली. तेव्ही मी माझ्या माहेरी आले होते. अशा अवस्थेमध्ये कॉ. पाटील यांनी 'विषमता निर्मूलन परिषद' बोलावली. त्यासाठी गावोगाव फिरून ते निधी वगैरे गोळा करायचे. अविरत धडपड करून त्यांनी ही विषमता निर्मूलन परिषद पार पाडली आणि मग आम्ही सर्व काही सोडून दिलं. त्यांनी पक्ष ताब्यात घेतला.

आम्ही म्हटलं ''घ्या बुवा, करा तुम्ही काम.'' आम्ही बाजूला झालो. ढमाले वगैरे या लोकांनी आमची खूप बदनामी केली. काही वर्षांनी त्याच्याबरोबर गेलेले काही लोक परत आमच्याकडे आले. तेव्हा मी म्हटलं, ''आता ह्यांना हाकलून द्या. त्यांना इथं यायची काही गरज नाही. ह्यांनी आपली एवढी बदनामी, अपमान केला असेल तर त्यांना हाकलून द्या. याच्यात माझ्या समाजाचे असतील आणि ते जर बेकायदेशीरपणे वागले तर मला ते नको आहेत. मीसुद्धा त्यांच्यासोबत जाणार नाही.''

मग शपा म्हणाले, ''मी ज्या हातांनी हे रोपटं लावलं

आहे ते फुला-फळाला येत आहे, तर ते कसं काय सोडून देऊ? मी हयात असेपर्यंत जे करणं शक्य आहे, ते सर्व करू.'' असे म्हणून शपांनी त्या लोकांना जवळ केलं होतं. मी तर नाकारलंच होतं. आमच्याबाजूनं सुरुवातीपासूनच काही लोक होते. ते शेवटपर्यंत राहिले. ढमाल्याच्या गटात काही जुने लोक आहेत.

आता ३ तारखेला ७/१२ उताऱ्यासाठी डोंगर बागूलने मोर्चा आयोजित केला होता. त्यात मलाही बोलावलं होतं. मग १० तारखेला चर्चा करण्यासाठी तहसिलदाराने बोलावलं. मी आजारी असल्यानं एक जणाला पाठवलं. तिथं कुणीच नव्हतं.

शपा असताना- काही आठवड्यांपूर्वी इथले श्री. प्रकाश महाजन हे कलेक्टर ७/१२ प्रश्नाबद्दल इथं येऊन कॉ. पाटील यांना भेटून गेले. शपांनी त्यांच्याशी चर्चा केली. त्यांच्या मते वनहक्क कायदा हा केंद्र सरकारचा असल्यानं ७/१२ ची अंमलबजावणीही केंद्र सरकारनंच करायची आहे. तोपर्यंत आम्ही काहीच करू शकत नाही. जेवढे पात्र ठरले त्यांना प्रमाणपत्रे दिली आहेत.

आम्ही ज्यांना प्रमाणपत्र दिली आहेत त्यांना जमीन मोजून पट्टीही दिली आहे. राहिलेले पूर्ण काढून टाकले आहेत. पण या डोंगर बागूलने मोर्चा काढला असला तरी खात्रीशीर मार्ग निघेल असं काही झालं नाही. आशादायक नाही. मी गेले होते की वरून काही बातमी आली असेल तर पाहावी म्हणून. पण तसं काही झालं नाही. त्यांचं म्हणणं होतं की, ३ जुलैपर्यंत आम्हाला ७/१२ उतारा द्या. आता वरून हुकूम आला असेल तरच देतील नाही तर काय देणार?

यावर कॉ. पाटलांचं विचारमंथन चालू होतं. आम्ही पिंपळनेरला मोठं अधिवेशन घेतलं होतं तिथं नीलोफर भागवत यांनी सर्व लोकांसमोर 'मी तुमची पिटिशन चालवेन.' असं आश्वासन दिलं. यावर कॉ. पाटील म्हणाले की 'तुमची जी काही फी असेल ती आम्ही देऊ.' यावर त्या म्हणाल्या की 'मला फी वगैरे काही नको.' पूर्ण एक वर्ष त्यांनी काहीच केलं नाही. मग परत विचाराअंती प्रश्न पडला की दुसरा वकील कोण शोधायचा? त्यासाठी तिस्ता सेटलवाड यांना फोन केला. त्यांनी मी माझाच वकील देते असे फोनवर सांगितले. वकीलाचे नाव सांगून सर्व कागदपत्रे इकडून घेऊन गेले. अशातच कॉ. पाटील आजारी पडले. मग तो पाठपुरावा कोणी केला नाही.

कॉ. पाटील यांच्या मते 'त्या पिटिशनमध्ये सुप्रिम कोर्टाने मान्य केलेल्या याद्यांमधील नावे आताच्या समित्यांनी गहाळ केली आहेत. अपात्र ठरवली आहेत.' मिहिर देसाईंच्या म्हणण्यानुसार मुंबई हायकोर्टात ७/१२ चे काम होऊ शकते. त्याबरोबरच पाटलांनी दुसरी मागणी केली की पूर्वीचे अपात्र ठरवलेल्यांसाठी सहाचा कायदा आहे तर तो आठ करण्यात यावा. तर ही आठची मागणी दिल्ली सुप्रिम कोर्टात होऊ शकते, असं त्यांचं म्हणणं आहे. आता तेही लांबणीवर पडले आहे. संजय कांबळे या पत्रकाराने ही जबाबदारी घेतली आहे.

शोभाताई : तुम्ही कॉ. शरद पाटील यांना पहिल्यांदा एका आंदोलनात भेटला?

नजूबाई : १९७० च्या दरम्यान मी माझ्या माहेरी होते. ७२ च्या सुमारास. तेव्हा मी २०-२५ वयाची असेन.

शोभाताई : आणि शपांचं?

नजूबाई : त्यांचं साधारण ४०-४५ असेल.

अरुण : तुम्ही चळवळीत कशा आलात?

नजूबाई : घरात भीषण दारिद्र्य होतं. आपल्याला हेच जिणं का? कसलीच जाणीव नव्हती की आपण काही करू शकतो का? काही मागू शकतो का? हे काहीच आम्हाला माहीत नव्हतं. मी जेमतेम चौथीपर्यंत शिकले होते. त्यामुळे मला मराठी जेमतेम समजायचं. जाणवलं. आमची मावची भाषा होती. इकडची मावची भाषा अहिराणीला धरून आहे. तिकडची वेगळी आहे. वसावा, पाडवी, नाईक यांची भाषा वेगळी आहे. ती आपल्यासारख्यांना काहीच समजणार नाही.

मला मराठी येत असल्यामुळे शपांचं भाषण कळायचं. जेव्हा मी शपांच्या २-३ सभा ऐकल्या, त्यांचे विचार मला एकदम पटले आणि माझ्या डोक्यात प्रकाश पडला, की खरं आहे ते सांगतात ते. आपण जे भावनिक विचार करत होतो, तो खोटा आहे आणि जे आहे ते वेगळे आहे. माणुसकीचे काय हक्क आहेत, आपण

माणसं आहोत का कोण आहोत? आता तरी आपण माणसांनी हक्कांसाठी लढलं पाहिजे, मागितल्याशिवाय मिळणार तरी कसं, असं वाटायला लागलं.

झेबा : सभेला जायला घरातून विरोध झाला का?

नजूबाई : तेव्हा सगळ्या बायका-पुरुष घराबाहेर पडले होते. बायका घराबाहेर पडत नव्हत्या, पण गडीमाणसांनी त्यांना बाहेर काढलं. त्यामुळं गड्यांची काही आडकाठी नव्हती. तेव्हा माझं लग्न होऊन मला तीन मुले होती. १२-१३ व्या वर्षी माझं लग्न झालं होतं. मी शाळा सोडली. तीन वर्षे मोलकरणीचं काम केलं. चौथ्या वर्षी लग्न करून दिलं.

शोभाताई : तुमचं शपांसोबत रजिस्टरमॅरेज आता झालं. पण मग त्याच्या आधी तेव्हा काही प्रोसिजर केली होती का? म्हणजे हार वगैरे घातले होते का?

नजूबाई : नाही. त्याचं असं आहे, की दडपशाही असेपर्यंत सर्वांनी आपापल्या बायकांना चळवळीत जायचं स्वातंत्र्य दिलं. कोर्टकचेऱ्या झाल्या, मनाई हुकूम मिळवला आणि दडपशाही संपली. मग माणसं परत बायकांना कोंडायला लागली. मग एक वाद उठला. तो वाद साधा नव्हता. माझा जीव घेणारा तो वाद होता. माझ्या बरोबरच्या एका चळवळीतील कार्यकर्तीचा जीव गेला. ती आणि तिचा नवरा एका कॉटवर झोपले होते. आता बायकोला कोणी उचलून घेऊन जाऊन मारून टाकेल, हे पटेल का कोणाला? पण त्या नवऱ्याने स्वत:च त्या बाईचा खून केला. तोच प्रकार माझ्या बाबतीतही घडणार होता.

मलाही खूप मारपीट झाली. मला डागीन काढलं. मला काय काय भयंकर त्रास दिला. तरीही मी हिंमतीनं, जिद्दीनं उभी राहिले. माझी पोरं शहाणी झाली. मग दोन पोरांचं लहान वयात लग्न करून टाकलं आणि मगच मी घर सोडलं. तोपर्यंत घर सोडलं नाही. तेही सुखानं घर सोडलं नाही, तर भरपूर मार खाऊन घर सोडलं. परत माघारी गेले नाही. त्याच्या आधी माझ्या सहा पंचायती झाल्या. जमात पंचायती. प्रत्येक वेळेला मी नांदायला गेले. सहा वर्षे मला झोडपून झोडपून काढलं. मग पाट लावला जायचा. पंचायत बसायची आणि 'परत जा बाई लहान पोरं आहेत. कोण सांभाळेल? एकदा सासरी गेल्यावर परत माघारी येता येतं का?' असं म्हणून मला सहा वेळा सासरी पाठवलं गेलं. पण सातव्यांदा भरपूर मार खाऊन निघाले तर परत गेलेच नाही.

झेबा : पण त्यांचं मारायचं कारण काय होतं?

नजूबाई : मी संघटनेत पूर्ण वेळ काम करत होते. चळवळीत काम केलं म्हणून मारझोड करण्यात येत होती. मी म्हटलं तुमच्या घरात आधी मूठभर धान्यही मिळत नव्हतं ना. आता चळवळीमुळं घरं भरून घेतली आणि बायकांना कोंडायला लागलात, हे चांगलंय का? चळवळीमुळे तुम्हाला माणुसकीचं जीवन जगायला मिळालं हे विसरलात का? लहान लहान झोपड्या, त्यात खायला काही नाही, मजुरी करून कंदमुळं खाऊन दिवस काढावे लागायचे. जंगलाच्या भाज्या, कडवे वाल, लाल ज्वारी असं काहीही शोधून खावे लागायचे. ह्या वाईट परिस्थितीतून चळवळीनं बाहेर काढलं हे लोक विसरले.

हा सारा प्रकार आणि माझी परिस्थिती कॉम्रेडनी जेव्हा पाहिली तेव्हा त्यांनी सर्व लोकांना आवाहन केलं, ते म्हणाले की ''मला ह्या बाईमध्ये काही तरी चांगले गुण दिसताहेत, ही बाई हुशार आहे. ती काही तरी चांगलं करू शकते.'' हे शपांना जाणवलं होतं. त्यांनी सर्व लोकांना आव्हान केलं, की ''पुरुषाचं जीवन वेगळं, स्त्रीचं जीवन वेगळं. बिन लग्नाची बाई असेल तर तिच्यावर पुरुषलोकांची वाईट नजर असते. मग तो कार्यकर्ता का असेना. तर तुमच्यापैकी कोणी हीची जबाबदारी स्वीकारता का? ज्याला हिची जबाबदारी पार पाडायची असेल त्यानं हात वर करावा.'' कॉ. पाटील आधी जिल्हा कमिटीमध्ये हे बोलले; नंतर तालुका कमिटीमध्ये आणि मग जाहीरसभेमध्ये बोलले. पण कोणीच हात वर केला नाही. मग त्यांनी दुसरी मागणी केली की, ''मी हीची जबाबदारी स्वीकारतो, मग त्याला तर कुणाचा विरोध आहे का?'' तेव्हाही कोणी काही बोललं नाही. नंतर मग ते मला म्हणाले, ''आपण तुमच्या जमातीच्या रिवाजाप्रमाणे सर्व करू.''

अरुण : तुमची जमात कोणती?

नजूबाई : मावची-आदिवासी. आमच्यात मग ते मावची असो, भिल्ल, कोकणी आदिवासी असो-

मुलगामुलगी पळून गेले, की झालं लग्न. आताही असंच आहे. तरुणपणी मुला-मुलीची पसंती झाली की ते पळून जातात. तरुण लग्न झालेली मुलगी असेल, मुलं-बाळं नसतील तर तिला आधीच्या नवऱ्याला दहेज परत करावा लागतो. त्यानंतरच तिला दुसरं लग्न करता येतं.

झेगा : मुलं असताना सोडले तर?

नजूबाई : अशा दोन-तीन केसेस मी लढवल्या. त्यात असं निघालं की, आदिवासी हे हिंदू नाहीत आणि म्हणून हिंदू कोड बिलातील कायदे (फुटकळ) आदिवासी महिला व पुरुषांना लागू होत नाहीत. नवऱ्याच्या मालमत्तेमध्ये तिला वाटा नाही, मुलं असली तरीही. आणि बापाच्या मालमत्तेवरही तिचा अधिकार नाही. कारण द्विभार्या प्रतिबंधक कायदा नसल्याने पुरुष वाटेल तितक्या बायका करू शकतात. परंतु बाईला तसे करायचे असल्यास पहिल्या नवऱ्याची दहेजची रक्कम परत करावी लागेल. दुसरा नवरा पहिल्याला त्याची सर्व रक्कम परत करू शकतो. पुरुषांना असे बंधन नाही.

मी संघटनेच्या, चळवळीच्या कामाच्या निमित्ताने दौरे करताना अशी एक यादी तयार केली होती. कोणाच्या तीन, तर कोणाच्या चार बायका निघून गेलेल्या. माझ्याच नवऱ्याच्या माझ्या आधी दोन, तर माझ्यानंतर सात बायका निघून गेल्या होत्या. बेकायदेशीर.

माझा नवराही पूर्वी चळवळीत होता. पण नंतर परिस्थिती बदलली आणि ते बिघडले. मेसरवाडीपासून आठ किमीवर दापूर नावाचं गाव आहे. तिथंच ते राहतात.

...त्यानंतर पाटलांनी माझा स्वीकार केला. आम्ही कोणतीही लिखापडी केली नाही वा कोणतेही रीतीरिवाज केले नाहीत. फक्त मी इथं आले, राहिले. कारण आम्ही शारीरिकसंबंधांसाठी एकत्र आलो नव्हतो, तर वैचारिक पातळीवर काम करण्यासाठी एकत्र आलो होतो.

हा निर्णय झाल्यावर एक वर्ष मी नाही म्हणत राहिले. कारण मला माझी बदनामी झालेली चालली असती, पण कॉ. पाटील यांच्या सारख्या विद्वान माणसाची माझ्यामुळे बदनामी व्हायला नको होती. त्यामुळे इथे मी आले तरी एकटीच राहत होते. पण ते कधीही एकरात्र वा अर्धीरात्रही इथे थांबले नाहीत. मला ते महाराष्ट्रभर घेऊन फिरले, पण कधी बोटही लावलं नाही. अशा पद्धतीनं त्यांनी माझा स्वीकार केला, तो निखळ वैचारिक होता. लैंगिक तर मुळीच नाही.

आता आता येथील स्थानिक कार्यकर्त्यांनी लावून धरल्यामुळे मागच्या वर्षी पत्नी म्हणून माझं नाव रजिस्टर केलं. नाही तर तोपर्यंत आम्ही वेगळंच होतो. जे काही काम असेल तेवढंच सांगून ते निघून जायचे.

काही खायला दिलं तर थोडंसं खाऊन ते जात. मला ते कायम समजावून सांगत की ''आपण आपल्या देशातली जातिव्यवस्था घालवायला निघालो आहोत. आपल्या समाजासाठी आपण काहीतरी आदर्श ठेवला पाहिजे. आपण शारीरिक नव्हे तर वैचारिक भुकेनं एकत्र आलो आहोत. हे मला पटल्यामुळे मी होकार दिला. नाही तर मी नाहीच म्हणत होते.

ते म्हणायचे की ''एका शेतमजूर घराण्यातील तू मुलगी आहेस. तुला जर मी वनवास दिला तर मला इतिहास कधीच माफ करणार नाही. महाराष्ट्रभरातील कार्यकर्तेही मला माफ करणार नाहीत. मी मरण्याच्या आत तुझ्यासाठी काही तरी केलं पाहिजे.'' तेव्हा कुठे मी यासाठी तयार झाले. नाहीतर मी ऐकतच नव्हते. ते समजावत ''असं नको करू, वेडी नको बनू. मी तुला वाऱ्यावर सोडणार नाही.''

शोभाताई : याला घरातल्यांचा विरोध होता का?

नजूबाई : आधी होता. पण आता काही नाही. त्यांचा पोरगाही माझ्याशी छान बोलतो. तुमच्या उदरनिर्वाहासाठी मी मदत करेन, असे म्हणतो. मीच त्याला म्हणते की 'तू तुझा संसार बघ. तू सुखानं जग. घर सोडल्यापासून मला खायला-प्यायला माझी आधीची पोरंच देताहेत. आता मला काय गरज आहे? त्यांनाही मीच पोसलंय की.

शोभाताई : तुमच्या मुलांच्यात आणि तुमच्यात या सगळ्यामुळे कटुता निर्माण झाली का?

नजूबाई : नाही. कारण त्यांचा बाप कसा आहे, हे पोरांना चांगलं माहीत आहे. पोरांनाही बराच संघर्ष करावा लागला. आमचं घर पेटवण्यापर्यंत गोष्टी घडल्या होत्या. पण लहान मुलगा खूप धाडसी (खतरा) आहे. मला दोन

मी रामायणाचे खंड वाचले. सीता ही काही जनकाची मुलगी नव्हती.
ती भूमातेची कन्या होती. तिला आत्महत्या करायला लावली तेव्हापासून काही लोक
असं म्हणतात की सीतेनं आत्महत्या केल्यापासून स्त्रियांच्या आत्महत्येची प्रथा पडली.
आमच्यात तशी पद्धत नाही. आदिवासींमध्ये आत्महत्या करण्याची क्वचित एखादी घटना दिसते.
आता एवढ्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, पण आदिवासी शेतकऱ्यानं आत्महत्या
केली नाही. सगळ्यात नाडलेला, पिळला जाणारा समाज तर तोच आहे.

मुलगे आहेत. एक पोलीस आहे, एक शेती करतो. एक मुलगी आहे. ही तिन्ही पोरं माझ्याच बाजूनंच आहेत. बापाच्या बाजूनं नाही. मला शेती आहे. थोडीशी बागायत आहे. पोरं सगळं धान्यधुन्य इथं आल्यापासून आणून देतात. त्यांच्या बापानं सात बायका केल्या. त्याला वेगळे केले. शेत वेगळे दिले. मुलांची लग्ने झाली. माझी नातवंडं मोठी झालीत. नात आता एमएस्सी झाली आहे. तिच्यापेक्षा मोठा नातू शिक्षणासाठी मुंबईला आहे. माझ्या मुलांनी माझं मन एका शब्दानंही कधी दुखावलं नाही. कॉ. पाटील यांच्या प्रेतयात्रेलाही ते सगळे आले होते.

शोभाताई : मला शपांबद्दल खूप आदर आहे. पण तरीही शपांनी पुरुषीसत्ता कधी तुमच्यावर गाजवली का? किंवा त्यांनी तुमच्यावर कधी प्रभुत्व गाजवलं का?

नजूबाई : शपा पुरुषसत्तावादी कधीच नव्हते. ते पूर्णपणे महिलांना स्वातंत्र्य देण्याच्या विचाराचे होते. म्हणूनच तर त्यांनी एकेक महिलांमधील गुण हेरून त्यांना घडवत चळवळीच्या मुख्यप्रवाहात आणले. ते जर पुरुषसत्ताक दृष्टीने वागले असते तर चळवळीत मोठ्या संख्येनं बायका आल्याच नसत्या. ज्या लोकांनी बायकांवर बंधनं आणली त्यांना त्यांनी नेहमीच समजावून सांगितलं. स्त्रियांची गुलामगिरी किती आहे, हे ते लोकांना सांगत असत. ते स्वत:ला 'मी शिवाजीमहाराजांचा, फुल्यांचा, आंबेडकरांचा, शिष्य आहे' असंच ते मानत असत.

झेबा : ते चळवळीच्या पातळीवर झालं, पण तुमच्या बाबतीत व्यक्तिगत ते असं वागले का?

नूजबाई : नाही नाही. कधीच वर्चस्ववादी वागले नाहीत. ते नेहमीच स्त्रीमुक्तीच्या बाजूनं बोलत राहिले. माझ्या बाबतीतही त्यांची अशीच वागणूक होती. फक्त चळवळीच्या कामाच्या बाबतीत माझ्याकडून काही चुकलं तर ते बोलायचे. इतर बाबतीत कसलंही वर्चस्व म्हणून अजिबात नाही. हां, चळवळीच्या कामाच्या संदर्भात आणखी काय काय केलं पाहिजे, याबाबतीत तुझं अमुक इथं चुकतंय, तू हे हे शिकलं पाहिजेस, कारण आपण कोणत्या समाजात राहतो, याबद्दल ते बोलत. याशिवाय दुसरं नाही. ते मला खूप समजावून सांगत असत.

झेबा : तुम्हाला पुढं शिकावंसं वाटलं नाही का?

नजूबाई : शिकावं असं खूप वाटलं. पण करणार काय? या अशा ताणाताणीमध्ये, चळवळीच्या कामामध्ये आपल्याला शिकता येईल का? काही दिवस मला इंग्रजी शिकवण्यासाठी त्यांनी एक शिक्षक नेमला होता. पण माझंच डोकं चालत नव्हतं. मीच त्याबाबतीत पुरेशी तयार नव्हते.

झेबा : पुस्तकं लिहायला तुम्हाला कसं सुचलं?

नजूबाई : त्यांनीच पुस्तकं लिहायला शिकवलं. त्यावरही टीका झाली की चौथी शिकलेली स्त्री काय लिहिणार? ढमाले वगैरे लोकांनी माझ्यावर खूप टीका केली ते म्हणत की ''पाटीलच तिला लिहून देतात.'' खरंतर अशा लोकांनी माझं हस्तलिखित पाहून घ्यावं. त्याला मी उत्तर दिलं की माझा जन्म १९५० सालचा आहे. माझ्या आजोबांच्या वेळी मानमोडी नावाचा रोग आला होता. तेव्हा एक बाई आली होती, जिचं नाव सलाबाई होते. तिच्या दर्शनाला लोक तापी नदी ओलांडून जात असत. इकडे खूप लोक मरत होते, असा तो मानमोडी रोग होता. माझी 'तृष्णा' ही कादंबरी मी तिथूनच सुरू केली.

शरद पाटलांनी १९७०-७१ मध्ये आदिवासींची

जी चळवळ सुरू केली, तो काळ पाहता त्यांनी त्या आधी आदिवासी जमातींचं जीवन पाहिलं असावं असं मला वाटत नाही. त्या आधी माझा-त्यांचा परिचयसुद्धा नव्हता. त्यामुळे त्यांनी माझं कुटुंब, माझं-आदिवासींचं जीवन पाहणं शक्य नव्हतं? हे पाहता मी कादंबरी केव्हा लिहिली हेही पाहिलं पाहिजे ना. त्यामुळे ज्याला हस्तलिखित पाहायचंय त्यानं ते पाहून घ्यावं. हां, एक आहे की माझं लिखाण-अक्षर वेडंवाकडं आहे. त्यात लेखनविषयक चुकाही भरपूर असतील. पण तरीही मी ते ३-३ वेळा लिहिलेलं आहे. आता प्रेसकॉपी म्हणून ते प्रकाशनाला द्यायचं तर शुद्ध असलं पाहिजे ना, म्हणून मग शपांनी ते त्यांच्या शुद्ध अक्षरात लिहिलं. कारण ते शुद्धलेखन वगैरे मला काही जमण्यासारखं नव्हतं.

शोभाताई : शपा एक विद्वान, प्रगल्भ, समर्थ असं व्यक्तिमत्त्व होतं. त्यांच्यामुळे तुम्हाला एक नाव मिळालं. त्यांच्यामुळं तुम्ही प्रतिकूल स्थितीतून बाहेर आलात. तेव्हा जे काही तुमचं म्हणून आहे त्याच्यावर त्यांचीच सावली आहे का? आणि कधी असं वाटत नाही का की हे माझं स्वत:चं आहे वगैरे...

नजूबाई : नाही नाही तुम्ही म्हणता तसं अजिबात वाटत नाही. त्यांची सावली आहेच की. त्यांनी जे दिलं तेच घेऊन मी पुढं जातेय. त्यामुळे मी हे मान्यच करते की, जे काही माझ्या हातून चांगलं घडलं ते संपूर्णपणे त्यांच्यामुळेच घडलं. ते फक्त माझंच आहे, असं मी कधीच मानलं नाही. अजूनही मानत नाही. आता बहुतेक लेखक असं म्हणतात की 'ही माझी कादंबरी, हे माझं पुस्तक' वगैरे वगैरे अरे, बाबा तू लिहिलंस, पण ते समाजाला पुढं ठेवून लिहिलंस ना. त्यातल्या घटना, पात्र असं सगळं काही तू समाजाकडून घेतलंस, मग त्यात तुझं असं काय आहे? पण मी असं म्हणत नाही. मानत नाही. कारण मी माझ्या कादंबऱ्या, कथासंग्रह हे जे काही लिहिलं ना, ते समाजाला देऊन टाकलं आहे. आता ते माझं असं राहिलेलं नाही, असं मला वाटतं. ते मी लिहिलं असलं तरी समाजाला पुढं ठेवूनच लिहिलेलं आहे. हे माझं ठाम मत आहे.

आपण जर सत्य लिहिलं असेल तर त्याचा त्रास का वाटून घ्यायचा? लोकांना काय म्हणायचं ते म्हणू द्या. कधी तरी त्यांनाही सत्य कळेलच. ते आज बोलतील, उद्या नाही बोलणार. मला लिहायला शरद पाटलांनीच प्रोत्साहन दिलं. मला तर 'साहित्य म्हणजे काय' यातलं ओ की ठो कळत नव्हतं. अधूनमधून ते मासिकं, कादंबऱ्या वगैरे पुस्तकं वाचायला आणून देत असत. त्यामुळे मी बरंच वाचन केले. बिरसा मुंडापासून ते तंट्या भिल्लापर्यंत बरंच काही वाचलं. आनंद यादवांची 'झोंबी' वाचून माझ्या डोक्यात लख्खं प्रकाश पडला. ती वाचून मी मानसिकदृष्ट्या खूप उलथीपालथी झाले. खूप अस्वस्थ झाले होते. पण काय करू हे कळत नव्हतं. 'झोंबी'मुळे कळलं की हे तर शेतकऱ्यांचं, ग्रामीण लोकांचं जीवन आहे. आणि यापेक्षा आमचं जीवन तर खूपच भयानक, प्रतिकूल, हालअपेष्टांनी भरलेलं आहे. मग मी माझं आणि मी पाहिलेलं, अनुभवलेलं जीवन का लिहू नये? माझ्या मनात खूप गोंधळ व्हायला लागला की कुठून सुरुवात करावी म्हणून. एक दिवस माझं मन बंड करून उठलं आणि मी लिहायला बसले. एकदा लिहून झालं. त्यात पुन्हा दुरुस्त्या करून ते ३-३ वेळा लिहून काढलं. याबाबतीतलं मला सगळं मार्गदर्शन शरद पाटलांनी केलं. माझं सर्व लेखन नीट व्याकरणदृष्ट्या तपासणं, पाहणं आदी बऱ्याचशा गोष्टी त्यांनीच केल्या. या सगळ्यात त्यांचं योगदान खूप मोठं आहे.

कारण माझं शिक्षण फक्त चौथीपर्यंत झालेलं. मी शुद्ध कुठून लिहिणार? वेडंवाकडंच लिहिणार. त्यामुळं लोक काय बोलतात, याकडे मी फारसं लक्ष दिलं नाही.

झेबा : तुम्हाला कधी वाटलं होतं का की फक्त चौथी शिक्षण घेऊन आपण इतकं चांगलं लिहू शकतो?

नजूबाई : ज्यांनी माझ्यावर, माझ्या लेखनावर टीका केली, त्या लोकांना याची लाज वाटायला पाहिजे ना असं बोलताना. मी चौथी शिकलेली बाई यावर काय बोलणार?

शोभाताई : तुम्ही म्हणता की तुम्ही दोघं एकत्र राहिलात ते वैचारिक गरजेपोटी. तुमच्यामध्ये शारीरिक नातं नसलं तरी नंतर तुम्ही विवाह केलात. सर्व बंधनं पाळलीत. मग तुमच्या दोघांमधलं नातं नेमकं कसं होतं? म्हणजे ते तुम्हाला कधी मित्र वाटले का? की

वडीलकीच्या नात्यातून पालक वाटले का? गुरु वाटले? त्यांना रागावून बोललात का किंवा नात्यातून तसा अधिकार तुम्हाला मिळाला होता का?

नजूबाई : त्यांनी असं मानलं होतं की तू माझी पत्नी म्हणून नाहीस तर आई आहे, तू माझी बहीण आहेस आणि स्त्रीमधली जी अनेक नाती आहेत ती सर्व आम्ही - म्हणजे मी व पाटलांनी मानली होती. त्याच पद्धतीनं मीही ते माझे गुरू, पती आणि एक महान नेता-विचारवंत, मला नेतृत्व देणारा असे मानत आले. मला त्यांची विद्वत्ता, वैचारिकता जास्त भावली. माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे मला त्यांच्याकडून मिळायची.

अरुण : त्या काळात तुम्ही स्वत: स्त्रियांची काही आंदोलनं केली होती का?

नजूबाई : आम्ही जे काही केलं ते पक्षाच्या माध्यमातून केलं. आंदोलनंही केली. पण पक्षाची जबाबदारी माझ्यावर असायची. आपले मुद्दे, विषय तळागाळातल्या माणसापर्यंत नीटपणे पोहोचवणं, समजावून सांगणं, ही जबाबदारी माझ्यावर जास्त होती.

एकूण नवीन इतिहासाची मांडणी करताना शपांनी आधी बुद्ध, दिङ्नाद, फुले, मार्क्स, आंबेडकर यांच्या विचारांचा अभ्यास करून आता काय करायला पाहिजे, ही मांडणी केली. त्या काळातील समाज कोणता होता? वर्ण, जात, वर्ग काय होते? हे त्यांनी त्यांच्या लेखनातून मांडलंय. पण आता चौथ्या खंडामध्ये स्त्रीसत्ता-मातृसत्तेकडे ते गेले. मग स्त्रीसत्ता काय होती व मातृसत्ता काय होती, त्याच्यामध्ये समता होती का, स्वातंत्र्य होते का आदी बरंच संशोधन त्यांनी केलं. त्या पद्धतीनं त्यांनी पक्षामध्ये लोकसभा 'ग्रामीण कष्टकरी सभा,' 'सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी महिला सभा' आदी समित्या स्थापन केल्या. या स्त्रीसत्ता-मातृसत्तेमध्ये जशी पदं आहेत त्याप्रमाणे इथल्या महिलासभेमध्ये तशी पदं ते दाखवतात. निऋतीच्या मातृसत्तेतील पदे त्यांनी पक्षामध्ये वापरली. त्याचे प्रयोग केले. म्हणजे सभा, समिती, ग्रामीण कष्टकरी सभा म्हणजे स्त्रीपुरुष एकत्र. 'सत्यशोधक कष्टकरी महिला सभा' म्हणजे नुसत्या महिलांची सभा असे. त्यांनी स्त्रीसत्तेचे वेगळे नीतिनियम घेतले आहेत. आणि तशा पद्धतीने पक्षात त्यांचा समावेश केला आहे.

शोभाताई : शपांमुळे तुम्हाला प्रेरणा मिळाली, हे खरं. पण मग तुमच्यामुळेही त्यांना प्रेरणा मिळाली असं, ते कधी म्हणाले होते का?

नजूबाई : हो. ते मला म्हणत की ''नजू, तू अनपढ बाई. जेमतेम चौथी शिकलेली. पण मला तुझ्यापासून खूप शिकायला मिळालं.'' आणि हे केवळ ते फक्त माझ्याशीच बोलत असं नाही, तर इतरांनाही ते असंच सांगत की 'मला तिच्याकडून खूप काही शिकायला मिळालं'. माझ्या कादंबरीतून मी जे टिपलं आहे, ते त्यांना चळवळ करताना माहीत नव्हतं. माझ्या लिखाणामुळे ते त्यांना समजलं. एकदा ते कुणाला तरी म्हणाले होते की ''मी आदिवासींच्या अनेक चळवळी केल्या, पण आदिवासींचं खरं जीवन मला कळलं नव्हतं. ते मला नजूकडून कळलं. खरंतर तुम्ही लोकांनी जास्तीत जास्त लिहिलं पाहिजे.'' हे ते जाहिररीत्याही मान्य करत.

शोभाताई : तुमच्यासोबत राहिल्यानं त्यांची जी बदनामी झाली, त्याचा त्यांना कधी त्रास झाला का?

नजूबाई : नाही. त्यांना त्याचा कधीच त्रास वाटला नाही. ते म्हणत की 'लोकांना किती बदनामी करायची ती करू देत. आपण चुकीचं किंवा वावगं काही केलेलं नाही. एक दिवस येईल, त्या दिवशी सगळ्यांच्या समोर आपण लग्न करू. आपण चळवळीच्या कामासाठी एकत्र आलो आहेत.' मग मीही ते सर्व मनातून काढून टाकलं. यातून आम्ही काही वावगं केलं नाही. पण याचं निमित्त करून काही मूर्ख लोकांनी चळवळीत फाटाफूट केली.

या प्रकरणात लोकांची पण मोठी चूक झाली की शपा यांच्यासारख्या माणसानं स्वत:च्या जीवाची पर्वाही न करता आपल्याला उभ केलं, त्या माणसाला विसरून दुसऱ्याच कुणाचं बोट धरून फिरायचं हे त्यांना समजत नव्हतं काय? ही त्यांची फार मोठी चूक आहे. पण तरीही पाटील म्हणायचे की ''जाऊ दे, ते माझे शिष्य आहेत. हे काम असं उभं केलं आहे. पण एक काळ असा येईल की त्यांना ते सगळं समजेल. पण तो काळ त्यांना बरबाद करून जाईल. वेळ निघून गेलेली असेल.''

पण या लोकांनी पेपरमध्ये असं उठवलं की, 'शरद

पाटलांनी त्यांच्या मालमत्तेमध्ये नजूबाईला अर्धा हिस्सा द्यावा.' पण मला कुणाचं मन दुखवायचं नव्हतं. मी म्हटलं की ''मला कोणाची मालमत्ता नको की काही नको. माझं जे भरपूर होतं तेच मी सोडून आलेय, मग मी तुमचं आणखी घेऊ कशाला? मला काय करायचंय त्याचं? माझी मुलं समर्थ आहेत मला पोसायला.''

मला काही नको आहे. माझ्या मुलांची चारचार घरं माझ्यासाठी आहेत. मला माझी मुलं साडेतीन हाताचा खड्डा करून देतील. आपण सगळे बघतोच की माणूस निघून जातो, पण कौटुंबिक, खासगी वा वडिलोपार्जीत वस्तू तिथंच राहतात. तेव्हा कोणीही असं वागू करू नये. हा जो तणाव निर्माण झाला होता, तो आता निवळलाय. मला माझं काम अर्धवट सोडायचं नाहीय. ते मला पूर्ण करायचं आहे.

पण वर्तमानपत्रातून तर आणखी खालच्या पातळीवर जाऊन त्यांनी बदनामी केली की ''शरद पाटील पक्षाची मालमत्ता खाऊन बसला...'' वगैरे वगैरे. अशी पत्रकं काढून ढमाले आणि श्रावण देवरे यांनी बदनामी केली. आता ती मालमत्ता कुठं आहे? ती काय शरद पाटील सोबत घेऊन गेले? आणि मी तरी ती घेऊन जाणारेय का? मला तरी असं किती जगायचंय? ह्या असल्या भानगडी करण्यापेक्षा शरद पाटलांसारखी चळवळ उभी करून दाखवा ना म्हणावं त्यांना.

शोभाताई : वयाची ४० वर्षे तुम्ही चळवळीत घातली. तेव्हा आता चळवळीचं मूल्यमापन तुम्ही कशा प्रकारे कराल?

नजूबाई : चळवळीतून मला खूप शिकायला मिळालं ना. वाचायला मिळालं. माझा विश्वास वाढला. आहे त्याच्या पुढं जाऊन त्यांचं अपुरं राहिलेलं काम माझ्यापरीनं पूर्ण करायचा प्रयत्न राहीन.

चळवळी संपलेल्या नाहीत. नव्यानं निर्माण झालेले अजून भरपूर प्रश्न आहेत. ते साहित्याच्या पातळीवर असो वा चळवळीच्या पातळीवर असोत. ज्याला करायचंय त्याच्यासाठी भरपूर काम पडलेलं आहे. परंतु जुन्या लोकांनी स्वत:ची आणि कशाचीच पर्वा न करता स्वत:ला झोकून देऊन काम केलं, तसं आताचे कार्यकर्ते करत नाहीत. ते स्वत:ला झोकून द्यायला तयार नाहीत. त्यामुळं ठप्प झाल्यासारखं वाटतंय.

शोभाताई : आता एखादी नजूबाई चळवळीतल्या एखाद्या पाटलाबरोबर किंवा एखादा पाटील नजूबाईबरोबर उभं राहू शकेल अशी तरी स्थिती कुठंय?

नजूबाई : तशाप्रकारची वैचारिक पातळी समजावून घेणारे बौद्धिकदृष्ट्या प्रगल्भ तरुण लोक पाहिजेत ना. शपांसारखा त्याग करणारे लोक हवेत. वैचारिक पातळीवर काही लोक एकमेकांना जाणून घेतात; मात्र ते कृतीमध्ये कमी पडतात. त्याग करायला, बलिदान करायला या लोकांची हिंमत नसते, असं मला सध्या खूप जाणवतं.

शरद पाटलांचा एकंदर वारसा ते अर्धवट टाकून चालतील, की पूर्ण घेऊन चालतील, हाही एक प्रश्नच आहे. शरद पाटलांनी काय कष्ट उपसलेत, काय काय धडपड केली, याची मी स्वत: साक्षीदार आहे.

वैदिक परंपरेतील वाङ्मय, पाली भाषामधलं वाङ्मय असं काय काय ते वाचायचे. त्याचा अर्थ वेगवेगळ्याप्रकारे लावून बघायचे. ती भाषा-तो विचार-ते तत्त्व नेमकं काय आहे, हे समजून घ्यायचे. मगच लिहायला बसायचे. हे काम वाटतं तसं सहजसोपं नाहीय. ते खूप कठीण आहे. ते वेद, पुराणं, तत्त्वज्ञानं वगैरे सगळं साहित्य समोर मांडून लिहीत बसायचे. मला त्यातलं काही कळायचं नाही. त्यांची बुद्धिमत्ता प्रचंड होती. अशा पद्धतीनं ते त्या सगळ्याचा अभ्यास करून त्याचा अर्थ लावत असत. इथल्या ब्राह्मणी परंपरेनं काय काय करून ठेवलंय, हे मला त्यांच्यामुळं खूप जवळून पाहायला मिळालं. त्यांनी जे आयतं हे सगळं करून ठेवलंय तेही वाचायला आत कुणी फारसं पुढं येत नाही.

अरुण : शपांसारखा विद्वान माणूस सामान्य माणसांशी कसा बोलायचा?

नजूबाई : शपा प्रचंड विद्वान. आपण सामान्य माणूस. तेव्हा त्यांच्यापुढं काय बोलावं, असा पेच मला पडायचा. गेले तीन वर्षं ते आजारी असल्यामुळे ते इथंच राहत होते. त्या काळात मी त्यांना खूप जाणून घेतलं. त्यांची बोलणं, लिहिणं याबद्दल मला खूप जाण येऊ लागली. तुला येतंय हे असं? असं ते विचारायचे. त्यावर

'मला थोडं थोडं समजतंय,' असं मी म्हणायचे.

सामान्य माणसाला ते त्याच्या भाषेत समजावून सांगायचे. म्हणजे सामान्य माणसावर आपल्या विद्वत्तेचं ओझं त्यांनी कधी टाकलेलं मी पाहिलं नाही. अनेक आदिवासी कार्यकर्ते, अशिक्षित लोक त्यांच्यासमोर भडाभडा बोलायचे, त्यांच्या भाषेत ते बोलायचे. पण पाटील त्यांना समजून घेत, त्यांच्याप्रमाणे बोलत असत. त्यांचं म्हणणं ऐकून घेत.

अरुण : शरद पाटलांचे काही वीक पॉईंट्स कोणते?

नजूबाई : त्यांचे तसे कोणतेच वीक पॉईंट्स नव्हते. ते अगदी शांतपणे बोलायचे, चर्चा करायचे. पण त्यांना एक संताप असा होता की ते दलितांवर जास्त रागवायचे. कारण खैरलांजीसारखे दलितांवरिल अत्याचार वाढत आहेत, याबद्दल त्यांना संताप यायचा. तुम्ही कशा प्रकारे संघटना चालवताय? तुमच्या संघटना हे जातीचे प्रश्न का घेत नाहीत? राज्यघटनेनं काय दिलं? ही जातिव्यवस्था मोडण्यासाठी आंबेडकरांनी घटनेमध्ये काय ठेवलं? हजारो वर्षांच्या जाती-परंपरेला कोणीच हात घालत नाही. कोणीच ही परंपरा मोडण्याचं धाडस करीत नाही. जातिबाह्य प्रेमविवाह केला की, त्यांला दगडानं ठेचून मारतात. हे जातीचे भयानक विष मोडण्यासाठी आंदोलन का करीत नाही? का ते टाळता? ही विषमता मोडण्याचं टाळलं तर या देशावर भगवी सत्ता येईल, हे भाकीत त्यांनी केलं होतं आणि त्याप्रमाणे ती सत्ता आता आलीय. अशा अनेक बाबींमुळे ते रागावायचे. पण त्यांचा हा राग सात्विक असायचा. यावर कार्यकर्तेही त्यांना समजून घ्यायचे की आपली यात चूक आहे. आपण यासाठी ठोस काही करत नाही. ही सत्य परिस्थिती आहे.

आदिवासींमध्ये जाती नाहीत. जमाती आहेत. पण तिथंसुद्धा आदिवासींपर्यंत जातिव्यवस्थेचा रस म्हणजे उच्चनिचता पोहोचली आहे. रोटी व्यवहार नाही-बेटी व्यवहार नाही. जमाती आहेत, पण जातिव्यवस्था नाही, तरी तिचे नियम तुम्ही पाळता. यासाठी पाटलांचं म्हणणं असं होतं की आंतरजातीय विवाहाचा कायदा झाला पाहिजे. घटनेमध्ये अनेक अत्याचारविरोधी कायदे झाले. तरी अत्याचार थांबले का? बलात्काराच्या घटना तर रोजच्याच झाल्या आहेत. बाई कुठं सुरक्षित आहे?

आधी स्त्रियांची मुक्ती म्हणजे समाजाची पूर्ण मुक्ती, असे शरद पाटील म्हणत. याचा अर्थ असा नव्हे की, पुरुषांच्या विरोधात स्त्रीमुक्ती संघटना आहेत. पण स्त्री मुक्त झाल्याशिवाय पुरुष मुक्त होणार नाही, असं त्यांचं म्हणणं होतं. दोघंही गुलाम आहेत. कुठेही जा स्त्रीपुरुष दोघेही विषमतेचे गुलाम आहेत. बाई तिहेरी आहे, तर पुरुष दुहेरी तरी असेल, एकेरी तरी असेल, पण गुलाम आहेच.

शोभाताई : आदिवासी म्हणून जीवन गैर आदिवासी जीवनापेक्षा वेगळं कसं आहे?

नजूबाई : माझ्या आईचा जो कौटुंबिक संघर्ष होता तो उपासमारीचा होता. उपासमार इतकी होती की नुसती महुची फुलं खायची, त्याची दारू प्यायची, भाजून-शिजवून मिळेल ते खायचं याच्या पलीकडं दुसरं काही नव्हतं. त्यामुळे आमचा पहिला संघर्ष भूकबळीचा होता. भयाण दारिद्र्य. कुठं रोजगार नाही, कसला धंदा नाही. काही नाही. उठायचं, जंगलात जायचं. फळं-फुलं खाऊन परत यायचं, याच्या पलीकडे काही नव्हतं. या भूकबळीमध्ये आईनं जीवतोड संघर्ष केला. आम्ही दहा भावंडं आणि आई-बाप असे १२ जण आमच्या कुटुंबात होतो. कसं ओढलं असेल ते आईनं?

या संघर्षाला तोंड देत देत असताना माझ्या वडलांनी भिल्ल समाजाची बाई ठेवली. तेव्हा माझा जन्मही झाला नव्हता. ती भिल्ल बाई विधवा होती. हा प्रकार 'तृष्णा'मध्ये आला आहे. मला बापाचं गाव कोणी सांगू शकत नाही. आईचं गाव कोणी सांगू शकत नाही. मग आई कुठून आली असेल, बाप कुठून आला असेल याचा पत्ता नव्हता. मग आईला सासरी आली. आईच्या पाठीमागे तीन भाऊ होते. हे तीनही भाऊ आईनं सांभाळले. भाजीपाला जे मिळेल ते देऊन त्यांना वाढवलं. तिच्या पोरांनाही वाढवलं. तरुण वयात आल्यावर ते तिघे मामा घरजावई गेले. तिथं ५-५ वर्षे त्यांच्या सासरी राबले आणि आपापल्या बायका घेऊन परत आईकडे आले. या कुटुंबासह आईनं उपासमारीचा खूप संघर्ष केला. आणि याच काळात बापानं ही भानगड केली. मग काय करावं? यावर

जातपंचांनी काय केलं ते सर्व 'तृष्णा'मध्ये आलं आहे.

उपासमारीची ही परंपराच चालत आली होती. आमची २०-२२ एकर जमीन आहे. परंतु तिथं शेती करायला ना भिवारं, ना बैल, ना काही औजारं. मग कोण करेल शेती? पोरं वाढले ते सालदार गेले. कोणी गुराखी गेला, कोणी घरजावई गेला, कोणी काय केलं. सगळे निघून गेले. तरीही आमचं दारिद्र्य संपत नव्हतं. अशात बापाचं हे प्रकरण उठलं. आमची 'मावची' जमात आणि ती सावत्र आई 'भिल्ल.' मग माझ्या कारभारी मामानं ते जेमतेम मिटवलं. परंतु गावातले शेतकरी आम्हाला मजुरीलाही बोलावत नव्हते. विहिरीवर पाणी भरू देत नव्हते. आम्हाला वाळीत टाकल्यासारखं केलं. काही वर्षांनंतर शाळा खेडोपाड्यांत निघाल्या. आम्हाला वाळीत टाकलं तेव्हा मी लहान होते. नंतर मी शाळेत गेले. शाळेत जायचं हे आम्हा कोणालाच माहीत नव्हतं. मी मोठ्या बहिणीची पोरं सांभाळत होते. एक दिवशी मी शेतात चालले होते आणि मला पोरांनी धरून आणलं. त्या दिवसापासून मी शाळेत जायला लागले. तरीपण मला हा भेदभाव का असेल, ही उपासमार का असेल हे काही कळत नव्हतं. ते जाचत होत, पण कळत नव्हतं. यावर काही उपाय असेल का?

असं करत करत ही जाण येत होती की उच्चनीचता देवांनी निर्माण केली असेल का? जे दारिद्र्य आहे हेही नैसर्गिक असेल का? मग काही श्रीमंत आणि बाकीचे गरीब असं का झालं? पण मला याचं कोडं उकलत नव्हतं. मला तो विषय सारखा टोचत होता, मन संघर्ष करत होतं की असं का? आता भिल्ल असो, कोकणी असो, मावची असो, वळवे-पाडवी कुणी का असेना, माणुसकीतून माणूस आहे. पण ही जी विषवल्ली आहे ती का आहे, हे कळत नव्हतं. माझ्या आत संघर्ष चालूच होता- या उच्चनीचतेबद्दल. पण मार्ग सुचत नव्हता.अशा मानसिकतेमध्येच मी चौथीपर्यंत शिकले आणि शाळा सोडून दिली. मग मला सासरी पाठवलं. तिथं गेले तर तिथंही हेच दारिद्र्य. तिथंही कंदमुळांपलीकडे काही नव्हतं. असा संघर्ष करत करतच मला तीन मुलंही झाली.

शरद पाटील आमच्या भागात चळवळीसाठी आले. त्यांचं भाषण ऐकून मला समजलं की, हे दारिद्र्य, ही उच्चनीचता नष्ट होऊ शकते. जीवन बदलू शकतं. जातिव्यवस्थेचा हा काय रोग आहे, तो कळाला.

शपांचं भाषण ऐकलं आणि माझं मन मोकळं झालं. उत्तर मिळालं आणि मी चळवळीकडे ओढली गेले. माझ्या आईनं इतकी भावंडे आणि मुलं पोसणं ही तितकीशी सोपी गोष्ट नाही. आईनं खूप संघर्ष केला. माझी सख्खी आई आणि सावत्र आई या एकत्र बसायच्या. काम करायच्या. बोलायच्या. पण कधी भांडण नाहीत.

माझी आई तशी अडाणी होती. माझ्या कुटुंबाला काही तरी नैसर्गिकपणे कळत असावं या भेदभावाबद्दल, की आपण सगळी माणसं आहोत तेव्हा हे भेदभाव करणं चुकीचं आहे. त्यांच्या जाणीव-नेणिवेमध्ये हे काही तरी असणार. कारण त्यांना तशी जाण झाली नसती तर त्यांनी हे केलंच नसतं. जवळ जवळ माझ्या कुटुंबातील ८-१० जणांनी भिल्लांमध्येच विवाह केला आहे. मावचीपेक्षा भिल्ल खालचे मानले जातात. कोकणी वरचे मानले जातात. पण आजही कोकणी समाजात असे व्यवहार होत नाहीत. आता आतापर्यंत रोटी व्यवहार होतो, पण बेटी व्यवहार होत नाही. पण माझं सगळं कुटुंब भिल्लांकडे आहे. आजही भिल्ल आमच्याबरोबरच आहेत. माझ्या वडलांपासून हा भेदभाव न करण्याचा पायंडा पडला.

त्यावेळी दलित समाजाचे काही लोक मासे पकडायचं साहित्य घेऊन खेडोपाडी यायचे. ते द्यायचे आणि त्याबदल्यात त्यांना धान्य द्यायचं, असा व्यवहार होता. माझी आई दलित समाजाच्या माणसांना ओट्यावर बसवायची. यांना पाणी-जेवण असं असेल ते द्यायची. पण आमच्या समाजातील इतर जण त्यांना कधीच जवळ करायचे नाहीत. त्या अडाणी माउलीला काय समजत असेल? ती त्यांना ओट्यावर बोलवायची, जेवण वाढायची आणि पाणी द्यायची, विरा द्यायची (आमच्याकडे धान्याला विरा म्हणतात). माणुसकीचं असं ती काही तरी ती करत होती. तिला तेव्हा कळलं नसेल की आपण जाती तोडायचं काम करतोय. पण तशी तिची मानसिकता काम करत होती.

आमच्या जातीच्या विरोधात जाऊन माझ्या भावा-

बहिणींनी भिल्लच बायको-नवरा केले. आता तसा कोणताच भेदभाव राहिलेला नाही. गावात भिल्ल आणि मावची अशा दोनच जमाती असून त्यांचं कूळ एकच आहे- 'देसाई'. आमच्या गावात सगळेजण या 'देसाई' कुळातलेच आहेत. एकही माणूस दुसऱ्या कुळाचा नाही. यावर शरद पाटलांचं विचारमंथन चाललं होतं, की आदिवासींमध्येही देसाई, देशमुख हे कसे काय आहेत म्हणून. मग पूर्वीच्या काळातील हे लोक कोण असले पाहिजेत? देसाई, सरदेसाई हे आदिवासींमध्ये कसे काय?

शोभाताई : पाटील तर उच्चकुळातील असल्यामुळे तुमच्याकडच्या लोकांची काय प्रतिक्रिया होती?

नजूबाई : आमच्या समाजातील लोकांचा तसा काही विरोध वगैरे नव्हता. कारण आम्ही अलिप्तच राहत होतो. आम्ही कायद्याच्या बाहेर पाऊल टकलेलं नव्हतं. त्यामुळे उच्चनीचतेबद्दल प्रतिक्रिया उमटलीच नाही. इतरांनीच बदनामी केली. या व्यतिरिक्त ते कुणी पाटील आणि मी कुणी आदिवासी, अशी टीका वा टोमणा मला कधीही ऐकायला मिळाला नाही. आमच्या समाजाकडूनही नाही आणि इथं आजूबाजूकडूनही नाही. आमच्या चळवळीतल्या आणि त्यातही शपांनीच ज्यांना उभं केलं त्या लोकांनीच हे केलं. त्याच लोकांनी पक्ष फोडला. त्याच लोकांनी पाटलांच्या पाठीत खंजिर खुपसला.

अरुण : असं कुठलं काम तुम्हाला करायचंय जे शपांचं राहिलेलं आहे?

नजूबाई : चळवळीचं काम. त्यांचं वैचारिक काम तर मी पूर्ण करू शकत नाही, कारण ते माझ्या आवाक्यातलं नाही. मोठमोठे विद्वान-विचारवंत यांना ते जमत नाही तिथं मी काय करणार? पण चळवळीचं काम आहे. लोकांचे प्रश्न सुटलेले नाहीत. जमिनीचा प्रश्न तसाच आहे. आता ४० वर्षं होऊन गेली, पाटील संपून गेले, पण अजून आम्हाला ७/१२ उतारा मिळालेला नाही. त्याच्यासाठी मला खटपट करावीच लागेल. आता सरकार काय करतं? कायद्याच्या बाजूकडेही जावं लागेल. ते काम निपटावं लागेल. परंतु चळवळीतून लोकांचे प्रश्न मी सोडवू शकते. हे काही मला जड जाणार नाही. आजपर्यंत करत आले. पुढे पण करायचे आहे.

आता काँग्रेसची सत्ता गेली. एकूण भगव्यांची सत्ता आली. आणि काही ठिकाणी वाईट घटना घडू लागल्या आहेत. धुळ्याजवळही एक घटना घडली आहे. जे फासेपारधी होते त्यांनी जमीन साफसूफ केल्यामुळे त्यांना खूप मारझोड केली. तिथं मजूर म्हणून माझ्याच माहेरची माणसं होती. त्यांनी मला सांगितलं. त्यांना खूप मारलं. पण ही बातमी वर्तमानपत्रांत आलीच नाही. आणखी कुठंतरी असंच झालं. या संघर्षातून लोकांचं धीर खचणार. तिथं आपण हस्तक्षेप करण्यासारखं काहीच उरणार नाही. त्यामुळे वेळप्रसंगी इतर सर्वांना एकजूट करावी लागेल. वैचारिक पातळीवर नसली तरी सार्वजनिक कामाच्या निमित्तानं करावी लागेल. अशी वेळ येईलच. हा काळ थांबणार नाही. कारण जंगलांची प्रचंड नासाडी झाली आहे. सगळी नैसर्गिक पातळी किती खाली गेली आहे. काय होणार? सुरुवातीलाच पाटलांनी सांगितलं होतं की जमिनी फेडा (कसा), शेतीही करा आणि झाडंही लावा. आम्ही जे लावलंय ते जंगल खूप मोठं आहे. शिवाय व्यक्तिगत जंगलं ज्याची त्यानं लावली आहेत. मग वनखातं एवढे कोट्यवधी रुपये खर्च करतं, पण त्यांनी जंगलं कुठं लावली आहेत? कोणतं झाड कुठं नि कसं लावलं पाहिजे याची तिथल्या लोकांनाच माहिती नाही. आता आपल्या दारापुढे ही शो ची झाडे आहेत, ती काही कामाची आहेत का? नाही. पाटलांनी असं म्हटलं होतं की अतिक्रमणधारकांना त्यांची जमीन मोजून द्या. जंगल लावायला त्यांच्याजवळ द्या आणि त्या जंगलाचं काय उत्पन्न निघेल, त्याचा निम्मा वाटा त्यांना द्या.

आदिवासी आजपर्यंत जंगलं सांभाळत आले आहेत आणि वनखातं आजवर त्यातलं विकू विकू नुसतं खात आलं आहे. कुठंच जंगलं नाहीत. म्हणूनच तर शपांची सुरुवातीपासून ही मागणी होती की, लोकांनी जंगल वाढवलं पाहिजे. त्यानुसार लोकांनीही भरपूर जंगलं वाढवली आहेत. आज घरे बांधण्यासारखी झाडे झाली आहेत. वनखातं जंगल लावताना कोणती झाडं लावायची याचा नीट विचार करत नाही. त्यांना काही माहिती नाही. बोगस झाडं लावली तर त्याचा काय उपयोग? जंगलं लावून ती वाढवली पाहिजेत. त्यातून फळं-फुलं असं काही तरी

उत्पन्न आलं तर पाहिजे ना. ही आमची जुनी मागणी आहे. आत्ता लोक असं म्हणू लागले आहेत की, सरकारनं वनखातंच बंद करून टाकून पूर्ण जंगल आदिवासींच्या ताब्यात द्यावं. आम्ही जंगलांचं रक्षण करू. आम्ही झाडं लावू. कोणती झाडं लावायची ते आम्ही ठरवू.

शोभाताई : जंगलं कोणाच्या ताब्यात द्यायची? आदिवासींच्या की त्यांच्या नेत्यांच्या?

नजूबाई : नेत्यांच्या ताब्यात कशाला द्यायचं? जे सामान्य, गरजू आदिवासी लोक आहेत त्यांच्या ताब्यात द्यायचं. नेत्यांच्या ताब्यात नाही द्यायचं. जो सामान्य माणूस जिथं उगवला आहे, वावरला आहे त्याच्याच ताब्यात द्यायचं, असं आमचं धोरण आहे. हा लढा आम्हाला लढायचा आहे.

जंगलं वाढवली आहेत. त्याचं उत्पन्नही आता येऊ लागलंय. याचा निम्मा हिस्सा जंगल राखणाऱ्यांना मिळाला पाहिजे. अजून बऱ्याचशा गोष्टी आहेत - आरोग्य आहे, शिक्षण आहे. आदिवासींची पोरं पुढं कुठंपर्यंत शिकतात आणि वरून म्हटलं जातं, की आदिवासींसाठी एवढ्या सवलती, तेवढ्या सवलती. परंतु आदिवासी मुलं दहावीच्या पुढं जायला तयार नाहीत. त्यांची आर्थिक परिस्थिती बेकार आहे. एक पत्रकार मला म्हणाला, खेड्याकडे तरी आदिवासींची बरी परिस्थिती आहे. पण शहराला लागून ज्या भिलाट्या आहेत त्यांच्या जीवनात का बदल होत नाहीत? कारण त्यांच्या हातात उत्पन्नाचं साधन नाही. शेतमजुरी करून दोन वेळा खाणं एवढंच हातात आहे.

जे शेती करत नाहीत आणि हजारो एकर जमीन ज्यांच्या ताब्यात आहे त्याचा सर्व्हे करून सरकारनं त्यातील प्रत्येकी एक-दोन एकर जमीन भूमिहीन आदिवासींना दिली तर त्यांचं जीवनमान उंचावेल. पण ते होत नाही. या जमिनी धनदांडग्यांच्या असल्यामुळे त्या सरकारनं कायदा करून काढल्या पाहिजेत.

भिलाट्यांमधील आदिवासींना काही तरी रोजगाराचं साधन पाहिजे. गाई-गुरं, शेळी-मेंढी पालनासारखे काही तरी उत्पन्नाचं साधन त्यांना मिळवून दिलं पाहिजे. आता आदिवासींची कितीतरी पोरं शिकून नुसती पडून राहिली आहेत. ती इकडेतिकडे भटकतात.

जो प्रश्न उभा राहील तो घेऊन त्याबद्दल लढत जायचं. पुढं आज ना उद्या या देशात समाजवादी क्रांती घडेल. तोपर्यंत आपण ह्यात नसूही, पण वाटचाल तशीच चालू राहील. भारतासारख्या देशात जात, वर्ग, स्त्रीदास्य व्यवस्था आहे. ती नष्ट करून सत्ता प्रस्थापित करणं हे अवघड काम आहे. कारण आज विषमतेच्या समर्थकांची सत्ता आहे. ती उलथून टाकणं गरजेचं आहे. त्याला पर्याय नाही. इथल्या युवकाला ते केव्हा तरी करावंच लागेल. आपण म्हणू आपण करू.

जातिव्यवस्था आंतरजातीय विवाह कायद्यानं नष्ट होईल. त्याशिवाय वरकड जमिनी काढता येणार नाहीत. धनदांडग्यांकडून ती जमीन दलित, आदिवासी, ओबीसी असा जो खालचा मागासलेला भूमिहीन थर असेल त्याला सरकारनं वाटली पाहिजे, असं शरद पाटील नेहमी सांगत होते. हे प्रश्न सोडवत सोडवत या देशातील जात्यंतक समाज क्रांती झाल्यावर भावी समाजवाद उभा करावा लागेल. ज्या ठिकाणी कम्युनिस्टांचं राज्य होतं तिथं भावी समाजवाद अजूनही उभा राहिलेला नाही. तो या देशात केव्हा उभा राहिल? ते आपण सांगू शकत नाही. पण हे करावंच लागेल, असं मला स्वत:लाही वाटतं. कारण पाटलांनी एवढं लेखन-संशोधन उभं केलं आहे. ते साहित्य दूरपर्यंत गेलं पाहिजे. त्या साहित्यावर उठाव करणं हे महत्त्वाचं आहे. त्याचं नेतृत्व कोणी करेल ते करेल. परंतु त्यावर उठाव होणं, समाज उभा राहणं आणि या विषमतेच्या विरोधात लढणं, हे कठीणच आहे. कम्युनिस्ट पक्ष म्हणा किंवा डाव्या विचारसरणीचे पक्ष म्हणा आता ते सगळे बोथट झालेत. ते काही करायला तयार नाहीत. महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती संघटनाही थंड पडल्या आहेत. एखाद्या प्रश्नाला घेऊन कुठंच आवाज उठत नाही. दलित संघटनाही गटातटांत विस्कटून गेल्या आहेत. साहित्यक्षेत्रातही हीच परिस्थिती. काही दलित, ग्रामीण साहित्यिक ब्राह्मणी साहित्याला शरण गेले. साहित्य चळवळीसुद्धा थंडावल्या. कुठंच आवाज नाही. नावाला जेमतेम कुठंतरी एखादं संमेलन भरवलं जातं. पण तिथं नीट रूपरेषा आखली जात नाही. एक घोळका म्हणून, एक उत्सव म्हणून ते साजरे करतात एवढंच.

अरुण : १९८७ ला जे दलित, आदिवासी, ग्रामीण साहित्य संमेलन कॉ. पाटलांनी घेतलं ते कसं झालं होतं?

नजूबाई : तेव्हा आनंद यादव, बाबूराव बागुलांना अध्यक्ष केलं होतं. दलित, ग्रामीण, आदिवासी या तिन्ही प्रवाहांनी एकत्र यावं, मग ते साहित्याच्या पातळीवर असो वा चळवळीच्या पातळीवर असो, पण एकत्र यावं. म्हणून शरद पाटलांनी ती सुरुवात केली होती. परंतु तिथंही काहींनी काही तरी वेगळे विषय पुढं करून ते तोडलं. लेखक-साहित्यिक जे विखुरले गेले, ते अजूनही एकत्र आले नाहीत. नंतर आम्ही तो प्रयत्न सोडून दिला.

मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या लढ्यासाठी आम्ही कार्यकर्ते गावोगाव प्रचार करत फिरत होतो, की आपल्याला औरंगाबादला जायचंय, का कशासाठी जायचंय हे सांगत फिरत होतो. तेव्हा लोक उलट आम्हालाच म्हणत की ते (आंबेडकर) महार होते, यात महारांचा आणि आदिवासींचा काय संबंध? परंतु काही ठिकाणी भाषणांमधून मी म्हणायचे की 'आंबेडकरांनी घटनेत दलितांप्रमाणेच आदिवासींनाही आरक्षण सुविधा दिल्या आहेत. तेव्हा आंबेडकर दलित समाजाचे आहेत हे आदिवासींना काय माहीत नव्हतं का?''

त्या वेळेस आमच्यावर इतकं दडपण होतं की पायवाटेनं मोठमोठं डोंगर चढून जावं लागायचं. काय दहशत होती तेव्हा! मग वेगवेगळ्या पायवाटेनं कुणी कसं गेलं, कुणी कसं गेलं. पिंपळनेरला जमायचं. याला आदिवासी समाजातून विरोध व्हायचा. शेठ-सावकारही ते म्हणत की यात महारांचा आणि आदिवासींचा काय संबंध? तर मग नामांतराचा पहिला सत्याग्रह धुळ्यापर्यंत येऊन पोहोचला. मग आम्हाला धुळ्याच्या पुढे अटक झाली. दुसरा सत्याग्रह मनमाडमार्गे काढला. तिथंही अटक झाली आम्हाला. मग शपांनी १०० लोकांची एक तुकडी सुरतमार्गे पाठवली. त्यात शपांना शिक्षा झाली.

नामांतराच्या चळवळीतील काही दलित पुढारी शरद पवार यांच्याकडे झुकले आणि लढ्याचं महत्त्व त्यांनी हरवून टाकलं. अशा पद्धतीनं लोक कुठंकुठं आडवं येतात? तुम्ही स्वत: ते आंदोलन केलं तर तुम्ही स्वत: त्या आंदोलनाची-नामांतराची सर्व सूत्रं हाती घ्यायला पाहिजे होती ना, तर ती शरद पवारांकडे गेली.

आदिवासींमध्ये जो सुशिक्षित स्तर निर्माण झाला आहे ना, त्यापेक्षा दलितांमध्ये जास्त सुशिक्षित झाले आहेत आणि ते भलतेच वाकडं चालायला लागले आहेत. जे खऱ्याअर्थानं जातीचे, विषमतेचे बळी आहेत त्यांच्याप्रती यांच्या संवेदना काही नाहीत. मला वंदना महाजन यांच्या पुस्तकाचा संदर्भ द्यायचा आहे. त्यात त्यांनी आधी वर्ग दाखवले आहेत. वर्ग, जात आणि स्त्रीदास्य असं. म्हणजे आधी वर्ग अस्तित्वात होते का? वर्ग ब्रिटिशांनी आणले, असं म्हटलं जातं. पण जाती तर आधीपासून होत्या. त्यांनी वेगळ्या पद्धतीनं मांडणी केली आहे. त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नावर स्त्रीवादी दृष्टिकोनातून चांगलं परीक्षण केलं आहे.

मी खूप विचारात पडले. म्हटलं वर्गामधून जात कशी निघेल? वर्गामधून जात निघालेली दिसत नाही. परंतु जातीमधून बुद्धिजीवी लोक येतात. त्यांचाच वर्ग बनतो. म्हणून जात आधी आणि नंतर वर्ग नष्ट केले पाहिजेत. दलितांमधून जो सुशिक्षित स्तर निर्माण झालाय त्यांना मांगवाडा, महारवाड्यांबद्दल काही वाटत नाही. आमच्या या भागात पाटील-ब्राह्मण वस्ती जास्त आहे. प्रत्येक घरात बाई भांडी घासते आणि ओट्यावर ठेवून दुसऱ्या घरी जाते. नंतर त्या घरातील मालकीणबाई त्या भांड्यांवर बादलीभर पाणी ओतून मगच ती भांडी घरात घेते. हा काय प्रकार आहे? शेवटी जातिभेद आहेच.

काही दलित मैत्रिणींना मी विचारलं की तुम्हाला जातिव्यवस्था समजत नाही का? त्यावर त्या म्हणाल्या की 'मावशी, जात वगैरे काय असते ते आम्हाला समजत नाही.' मी म्हटलं 'तुम्ही भांडा घासून जाता आणि तुमच्या पाठीमागे बादलीभर पाणी का ओतलं जातं?' तर त्या म्हणाल्या 'बाबासाहेबांनी तर जातिव्यवस्था नष्ट करून टाकली की.' मग मी त्यांना म्हणाले की 'तुम्ही दुसऱ्याची उष्टी भांडी का घासता? घाणेरडे कपडे का धुता? तुम्ही माणुसकीचं, स्वतंत्र जीवन जगू शकता का? मग दुसऱ्याची घाण का काढता? हीच जातिव्यवस्था आहे.'

बाबासाहेबांनी ब्राह्मण बायको केली. ब्राह्मण लोक खूप हुशार आहेत. ते कुठंही पोरी देतील, पण त्यांचे

संस्कार ते लादतील. परंतु बाबासाहेबांनी केली तशी अनेक लोक करतील कारण ते बुद्धिजीवी आहेत. मोठमोठ्या पदांवर कामं करतात. त्यांचे संस्कार त्यांच्यावर लादतात. मला सांगतात की अमक्या पोरीनी आमच्या जातीचा मुलगा केला. मी म्हणते ते खरे आहे. पण महाराच्या पोरी ब्राह्मण का करत नाहीत? हे जर झालं तर जातिव्यवस्था कमी झाली असं आपण मानू. तोपर्यंत नाही मानणार. ब्राह्मणांच्या घरात महार, मराठा मुलगी सून म्हणून जाते का हा संशोधनाचा विषय आहे.

आंतरजातीय विवाहामधून जात पुढे येत नाही. त्यातलं जे अपत्य असेल त्यांनी आईची जात सांगायची की बापाची जात? परंतु सजाती विवाहामुळे जातीची उत्पत्ती वाढतच जाते.

शोभाताई : आरक्षणांमुळे जाती नष्ट होतील का? प्रायोगिक पातळीच्या आंदोलनांनी खरंच जातीला काही घाला बसला आहे का?

नजूबाई : आंदोलनं आंतरजातीय विवाह हे जातिअंतासाठी पहिलं पाऊल आहे. पुढं काय करायचं ते तो तो समाज करेल. ते एक पाऊल आहे. त्याच्या जोडीला कडक कायदा झाला पाहिजे. बेटी व्यवहाराचा कायदा सगळ्या समाजाला सक्तीचा केला पाहिजे. सगळ्यांनी एकमेकांना पोरी दिल्या पाहिजेत. सोयरेसंबंध झाले पाहिजेत.

शोभाताई : मराठा-कुणबी प्रश्न

नजूबाई : इथं बहुतांश मराठे, कुणबी लोक आहेत. एक दिवशी मी त्यांची भेट घेतली. म्हटलं 'तुम्ही तर कुणबी आहात ना? मग मराठा अशी जात कशी काय लावता?' तर म्हणे 'ती पदवी आहे.' मी म्हटलं 'कुणबी शेतकऱ्याला शूद्र म्हटलेलं आहे. मग ही मराठा पदवी तुम्ही कुठून घेऊन आलात? ज्या मराठा पदवीधरांनी शिवाजीमहाराजांचा घात केला ती पदवी तुम्ही कशी काय घेऊन फिरता? मिरासदार वगैरे लोकांचा शिवाजी महाराजांच्या घातपातात सहभाग होता. तुमचे वडिलोपार्जित कागदपत्रं चाळून बघा त्यात तुम्ही कुणबट आहात, असं दिसेल. कुठून तुम्ही मराठा होऊन बसलात? हे जे चालते आहे ती ब्राह्मणी परंपरा आहे. म्हणजे कुणबी नसून आम्ही मराठा म्हणजे वरचे आहोत, एवढंच त्यामागे असतं.'

इथं या पटांगणामध्ये एक कुणबी परिषद झाली होती. तर आम्ही कुणबी कुणबी आणि मग वरून अजून मराठे, असं चाललं होतं. काही जण आता जात लावताना कुणबी-मराठा असंच लावतात. पण ते फक्त सवलत घ्यायला 'कुणबी' शब्द वापरतात. कायमस्वरूपीच तो शब्द वापरला तर तुमचं काय बिघडणार आहे? आपलं वडिलोपार्जित हेच होतं. मग मराठा लावल्यानं तुम्ही काय ब्राह्मण होणार आहात का? आणि ब्राह्मण होऊन काय उपयोग होणार आहे? आपली जात, समाज आहे तोच आपण स्वीकारला पाहिजे. त्यात बदल करून काही निघणार आहे का? नाही ना?

आम्ही आदिवासी आहोत. आम्ही भिल्लांमध्येच गणले जातो ना. एकदा शरद पाटील यांनी बामसेफवाल्यांना असा प्रश्न विचारला की, 'तुम्ही बहुजन बहुजन म्हणता. कोण हे बहुजन?' तर स्त्रीसत्ता-मातृसत्ता होती. त्या काळात जो समाज होता तो बहुजन समाज. शेतीचा शोध लावणारी पहिली स्त्री निऋती. निऋतीचा गण होता. आणि निऋतीच्या सत्तेपर्यंत गण राहिले. नंतर सरकारनं 'ट्रायबल' केले आणि आता आता अनुसूचित जाती-जमाती आहेत. आता गण नाहीत, तर जमाती आहेत. असं म्हटलं जातं की, स्त्रियांनी शेतीचा शोध लावला जगभर. ती मातृसत्ता-स्त्रीसत्ता होती. ती पितृसत्तेनं हस्तगत गेली. आणि चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारलेली पितृसत्ता आल्यापासून स्त्रिया व माणसं गुलाम झाली.

पितृसत्ता आली, चातुवर्ण्य आलं, सिंधू खोऱ्यातील शेती गेली आणि हिंदू धर्म-संस्कृती आली. हे एकेक टप्प्यानं कसं पुढं आलं आहे आतापर्यंत ते नीट बघा. रामानं आदिवासींच्या राण्यांचे राज्य नष्ट केले. राम राजा व्हायची वेळ आली असताना त्याच्या सावत्र आईनं बापाकडून वचन घेतलं की माझ्याशी लग्न केल्यावर जो मुलगा होईल त्याला गादीवर बसवलं पाहिजे. दशरथाकडून तिनं वचन तर घेतलं. पण जेव्हा रामाला राजा बनवायची वेळ आली तेव्हा कैकेयीनं तो मुद्दा लावून धरला आणि दशरथानं त्याला चौदा वर्षं वनवासात पाठवलं. ते तुमचं

घरगुती भांडण होतं ना. ते काही जनतेसाठी झालेलं नव्हतं. म्हणजे रामानं चौदा वर्षे वनवास काढल्यानंतर असं केलं - तसं केलं. पण ते समाजासाठी, जनतेसाठी केलेलं नाही. तर तो त्यांचा प्रश्न घरगुती आहे. चौदा वर्षांच्या वनवासानंतर तो अयोध्येचा राजा होणार होता ना. जनतेसाठी त्यानं काही त्याग केला म्हणून होणार होता का? तर नाही. सवतीमत्सर आणि खासगी मालमत्ता, माझा मुलगा गादीवर बसेल का तुझा, हा खरा मुद्दा होता. चौदा हजार आदिवासींनी राक्षसांची कत्तल का केली? हे त्यांच्या रामायणामध्ये आहे. मी रामायणाचे खंड वाचले. सीता ही काही जनकाची मुलगी नव्हती. ती भूमातेची कन्या होती. तिला आत्महत्या करायला लावली तेव्हापासून काही लोक असं म्हणतात की सीतेनं आत्महत्या केल्यापासून स्त्रियांच्या आत्महत्येची प्रथा पडली. आमच्यात तशी पद्धत नाही. आदिवासींमध्ये आत्महत्या करण्याची क्वचित एखादी घटना दिसते. आता एवढ्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, पण आदिवासी शेतकऱ्यानं आत्महत्या केली नाही. सगळ्यात नाडलेला, पिळला जाणारा समाज तर तोच आहे.

एक सोपा उपाय आहे. जर हुंडाबंदीचा कायदा झाला आहे आणि त्याची पूर्णपणे कडक कारवाई/अंमलबजावणी झाली तर शेतकरी आत्महत्या करणारच नाही. कारण मुलींची लग्न, लाखांच्या पुढे हुंडा, त्यापुढे जाऊन लग्न लावून देणं, बाप काय करेल? हा साधा-सोपा उपाय अमलात आणला तर आत्महत्या करण्याची गरज उरणार नाही. पिकांना भाव नाही, पाऊस न पडणं, फसवं बियाणं, ही पण कारणं आहेतच.

आदिवासी शेतकरी इतका पिळला जातो कारण त्याच्या मालाला भाव नाही मिळत. तो कापूस पिकवतो, भात पिकवतो, कडधान्य पिकवतो, फळं घेतो, पण तो स्वत: मालक असून व्यापारी लोकांना विचारतो, 'शेठ हा माल आहे. काय भावानं घेशील?' आणि तो शेठ पडत्या भावानं मागून घेतो. पण आपण खूप नाडले गेलोय, आपल्यावर दारिद्र्याची वेळ का आली, संकट आलं तेव्हा आपण स्वत:ला संपवून घ्यावं, असे प्रश्न कधीच त्याच्या मनातही येत नाही. म्हणजे धीरानं तो पुढे पुढे सरकतो. एवढा धीर इतर शेतकऱ्यांमध्ये नाही. तेवढं धैर्य नाही. रोजची रोजीरोटी मजुरी आहे, पण कुणी आत्महत्या करत नाही. आठ दिवसांचा उपाशी आहे. एक दिवस काम मिळालं नाही म्हणून तो कधीही आत्महत्या करत नाही. एकाही आदिवासीनं आत्महत्या केलेली दिसून येत नाही.

आजचं जीवनमान बदललं आहे. हवामान जे पसरलंय ते रोगिटय. भांडवलदारांनी लोकांच्या बोडक्यावर काय काय आणून बसवलंय. घरातली बाई, मुलं यावर विचार करायला तयार नाहीत. आपला बाप कर्जबाजारी असला तरी मला हे पाहिजे, मला ते पाहिजे. बाप कुठून पुरवेल? ही स्वत:ची बुद्धी घरातल्या बाईनं, पोरांनी ओळखली पाहिजे. मजुरीला जाते ती बाईसुद्धा किती झकपकीत असते. काय हा चंगळवाद तुम्ही अंगावर ओढवून घेतलाय? आपल्याला जीवन जगायचं तर आपण कोणतं जीवन स्वीकारलं पाहिजे? कोणतं नाकारलं पाहिजे ही परिस्थितीची जाण असली पाहिजे ना. इथं आमच्या समोरच्या मैदानात तीन शेतकऱ्यांची लग्न झाली. तेव्हा इतकी उधळपट्टी केली की विचारायला नको.

एका शेतकऱ्याकडे तिसरं शेवटचं लग्न होतं. लग्न लागून गेलं. जेवणखाण झालं. तेव्हा एक बाई रडत-बोंबलत निघाली होती. कारण तिच्या नवऱ्यानं घरी विष पिलं होतं. नवरा लग्नाला पाठवत नसेल. घरात काही आधी काही कुरबूर झाली असेल. मग ती इकडे आल्यावर त्यानं तिकडे तसं केलं असेल. म्हणजे बाईचा छळ पुरुष करतो असं नाही तर बाईसुद्धा पुरुषाचा छळ करते. ती बाई गरीब नवरा पाहून इतके वर्चस्व गाजवते हे मी डोळ्यानं अनेकवेळा पाहिलं आहे.

अरुण : आता ज्या स्त्री-पुरुष समानतेच्या चर्चा चालतात ते काय आहे? संकल्पना मांडतात ते काय?

नजूबाई : पुरुषांनी स्वत:हून आपल्यावर काय अन्याय होतो हे सांगितलं पाहिजे. स्त्रीपुरुषामध्ये जी विषमता आहे एकमेकांची छळवणूक किंवा काय ते दोघांनी करू नये. समानपणे राहिलं पाहिजे. मग त्यासाठी काय केलं पाहिजे ते एकमेकांनी ठरवलं पाहिजे. बायका भयानक विचित्रपणे वागत आहेत. जगामध्ये काय काय

चळवळ पैसे देऊन उभी करता येत नाही. त्या करता एकेक माणूस जोडावा लागतो. त्याच्या डोक्यात विचार घालावा लागतो. लागोपाठ संकटं आल्यानं लोक घाबरतात, खचून जातात. त्यांची मनं तयार करणं, पुढं काय करायचंय ते मनात भरवणं, या गोष्टींमधून पाटलांनी खूप सहन केलंय. त्या वेळेस कुठंही तेव्हा खायलाही काही नसायचं. कडू कंद, गुजरातचे कडू वाल, घाटा खाऊन दिवस काढले. नकार न देता मोहाची फुलंही खाल्ली. जे दिलं ते खाऊन ते काम करत राहिले. यातच त्यांचा मोठेपणा आहे.

■

घडतंय ते पाहून शहारे येतात अंगावर. दिल्लीमध्ये काय, गल्लीमध्ये काय त्याला काही रूपरेषाच उरलेली नाही. बाई कुठं सुरक्षित आहे का? तीही बापापासून, भावापासून, सावत्र बापापासून असुरक्षित- हे सगळं काय चाललंय, हे पुढं काय घडणार आहे.

शोभाताई : तुम्हाला काय वाटतं? पुढं काय घडेल? आपल्या परीने आपण काय करू शकतो?

नजूबाई : लोकांची जी मानसिकता तयार झाली आहे, त्यांना भोगवाद म्हणून असं करायचं आहे, की सूड म्हणून? मला तर वाटतं की स्त्रीला नष्टच करायचं आहे, या पुरुषसमाजाला. कारण २-३ वर्षांच्या पोरींवर सूड उगवणं याला काय अर्थ आहे का? हे का घडत असेल? जातीमुळे घडत असेल? काही एक वेगळी सूडभावना असेल? भावना वेगवेगळ्या असू शकतात. परंतु जो काही मुद्दा असेल त्याची शहानिशा करून तो निपटला पाहिजे. वैरभाव मिटवला पाहिजे.

सूडभावनेसाठी गुजरातमध्ये जो हिंदू-मुस्लिम दंगा झाला तिथंही बायकांवरच अत्याचार केले गेले.

शोभाताई : सिंधूताई सपकाळ असं म्हणतात की 'कपडे घालून अंग झाकले तर सत्कार होतील, नाही तर बलात्कार होतील.' दुसरीकडे काही भागातील आदिवासी स्त्रिया तर अर्धेच कपडे घालतात, तिकडे बलात्काराचे इतके प्रकार होत नाहीत. याच्याकडे कसं बघायचं?

नजूबाई : क्वचित एखादी घटना घडली असेल. नाही तर मला आदिवासी पड्यांमध्ये बलात्काराची बातमी आढळलेली नाही. ज्या घटना झाल्या आहेत त्या सगळ्या शहरी भागात किंवा शहरांच्या आसपास आहेत. त्यांच्यामध्ये वडिलोपार्जित/नैसर्गिक पद्धतीने कपड्यालत्त्याबद्दल जे समज आहेत ते फारसे बदलता येऊ शकत नाहीत. परंतु आता बदल होऊ लागले आहेत.

आताच्या मुली साड्या नेसू लागल्या, पुरुष पँट घालू लागले आहेत. पूर्वीचे लोक नुसत्या लंगोटी नेसायचे, बाया चोळी घालायच्या. परंतु बलात्काराचा प्रकार आदिवासींमध्ये दिसत नाही. शेतात काम करताना खोल मातीत-चिखलात पाय जातात, मग पूर्ण कपडे घालून कसं काम करता येईल? म्हणजे इथं गरज म्हणून अर्धे कपडे घातले जातात, हौस म्हणून नाही.

३-३ वर्षांच्या मुलींवर जेव्हा बलात्कार होतो, तेव्हा तिच्या कपड्यांचा प्रश्न इथं येत नाही, कारण ती तद्दन विकृती असते. आता नवनव्या फॅशन्स आल्यात हे खरं आहे. शाळा-कॉलेजच्या ठिकाणी आपण पाहिलं तर काही मुली इतके विचित्र कपडे घालतात की ते पाहून कसं तरी वाटतं. मग पाठीमागून पोरं डोळे मारतात. टोमणे मारतात. अमुक प्रकारच्या कपड्यांमुळे कामवासना चाळवली जाणं असाही काही प्रकार होऊ शकतो. हाही एक भाग आहे. पण फक्त कपड्यांमुळेच कामवासना भडकून उठेल असं मी म्हणत नाही. उद्या आपल्या घरातही अशी एखादी मुलगी असू शकते.

बलात्काराच्या मुळाशी सूडबुद्धी हे एक कारण आहे. स्त्रीनं ठरलेल्या चौकटीतच राहिलं पाहिजे, त्या घराबाहेर पडल्या तर सूड घेऊ, ही पुरुषसत्ताकतेची धमकी आहे. स्त्रीनं कधीच आवाज काढू नये, स्त्रीनं कधीच पुरुषांची बरोबरी करू नये, स्त्रीनं कधीच माणूस म्हणून राहू नये ही एक प्रकारची सूडबुद्धी आहे. यात जाणीव-नेणिवेमध्ये जातिव्यवस्था काम करते आहे.

पण चारपाच महिन्यांच्या मुलींवरही बलात्कार होतो

किंवा पित्याकडूनही बलात्कार होतो, म्हणजे इतक्या लहान मुलींबाबतही जर पुरुषांची कामवासना चाळवत असेल तर ती विकृती म्हटली पाहिजे.

ही धमकी आहे की तू आवाज बाहेर काढलास तर तुझा निकाल लावेन. मग ती बाई दबून जाते. पुरुषी दडपशाहीला बळी पडते. ती पुढं सरकू शकत नाही.

एक मानसिकता अशी असते की आपली इज्जत जाईल, बेअब्रू होईल, ही एक भीती असते. कारण बाहेर पडूनही तिथं न्याय मिळेल याची खात्री नाही. बाहेरही बलात्कार होऊ शकतो. कारण तिच्यावर घडलेला प्रकार ते नोंदवू शकत नाहीत, हेही उघड झालं आहे. एवढं घडून पोलिसांनी कोणती भूमिका घेतली? पिडीत मुलीला चांगल्या प्रकारे काही सहकार्य केलं जात आहे का?

पुरुष कशा पद्धतीनं बाईला सप्रेस करतो आणि वापरायला बघतो आणि जर तशी वापरता आली नाही तर काय काय प्रकारे सूड घेतो याची कल्पनाही करता येत नाही. परंतु स्त्रियांमध्ये जेवढी मानसिक शक्ती आहे, तेवढी पुरुषांमध्ये नाही. ती काय काय करून उभी राहू शकते. संकटावर मात करून उभी राहू शकते. मात्र पुरुष फार काळ तग धरू शकत नाहीत.

माझे वडील म्हणत देवानं सर्वांना नैसर्गिक मृत्यू दिला आहे. पण बापानं आधी मरावं, आईनं आधी मरू नये. का तर काही नसलं तरी आई स्वत:ची इज्जत विकून पोरं पोसू शकते. मग तो समाज काहीही म्हणो. पण पोरांची जबाबदारी ती जशी सांभाळते तसं पुरुष करू शकत नाही. पुरुषामुळे घराला घरपण येत नाही.

शोभाताई : आज चाळीस वर्ष तुम्ही चळवळीत आहात. चळवळ कशी कशी बदलत गेली?

नजूबाई : शपांनी उपाशीतापाशी माणसं ओळखली. त्यांचे प्रश्न नीट जाणले. कोणत्या माणसांबरोबर चळवळ केली पाहिजे, हे नीट ओळखलं. त्यांनी धरणग्रस्तांचे लढे लढले. शेतकऱ्यांचे लढे लढले. कम्युनिस्ट चळवळींमध्ये कामगारांच्या लढाया केल्या. काही प्रश्न सुटले पण काही तसेच राहिले. काही अडचणींमुळं चळवळी थंडावल्या. परंतु त्यांनी नंतर ठाणे जिल्ह्यामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षानं जे काम चालवलं होतं तोच मुद्दा उचलून त्यांनी संघटना बांधली. लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न अनेक पातळ्यांवर संघर्ष करून सोडवण्याचा प्रयत्न केला. कायद्याच्या लढाया करून लोकांच्या पदरात चांगल्या गोष्टी ठेवल्या. वैदिक परंपरेनं जो इतिहास लिहिला आहे, त्या इतिहासाची आपण फेरमांडणी केली पाहिजे, असं त्यांच्या मनात होतं. चळवळ पैसे देऊन उभी करता येत नाही. त्या करता एकेक माणूस जोडावा लागतो. त्याच्या डोक्यात विचार घालावा लागतो. लागोपाठ संकटं आल्यानं लोक घाबरतात, खचून जातात. त्यांची मनं तयार करणं, पुढं काय करायचंय ते मनात भरवणं, या गोष्टींमधून पाटलांनी खूप सहन केलंय. त्या वेळेस कुठंही तेव्हा खायलाही काही नसायचं. कडू कंद, गुजरातचे कडू वाल, घाटा खाऊन दिवस काढले. नकार न देता मोहाची फुलंही खाल्ली. जे दिलं ते खाऊन ते काम करत राहिले. यातच त्यांचा मोठेपणा आहे.

नागलीची शिळी भाकर, तेलाचा थेंबही नसलेलं कोरडं तिखट खाल्लं. अशा परिस्थितीत त्यांनी आदिवासींना जोडलं, समजावलं आणि कामाला लावलं. लोक जागृत झाले. कामाला लागले. त्यांनी एक मुद्दा लावून धरला की तुम्ही बायकांना बाहेर काढा. जेव्हा कायद्याच्या लढाईमुळे दडपशाही कमजोर झाली तेव्हा पुरुष परत बायकांना कोंडायला लागले. बायकांनी काही केलंय हेही ही माणसं मानायला तयार नाहीत. दडपशाहीच्या काळात माणसं पळून जायची. शेतामध्ये थांबत नसत. तेव्हा शेतीचं रक्षण बायकाच करायच्या. औतं-बैलं राखायच्या. वनखात्याच्या लोकांनी अटक केली तर औत-बैलं सोडवून आणायचं काम बायकांनी केलं. एवढं महत्त्व असूनही बायकांना परत मागं ओढायचं काम करत होते. जास्त संघर्ष बायकांनी केला आहे या जमिनींच्या लढ्यात.

शपा आधी स्त्रीला महत्त्व द्यायचे. कुठंही काहीही काम असो, आधी बायकांची चौकशी करायचे. त्यांची व्यवस्था करायचे. मोर्चा असला तर त्यांना पुढं ठेवायचं. त्यांच्या हातात झेंडे द्यायचे. बायकांना कुठं बसवायचं हीही काळजी घ्यायचे ते. माणसं कुठंही असली तरी मला पर्वा नाही, पण बाईचे हाल व्हायला नकोत. मी फुल्यांचा शिष्य आहे, मी स्त्रीवादी आहे, असंच म्हणायचे.

तालुका-जिल्हा-महाराष्ट्र पातळीवर वेगवेगळे प्रश्न म्हणजे महिलांचे, शेतकऱ्यांचे, रोजगार हमीचे, दुष्काळाचे प्रश्न, नामांतराचा प्रश्न असे अनेक प्रश्न घेऊन लढे केले. म्हणजे तो लढा बदलत बदलत पुढे कसं सरकायचं, हेही ते करत होते. त्यांना जात मंजूर नव्हती. जात आणि वर्ग यांचा अंत करणं मार्क्सवाद्यांना मंजूर नव्हतं. म्हणून त्यांनी माकप सोडला. आणि मार्क्स-फुले-आंबेडकर यांचं तत्त्वज्ञान एकत्र करून 'सत्यशोधक मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षा'ची स्थापना केली.

साहित्य चळवळींसारख्या संघटनाही ते गठीत करू पाहत होते. ग्रामीण-दलित-आदिवासी हे तीनही प्रवाह आपण एकत्र केले पाहिजेत. हे तीनही समुदाय एकत्र केले पाहिजेत, अशा विचारांची ते मांडणी करत होते. त्यासाठी प्रयत्न करत होते. हा प्रवाह चळवळीच्या दृष्टीनं शेतकऱ्यांच्या प्रश्न, दलितांचे लढे अशा वेगवेगळ्या पातळीवर त्यांनी आदिवासींना बरोबर घेऊन आंदोलनं पार पाडली. आदिवासींना नामांतर काय आहे याची फार जाण नव्हती. पण त्यांच्या पद्धतीनं ते कार्यक्रम आखत होते. आम्ही सगळे त्यांच्या साथीला उभं राहत होतो.

चळवळीपलीकडं जाऊन साहित्याकडे पाहिलं पाहिजे, असं ते म्हणत. त्यासाठी त्यांनी प्रयत्नही केले. राजकारणाबद्दल आज जे चित्र आपल्याला दिसतं की, कोणी म्हणतं मला तिकीट मिळालं पाहिजे, कुणी म्हणतं मला मिळालं पाहिजे. मला म्हणायचं आहे की निवडणुकीचा जो नियम आहे तो आधी भंगीकाम करणाऱ्यांना लावला पाहिजे की 'मी भंगीकाम करतो. मला निवडून द्या.' असं का होत नाही? सत्तेमध्ये जायला चढाओढ करतात. मग एवढी घाण काढणारा जो समाज आहे त्या समाजाचा तुम्ही निवडणुकीच्या वेळी का विचार करत नाही? आदिवासी समाज शेतीचं, मातीचं, दगडाचं काम करेल, पण ही असली घाण काढणार नाही. कधीच हात लावणार नाही. दलित समाज कितीही घाणीमध्ये राबून राहिला तर त्याचा कोणी विचार करत नाही. जे मूठभर लोक पुढे गेले त्यांना यांच्याशी काही देणंघेणं नाही, असं चित्र आहे. हे महारवाडे, मांगवाडे कोण उठवणार? घटना कुठपर्यंत लागू पडते?

आंबेडकरांनी घटना लिहिली, घटनेमध्ये सगळे अधिकार दिले, असं म्हटलं जातं. मग हे घाणीचं काम कोण करतं? त्यांना घटनेमधून पूर्णपणे न्याय मिळाला आहे का, तर नाही. याचाही विचार करायला ते लोक तयार नाहीत. बामसेफसारखी संघटना ही नोकरदारांची, मध्यमवर्गीयांची आहे. त्यांना झोपडीमधलं जीवन नको आहे. त्यासाठी लढण्याचीही त्यांची इच्छा नाही. अशी जी वेगवेगळी चित्रं उभी राहिली त्याच्या विरोधात कॉ. शरद पाटलांचं म्हणणं होतं की, मांग-महारवाडे, आदिवासी पाडे, खेडी, भिलाट्या या सगळ्या उठवून माणुसकीवर, समतेवर आधारलेला समाज निर्माण करण्यासाठी हा सबंध समाज एकत्र केला पाहिजे. मग तो साहित्यिक पातळीवर असो की अन्य कोणत्याही. पण एकत्र यायला पाहिजे.

दलितांमधील ब्राह्मण झालेले इतरांना सामील झाले. जे जातीचे, विषमतेचे बळी आहेत तेच हे काही करायला तयार नसतील तर ही व्यवस्था केव्हा ना केव्हा त्यांच्या मानगुटीवर बसेल. त्या वेळी तरी त्यांना लढावंच लागेल. आम्ही जातीचे बळी नाही, आम्ही जमाती आहोत. आमच्या आदिवासींमध्ये जातीचे दंगे होत नाहीत. पण एक काळ असा येईल की जेव्हा विषमतेच्या विरुद्ध आगडोंब उठेल त्यातून आदिवासीही वाचणार नाही.

कॉ. पाटलांनी हे सांगून ठेवलं आहे की आदिवासी हा जातिव्यवस्थेच्या सरहद्दीवर उभा आहे. जो बळी आहे तो समाज जर उठला तर तो सरहद्दीवरून खाली उतरेल आणि यांच्यात सामील होईल. या समाजामध्ये जो पिळला, नाडला जाणारा, सगळ्या बाबतीत मागे पडलेला समाज उठल्याशिवाय या लोकांना माणुसकीचं जीवन मिळणारच नाही. माणूस म्हणून जगणं मुश्किल होईल असं जे चित्र आज पुढे उभं राहतं आहे त्यासाठी पाटलांनी वेगवेगळ्या पातळ्यांवर खूप संशोधन करून सगळ्या समाजाची एक ऐतिहासिक मांडणी केली.

आंबेडकरांना दिल्ली कमिटीनं विचारलं होतं की आदिवासींबद्दल काय? आंबेडकरांनी सांगितलं नाही. फुलेही आदिवासींबद्दल काही बोलले नाही. आदिवासींची व्याख्या पहिल्यांदा जर कुणी केली असेल तर ती कॉ. शरद पाटलांनी केली. शपांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही विद्वान

पंडितानं आदिवासींची व्याख्या केलेली नाही. पहिल्यांदा आदिवासींची व्याख्या करून त्यांना इतिहासाच्या पानांवर आणण्याचं मूलभूत कार्य शरद पाटलांनी केलं.

आदिवासींना तोंडावर राक्षस, वानर, भिलटे, काळे, नकटे वगैरे वगैरे म्हटलं जाई. या गोष्टी आम्ही प्रत्यक्ष कानानं ऐकलेल्या व डोळ्यानं पाहिलेल्या आहेत. अनुभवलेलं आहे. आदिवासी लंगोटी घालत. आम्ही जेव्हा बाजारात जायचो. तेव्हा बळजबरीनं व्यापारी आमच्या डोक्यावरची डाल हिसकावून घ्यायचे. त्याच्या मनाला पटेल तेवढाच दाम द्याचयचे. आणि एखाद्या आदिवासीनं ऐकलं नाही की त्यांची लंगोटी धरून ओढायचे. त्या आदिवासी माणसाला भीती वाटायची की आपण भर बाजारात नागवं होऊ, म्हणून तो घाबरून पळत असे. दुसरीकडे महापालिकेचीही लूटमार चालली होती. पठाणी लोकही वसुलीला यायचे. अशी खूप दहशत होती. हे सर्व प्रकार शपांनी बंद केले. आता जर एखाद्या व्यापाऱ्यानं असं केलं तर लोक त्याला चिरडून टाकतील, अशी जागृती आज झाली आहे, याचं श्रेय शपांनाच जातं.

अरुण : पुस्तकं आल्यावर तुम्हाला कसं वाटलं?

नजूबाई : पहिल्यांदा पुस्तक छापून आल्यावर तो मला केवळ माझाच नाही, तर माझ्या सबंध समाजाचाच आनंद वाटला. माझं मन भरून गेलं होतं. मला एखादा पुरस्कार मिळाला तर तो माझ्या समाजाला मिळाला, असंच मी मानते. अजून खूप लिहायचं बाकी आहे.

शोभाताई : चळवळीत पुष्कळ बदल झाले. आताही चळवळीला नेते आहेतच की. कॉ. शपांचं नाव घेऊनही चळवळी चालतात. पण त्यातल्या लोकांना तरी कॉ. शरद पाटील कळलेत का?

नजूबाई : तसं पाहिलं तर लोकांनी प्रयत्न केलाच नाही. शपांचे विचार एका कानानं ऐकून घेतले दुसऱ्या कानानं बाहेर टाकले. बहुतेकांना ते पूर्णपणे कळलेच नाहीत. वैचारिक पातळीवर इतर लोक ऐकून घेत. शपा जी मांडणी करत ती तोंडी वा लिखित असे. पण त्यावर छातीठोकपणे काम करायला कोणीही तयार नाही.

शपांना एका बाजूनं ऐकून घ्यायचं, त्यांचे कार्यक्रम लावायचे आणि दुसऱ्या बाजूनं वैचारिक पातळीवर त्यांच्या पाठीत खंजीरही खुपसायचा, अशी खूप माणसं मला दिसली. अगदी आता आतापर्यंत. त्यांचा शिष्य म्हणावा असा आज कोणी नाही. शरद पाटील गेल्यावर महाराष्ट्रभर अनेक शोकसभा झाल्या. परंतु ज्यांनी या सभा घडवल्या त्यातील तुरळक अपवाद वगळता बाकी सर्वांनी वैचारिक पातळीवर शपांवर तोंडसुख घेतले. घाण केली.

इथं येऊन शपांशी चर्चा करायची आणि इथून गेल्यावर त्यांच्यावरच वैचारिक हल्ला करायचा. ते लोक शपांवर कशापद्धतीनं उलटायचे, हे मी खूप जवळून अनुभवलंय. काही लोक लिखाण करायचे, कुणी मासिक काढायचं, त्यापैकी काहींनी शरद पाटलांचे मुद्दे आपल्या नावानं छापले. अशा अनेक गोष्टी मी पाहिल्या आहेत.

प्रतिमा परदेशी म्हणते की जातिव्यवस्थेचा अंत फुल्यांनी केला. ढमालेचंही सगळं लिखाण शरद पाटलांचे मुद्दे उचलूनच असतं. आम्हीच सगळं केलं, असं ते म्हणतात. पण त्यांनी काय केलं? नुकसानच केलं ना. आता शपांच्या नावानं चळवळ करतायत आणि त्यांचंच लिखाण उचलून धरतायत. दुसरं स्वत:चं असं काय करतायत? फुल्यांनी हे केलं, ते केलं असं नुसतं म्हणतात. पण त्यापुढं जाऊन काही कृती करत नाहीत. फुल्यांना पुढं जे करायचं होतं ते का करत नाहीत? नुसते दुसऱ्यांचे विचार घेऊन स्वत:ला नेते म्हणून मिरवतात. त्यापलीकडं ते काही करत नाहीत. चांगले चांगले प्राध्यापक मोठमोठ्या पदांवर काम करणारे लोक असूनही शरद पाटलांच्या पाठीत सगळे खंजीर खुपसणारेच लोक आहेत.

अरुण : शपांना पाठीराखे, कार्यकर्ते खूप मिळाले. पण त्यांचा विचारगाभा घेऊन पुढं जाणारा असा कोणीही मिळाला नाही का? निदान त्यांचा विचार नीट कळलेला तरी कोणी आहे का?

नजूबाई : नाही. विलास सोनवणेंचंच उदाहरण घ्या ना तुम्ही. ते शरद पाटलांना पूर्णपणे जाणणारे आहेत, दोघांनी एकत्र कामही केलेलं आहे, असं सांगितलं जातं. मग त्यांनी पाटलांचे विचार घेऊन चळवळ चालवू नये का? ते काय करतात हेही मला कळत नाही? पण पाटलांनी जसं जनआंदोलन उभं केलं, एक रस्ता दाखवला, तसं केलेलं दिसत नाही. त्यांचं ते युवा भारत आणि

मासिक- 'सकल' त्याच्यामधली कुठलीही मांडणी मला पटलेली नाही. मग शरद पाटलांचे विचार त्यांनी आत्मसात केले असं आपण कशावरून मानायचं? जर ते विचार आत्मसात केले असते तर, त्या मासिकातूनही चांगलं वाचायला मिळालं असतं. सोनवणेंचं 'लढता लढता' हे पुस्तकही मी वाचलं. एखाद्या शिष्यानं शरद पाटलांना जाणून घेतलं असतं, तर त्यांची मांडणी आणखी वेगळ्या प्रकारे त्यानं पुढं नेली असती. कुणी एखादा तुटक मांडणी करताना दिसतो. असं का? अशा माणसाला शपा पूर्णपणे समजले असं म्हणणार की यांच्यामध्ये वैचारिक मतभेद आहेत असं म्हणणार?

अरुण : विलास सोनवणेंनी इतर लोकांप्रमाणेच शरद पाटलांच्या पाठीत खंजीर खुपसला का?

नजूबाई : नाही. त्यांनी तसं काहीही केलं नाही.

शोभाताई : शरद पाटलांच्या तत्त्वज्ञानाला व्यवहाराची जोड - काळाची मर्यादा आहे का?

नजूबाई : मर्यादा असू शकतात ना. आपण कित्येक महापुरुषांची चरित्रे वाचतो. पण त्यालाही काळ वेळाच्या मर्यादा असतातच की. पुढच्या प्रत्येकच कार्यकर्त्यासमोर त्या उभ्या राहतात. त्या पार करूनच आपल्याला जावं लागतं. म. फुले, आंबेडकर यांसारख्या सगळ्याच महापुरुषांना खूप भोगावं लागलं. त्यांनाही मर्यादा असणारच. काळ-वेळ आडवा येतो. पण त्याच्यावरही मात करून कुठल्यातरी गोष्टीचा त्याग त्याला करावा लागतो. एखादी गोष्ट आपण पूर्णपणे स्वीकारली तर दुसरी एखादी गोष्ट आपल्याला पूर्णपणे सोडावी लागते.

शोभाताई : कार्यकर्ती म्हणून शपांबरोबर काम करताना असं जाणवलं का, की शपांच्या विचारात इथं इथं ही ही दुरुस्ती करायला हवी होती म्हणून?

नजूबाई : काळ-वेळाच्या कसोटीवरच आपण मूल्यमापन करतो ना. ते बघूनच तर आपण ते जिथं लावता येतं, तिथंच ते आपण लावतो. बळजबरीनं ते लावता येत नाही. भलत्यासलत्या ठिकाणी ते आपण वापरूही नये. तसं ते लागू होत नाही. जिथं प्रश्न उभा राहील तिथंच आपण ते लावलं पाहिजे. जेव्हा त्याची गरज भासेल तेव्हाच तो मुद्दा आपण लावला पाहिजे.

शोभाताई : शपांनी आदिवासींच्या प्रश्नाला हात घातला नसता तर आज काय परिस्थिती राहिली असती?

नजूबाई : भयानक परिस्थिती झाली असती. ते येण्याच्या आधी लोक गुजरातमध्ये जात होते. रोजगार तर मिळत नव्हता, पण ते नुसते अन्नावर/पोटावर राबत होते. लहान लहान झोपड्यांना काटेकुटे लावून देत होते. त्यामुळे शपा नसते तर भयानक परिस्थिती निर्माण झाली असती. आज जो बदल झालाय तो बदल झाला नसता. लोक गावं सोडून पोटाच्या मागे कुठं कुठं विखुरले गेले असते. जे चळवळीच्या बाहेर आहेत आज त्या लोकांची परिस्थिती तीच आहे. जेमतेम चार महिने गावाबाहेर राहतात आणि आठ महिने पोटासाठी स्थलांतरित होतात. त्या ठिकाणी काय काय होतं ते न सांगितलेलंच बरं. तिथंही बायकांचाच जास्त बळी गेला असता. तो काही प्रमाणात तरी थांबला.

शोभाताई : स्त्रीमुक्ती आंदोलनाबद्दल काय वाटतं?

नजूबाई : स्त्रीमुक्ती आंदोलनं झाली. पण ज्या स्त्रीमुक्ती संघटना होत्या त्या सगळ्या ब्राह्मणी परंपरेतून आलेल्या होत्या. स्त्रीमुक्ती म्हणजे काय तर ब्राह्मणी उच्चजात-वर्गीयांच्या स्त्रीमुक्ती संघटना. मी हिंदू कोड बिलाबद्दल किती वेळा मांडणी केली, पण त्यांनी ते मनावर न घेता उलट सांगितलं की, आदिवासींना हिंदू कोड बिल लावलं तर त्यांचं हिंदूकरण होईल. पण हिंदू कोड बील बिलाचंच नाव आहे ना? त्याच्यामुळे कसं काय हिंदूकरण होईल? जज म्हणतो की आदिवासी तुम्ही हिंदू नाही. याला काय म्हणणार? आमच्या मुलाबाळांचा कागदोपत्री मात्र धर्म हिंदू लावला जातो आणि कोर्ट म्हणतं की तुम्ही हिंदू नाही. हिंदू भिल्ल, हिंदू मावची, हिंदू कोकणी असं लावलं जातं.

आदिवासींना डाळ-भात, मटण-भात लागतो. त्यांना गोड आवडत नाही. इकडचे माहेरकडचे लोक गोड खातात. पण सासरकडच्या तालुक्याचे लोक गोड खात नाहीत. त्यांना गव्हाच्या पोळ्याबिळ्या काही माहीत नव्हतं. डाळ-भात आणि सणावाराला मटण-भात यापलीकडे काही नाही. भकरी केल्या तर तांदळाच्या आणि दारू मोहूची. बायका-लहान-मोठे सर्व पंगत बसते. सगळ्यांना पंगतीने

दारू वाढली जाते. मग जेवायला बसतात.

माझ्या लहानपणी दारिद्र्याच्या कचाट्यातून मोहूच्या दारूनंच आम्हाला वाचवलं आहे. आई जंगलात काय काय शोधायला जायची. जाताना आम्हाला दारू पाजून झोपवून जायची. ती परत येईपर्यंत आम्ही झोपलेलेच असू. कारण जाग आली तर आईकडे खायला मागू, म्हणून ती काय देणार आम्हाला? कारण आई जे शोधून आणायची ते विकायला अजून ८-१० किलोमीटर जायची. तोपर्यंत आम्ही झोपून पडलेले असू. ती परत येऊन काही करेपर्यंत आम्ही तसेच पडून राहायचो.

आता आतापर्यंत दारू पिऊन एखाद्या आजारानं कोणी मेल्याचे आठवत नाही. ती दारू म्हणजे औषधी होती. बाळंतीण बायकांना तेच द्यायचे. जोपर्यंत पोटातली घाण बाहेर निघत नाही तोपर्यंत रोज एक कप सकाळ-संध्याकाळ देत असत. मोहूची दारू पिऊन जुन्या पिढ्या खपून गेल्या. पण एखाद्यालाही त्यामुळे कोणता आजार झाला नाही. खूप जगायचे ते लोक.

आताच्या दारू आहेत त्या कशा पद्धतीनं बनवतात? डॉक्टर सांगतात दारू पिऊ नका. त्यामुळे लोकांच्या शरीराची हानी होते. माणसं मरतात. वेगवेगळे आजार होतात. पण मोहूच्या फुलांच्या दारूचे तसं नव्हतं. आताच्या दारूचा कृत्रिम, घातक रसायनांमुळे त्रास होतो. ■

---

**वृत्तान्त** । अरुण करांडे

संतश्रेष्ठ एकनाथ महाराजांची एकनाथषष्ठी व शहीद भगतसिंग पुण्यातिथीनिमित्ताने 'युवा भारत', 'सगुणा महिला संघटना' व 'व्यसनमुक्त युवक संघटना' यांच्या संयुक्त विद्यमाने तांदूळवाडी (ता. माळशिरस, जि. सोलापूर) येथे देशभरातील निसर्ग व शेतिकेंद्रित विकासाच्या धोरणाकरिता लढा देणाऱ्या कार्यकर्त्यांचे तीन दिवसीय संमेलन दि. २१, २२ व २३ मार्च २०१४ रोजी आयोजित करण्यात आले.

पहिल्या दिवशी देशभरातून आलेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत आयोजक अरुण करांडे यांच्या हस्ते करण्यात आले. संध्याकाळी आठ वाजता संतश्रेष्ठ एकनाथ महाराजांच्या षष्ठीच्या पूर्वसंध्येला ह.भ.प. बंडातात्या कराडकर महाराजांच्या कीर्तनाने संमेलनाचा प्रारंभ झाला. प्रस्तुत कीर्तनात बंडातात्यांनी समाजहीतासाठी जे अहोरात्र आपला देह चंदनासारखा झिजवतात, स्वप्नातही जे संपूर्ण समाजाचे भले चिंतीतात त्यांना संत म्हणता येते. म्हणूनच समाजहीतासाठी झटलेले एकनाथमहाराज व स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेले भगतसिंग-सुखदेव-राजगुरू हे खऱ्या अर्थानं समाजासाठी संत असून त्यांनी आपल्या जीवनातून माणूस, निसर्ग यांच्या प्रगतीचा संदेश दिला. अशा थोर समाजपुरुषांचे ऋण समाजाने मान्य करून त्यांनी दिलेल्या मार्गानं जीवन कंठावयाचे असते, हा विचार मांडला.

दिवस दुसरा : ह.भ.प. डॉ. सुहास फडतरे महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजातील विविध विषयांवर अभ्यासपूर्ण निरूपण केले. दुपारच्या सत्रात 'पर्यावरणाचा विनाश आणि शेतीवरील संकट' या विषयावर मान्यवरांनी आपापली मते मांडली. संध्याकाळी ह.भ.प. बंडातात्या महाराज कराडकर यांचे कीर्तन झाले.

दिवस तिसरा : सकाळी आठ वाजता शहीद भगतसिंग पुण्यतिथीनिमित्ताने प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर 'शेती व पर्यावरणसंबंधी'च्या विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. या चर्चेत निसर्ग मानवकेंद्रित विकासवादी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. दुपारच्या सत्रात संमेलनाचा समारोप झाला.

या तीन दिवसीय संमेलनाला तांदूळवाडी आणि परिसरातील अनेक गावांतून बहुसंख्य, तसेच देशभरातून जवळपास शंभर-दीडशे शेतकरी/कष्टकरी लोक उपस्थित राहिले होते. याप्रसंगी कॉ. विलास सोनवणे, कॉ. शशी सोनवणे, शोभाताई करांडे, सज्जनकुमार, बलवंतसिंग नेहरा, अशोक भगत, मिता भट्टाचार्य, शरीफा बाले, सलीम पिंजारी, सुमंत ग्रामले, स्मिता पेंढारकर, वनराज शिंदे, बालाप्रसाद किसवे, देवकुमार अहिरे, किरण पवार, दयानंद कनकदंडे, प्रमोद घनवट, क्रांती पाटील, प्रगती धनावडे, पारूबाई राजगुडे, मनिषा माने, घन:शाम नांदगावकर,

गणेश रामचंद्र आपटे

अथांग क्षितिजाची ... उत्तुंग झेप !

एक नातं शतकाचं... 'मे. गणेश रामचंद्र आपटे' आणि सोलापूरकरांचं...
सोनेरी धाग्यात गुंफलेलं... रुपेरी किनार आणि हिऱ्यामाणकांची कोंदण असलेलं...
आपणां सर्वांची सोनं, चांदी दागदागिने आणि जडजवाहीरांची हौस पुरविताना
आमच्या पाच पिढ्या सोलापूरकरांच्या सोनेरी विश्वासानं उजळल्या...



आता 'गणेश रामचंद्र आपटे' नव्या क्षेत्रात पदार्पण आहेत...
आजवर बावनकशी सोनं दिलं, आता अद्ययावत
घर देणार आहोत...'इंद्रधनु'च्या रूपानं...
सोलापूर शहराच्या मध्यवर्ती भागात साकारणारा
'इंद्रधनु'हा महागृहप्रकल्प सर्व सुखसोयींनी सुसज्ज असेल.
जिथं आपलं समृद्ध जीवनशैलीचं स्वप्न साकार होईल...







॥ गणेश रामचंद्र आपटे ॥

सोलापूर: फोन: २३२४१३९

आपटे ट्रेडर्स
सोलापूर: फोन: २३२६१२१

ज्वेलर्स
पुणे : २४४५७०९०

इंद्रधनु
Indradhanu
सोलापूर: फोन: २३८०३९०

Registered with the registrar of Newspapers for India Under No. MAHMAR/2013/52241



# श्री चक्रधर स्वामी

| एथ शरण आलेया काई मरण असे |